# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त-

**दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५**

# अनुक्रमणिका

**त्रिसदस्य समिती सर्वसाधारण सभा** — **दि.१८ फेब्रुवारी, २०१५**

**स्थळ- शिर्डी कार्यालय, साईनिवास अतिथीगृह** — **वेळ- सकाळी ११.०० वाजता**


| अ.नं. | विषय नं. | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| | | | |
| 1. | १ | दिनांक ३०.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| 2. | २ | दिनांक ०९.०२.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| **(अ) नोंद घेण्याचे विषय-** | | | |
| | | **लेखाशाखा विभाग** | |
| 3. | ३ | जमाखर्च तक्ता माहे, ऑगष्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर- २०१४. | ३८ |
| **(ब) प्रशासकीय मान्यतेचे विषय-** | | | |
| | | **बांधकाम विभाग** | |
| 4. | ४ | दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत. | ३८ |
| 5. | ५ | मौजे शिंगवे ता.राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे कंपोस्ट डेपोसाठीचे जागेस संरक्षक भिंत बांधणेसाठी व पोहच रस्त्यासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन देणेबाबत. | ४० |
| 6. | ६ | आपत्कालीन व्यवस्थापनासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत. | ४२ |
| 7. | ७ | संस्थानचे सर्व्हे नं.१२४ (पै.) मधील जागेत गोवरी शेडचे कामाबाबत. | ४२ |
| | | **जनसंपर्क कार्यालय** | |
| 8. | ८ | संस्थानच्या हेलिपॅड सुविधेबाबत. | ४३ |
| | | **द्वारावती भक्तनिवास** | |
| 9. | ९ | संस्थान निवासस्थानांना ISO-9001:2008 मिळालेबाबत. | ४४ |
| | | **साईआश्रम भक्तनिवास** | |
| 10. | १० | सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त पोलिस बंदोबस्तासाठी येणा-या वरीष्ठ पोलिस अधिका-यांना आरक्षित करण्यात आलेल्या रुम सशुल्क/ विनामुल्य देणेबाबत. | ४४ |
| 11. | ११ | साईआश्रम भक्तनिवास विभागातील ॲम्फिथिएटरमध्ये साईभक्तांना धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रमाची परवानगी देणे व त्याकामी नियमावलीस मान्यता मिळणेबाबत. | ४५ |
| 12. | १२ | साईआश्रम भक्तनिवासच्या खोल्यांमध्ये थांबलेल्या साईभक्तांना शुल्क घेऊन कपडे धुणे व इस्त्री करुन देणेकामी लॉण्ड्री ठेकेदाराची नेमणूक करणेबाबत. | ४७ |
| | | **साईधर्मशाळा** | |
| 13. | १३ | श्रीसाईबाबा संस्थानचे परिसरातील स्वच्छता व किडनाशक तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत. | ४७ |
| | | **सामान्य प्रशासन** | |
| 14. | १४ | मयत/ आजारी असलेल्या पालखी सेवेक-यांचे ऐवजी त्यांचे नातलगांच्या (वारसांच्या) पालखी सेवेकरी म्हणून सेवा घेणेबाबत. | ४८ |
| 15. | १५ | संस्थानचे मुंबई कार्यालयाकडील कर्मचा-यांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत | ५० |
| 16. | १६ | लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेले परंतु विभागीय परिक्षेत दोन वेळा अनुत्तीर्ण झालेले संस्थान सेवेत कायम न केलेल्या कर्मचा-यांबाबत. | ५१ |
| 17. | १७ | राज्य गुप्त वार्ता विभाग, उपकेंद्र शिर्डी यांचे कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या रुमबाबत. | ५३ |
| | | **कामगार विभाग** | |
| 18. | १८ | श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत. | ५४ |
| | | **मंदिर विभाग** | |
| 19. | १९ | श्रींचे शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीतील नियोजनाबाबत. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **संरक्षण विभाग** | |
| 20. | २० | मंदिर व मंदिर परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तू बाबत | ५७ |
| | | **वाहन विभाग** | |
| 21. | २१ | वाहन विभागाकडील सर्व वाहनांचा विमा नुतनीकरण करणेबाबत. | ५८ |
| 22. | २२ | Van Mounted Hyderaulic Extension Ladder खरेदी करणेकामी दि.०८.०१.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६ मध्ये बदल होणेबाबत. | ५९ |
| | | **विधी विभाग** | |
| 23. | २३ | स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील जागेस मुदतवाढ देणेबाबत. | ५९ |
| 24. | २४ | ॲडव्होकेट श्री.आर.एन धोर्डे यांना पी.आय.एल. नं.२५/ २०१२ श्री.संजय काळे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतरची वकील फी अदा करणेबाबत. | ६० |
| | | **मालमत्ता विभाग** | |
| 25. | २५ | आरक्षण क्र.३९ श्री साईबाबा संस्थानचे विविध उपक्रमासाठी भू-संपादन यामधील जमीन मालकांना अदा करावयाचे मोबदला रक्कम व आस्थापना खर्चाबाबत. | ६१ |
| 26. | २६ | मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास दिलेल्या जागेत बांधण्यात आलेल्या सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी देणेबाबत. | ६३ |
| 27. | २७ | मौजे रुई, ता.राहाता येथील सिटी सर्व्हे नं.१९८ क्षेत्र २४१.५० चौ.मिटर जागा बक्षिस पत्राने स्विकारणेबाबत. | ६४ |
| | | **विद्युत विभाग** | |
| 28 | २८ | साईनगरकडील साईध्यान ०१ आणि ०२ या स्टाफ क्वाटरचे रिवायरींग करणेबाबत. | ६५ |
| 29. | २९ | आय.एस.ओ. चे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग करणेबाबत. | ७० |
| | | **खरेदी विभाग** | |
| 30. | ३० | सन २०१५-१६ करिता कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईबाबत. | ७१ |
| | | **लेखाशाखा विभाग** | |
| 31 | ३१ | विनियम न झालेल्या विदेशी चलनाबाबत. | ७२ |
| | | **प्रकाशने विभाग** | |
| 32. | ३२ | श्री साईसच्चरित मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद प्रकाशित करणेबाबत. | ७२ |
| | | **लाडू निर्मिती विभाग** | |
| 33 | ३३ | सन २०१५-१६ साठी मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी ई-निविदा काढणेस व खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ७३ |
| | | **श्री साईबाबा हॉस्पीटल** | |
| 34 | ३४ | श्री साईबाबा रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाकरिता अद्ययावत तंत्रज्ञान असलेले Ultra Sound Machine (USG) खरेदी करणेबाबत. | ७३ |
| 35. | ३५ | श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु. विभागाकरिता CNS System with Monitor & All Accessories खरेदीबाबत. | ७४ |
| 36. | ३६ | श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरिता Imported Operation Table with Accessories खरेदी करणेबाबत. | ७५ |
| 37. | ३७ | श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता पोर्टेबल 3D Echo मशिन खरेदी करणेबाबत. | ७६ |
| 38. | ३८ | श्री साईनाथ/ श्री साईबाबा हॉस्पीटलकडील पदव्युत्तर पदविकाधारक यांना तीन व पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांना सहा वेतनवाढी मिळणेबाबत. | ७६ |
| 39. | ३९ | रुग्णालयातील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करणे व दरम्यानचे काळात Ad Hoc basis वर कंत्राटदारामार्फत नेमणूका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत | ७७ |
| 40. | ४० | संस्थानचे रुग्णालयात ऑब्झरवरशिप करणेस परवानगी देणेबाबत. | ७८ |
| 41 | ४१ | श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टचे पदाची संख्या वाढविणेबाबत. | ७८ |
| 42. | ४२ | व्हिजीटींग पध्दतीने ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करणेबाबत | ७९ |
| 43. | ४३ | आर जी एन एम (स्टाफ नर्स) चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात प्रॅक्टीस करणेस परवानगी देणेबाबत. | ८० |
| 44. | ४४ | मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत. | ८० |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०२/ २०१५** **दिनांक १८.०२.२०१५**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १८.०२.२०१५ रोजी दुपारी ०२.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ५६५३/ २०१५, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ५७१३/ २०१५, दिनांक १७.०२.२०१५ रोजीचे पत्राने सदरहू सभा दुपारी ०२.०० वाजता ऐवजी त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असून सभेची विषयसूची (अजेंडा) पुर्वप्रमाणेच राहील असे सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दिनांक १८.०२.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ३०.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२९** दिनांक ३०.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले

---

**विषय नं.०२** **दिनांक ०९.०२.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३०** दिनांक ०९.०२.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव ॲल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.२,१२,८८४/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मंदिर परिसरातील देणगी काऊंटर काऊटर नं. ०२ समोर श्री साईबाबा दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो 'श्री' चे जीवन चरीत्रावर आधारीत पुस्तके विक्रीसाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून बुकस्टॉल काऊंटर चालू करण्यात आले आहे.

संस्थान प्रकाशीत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका ही साधारणतः दिवाळी व नाताळच्या सुट्टीच्या गर्दीत विक्रीसाठी उपलब्ध होत असते. यावेळी दैनंदिनी/ दिनदर्शिका व पुस्तके यांचे बॉक्स मोठ्या प्रमाणात विक्री काऊंटर कॅबीन मध्ये ठेवलेले असतात. त्यामुळे विक्री काऊंटर मधील जागा अपुरी पडते. तसेच दैनदिनी/ दिनदर्शिका, श्रीचे जीवन चरीत्रावर आधारीत पुस्तके विक्रीकामी ग्राहक यांना सुलभता मिळावी म्हणून विक्री काऊंटरवर संगणकीकरण करणे प्रस्तावीत आहे. याकामी उपरोक्त विषयांकीत कामे करणेकरीता दि.११/०८/२०१४ व दि.२३/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये प्रकाशने विभागाने कळविले आहे.

**प्रस्ताव:-**

वरील विषयाकीत दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव अल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर तयार करणेकामी उपरोक्त तपशिलाप्रमाणे येणारे अंदाजे रु.२,१२,८८४/- मात्रचे खर्चास व सदरचे काम करणेसाठी वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे सिलबंद निविदा मागविणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७५२ अन्वये मान्यता देण्यात आली असून त्यानुसार दिनांक ०५/११/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता घेण्यात आली त्यानुसार निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा विक्रीचा कालावधी दि.२२/१२/२०१४ ते दि.३१/१२/२०१४ ठेवण्यात आला होता. सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम मूदत दि.०५/०१/२०१५ ठेवण्यात आली होती. सदरहू मूदत खालील प्रमाणे सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्तेचे नांव / गांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | इनट्राजेन फॅसेलिटी सर्व्हीस प्रा.लि., कोथरुड पुणे | ११९८० | ०५/०१/२०१५ |
| ०२ | कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे | ११९८३ | ०५/०१/२०१५ |
| ०३ | श्री तान्हाजी रंगनाथ मोरे, शिर्डी | ११२११ | ०५/०१/२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे | २,९७,०५३.७५ |
| २ | श्री.तान्हाजी रंगनाथ मोरे, शिर्डी | १,८७,४१०.०० |
| ३ | इनट्राजेन फॅसीलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., कोथरुड पुणे | ३,४१,५१०.०० |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, दैनंदिनी/ दिनदर्शिका, फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव ॲल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर करणेकामी श्री.तान्हाजी रंगनाथ मोरे, शिर्डी यांचे रु.१,८७,४१०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **प्रसाद लाडू विक्री काऊंटरसाठी ०४ बंदिस्त अल्युमिनीअम कॅबीन्स व कॉम्प्युटर टेबल्स तयार करणेबाबत प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.४,१५,५२३/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट – कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्ताव:-** संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत जुने प्रसादालय नं. २ चे उत्तर बाजुकडील हॉलमधून लाडू काउंटरव्दारे साईभक्तांना प्रसाद लाडुची विक्री करण्यात येते. सदर काउंटरवर भक्तांना तिकीट न देता भक्तांकडून रोख रक्कम घेऊन लाडू प्रसादाचे पाकीटे दिले जातात. साईटेक प्रकल्पांतर्गत प्रसाद लाडू विक्रीचे ठिकाणी काउंटरवर संगणक बसविण्यात यावे व संगणक प्रणालीव्दारे प्रथम भक्तांना तिकीट देवून त्यानंतरच प्रसाद लाडू देण्यात यावा असे निर्देश देण्यात आले आहेत. परंतू प्रसाद लाडू विक्रीसाठी असलेला हॉल मोकळा असून बाजुने धुळीचे कण हॉलमध्ये येतात तसेच सर्व काऊंटरवर तेलकटपणा असलेने प्रथम सर्व चारही काऊंटरवर संगणक सचासाठी बंदिस्त कॅबिन तयार करुन प्रत्येक केबिनमध्ये ड्रॉवरची व केबिनला लॉक करणेची सुविधा असावी असे कॅन्टीन विभाग यांनी कळविले आहे. प्रसाद लाडू विक्री काउंटरसाठी चार बंदिस्त अल्युमिनीअम (दरवाजांसह) केबीन व कॉम्प्युटर टेबल तयार करणेकामी उपरोक्त प्रमाणे अंदाजे रु.4,15,523/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६४ अन्वये मान्यता देण्यात आली असून त्यानुसार निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा विक्रीचा कालावधी दि.२२/१२/२०१४ ते दि.३१/१२/२०१४ ठेवण्यात आला होता. सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम मूदत दि.०५/०१/२०१५ ठेवण्यात आली होती. सदरहू मूदत खालील प्रमाणे सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्तेचे नाव / गांव | आवक क्र. | दिनाक |
|---|---|---|---|
| ०१ | इनट्राजेन फॅसीलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., कोथरुड पुणे | १११८१ | ०५/०१/२०१५ |
| ०२ | कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे | १११८२ | ०५/०१/२०१५ |
| ०३ | श्री तान्हाजी रंगनाथ मोरे, शिर्डी | ११२१४ | ०५/०१/२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे | ६,९७,९७५/- |
| २ | श्री.तान्हाजी रंगनाथ मोरे, शिर्डी | ४,१६,८४०/- |
| ३ | इनट्राजेन फॅसीलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., कोथरुड पुणे | ८,०२,२८०/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू विक्री काऊंटरसाठी ०४ बंदिस्त अल्युमिनीअम कॅबीन्स व कॉम्प्युटर टेबल्स तयार करणेकामी श्री.तान्हाजी रंगनाथ मोरे, शिर्डी यांचे रु.४,१६,८४०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३ **लेंडीबागेतील बाबांचे काळातील बावडीचे भोवती तसेच पणत्या दिवे लावण्याच्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.३,१०,०००/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट–कलम (क) अन्वये '' मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे'', अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:- दि.२८/०८/२०१४ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.७३९ अन्वये लेंडीबागेतील बाबांचे काळातील बावडीचे भोवती तसेच पणत्या/ दिवे लावण्याच्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.३,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावः- उपरोक्तकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस इकडील दि.०५/११/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वर्तमानत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन दि.३१/१२/२०१४ अखेर पर्यंत निविदा विक्रीची अंतिम मूदत ठेवणेत आली. परंतू सदरहू मूदत चार ठेकेदार यांनी निविदा खरेदी केले होत्या त्यापैकी फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याने दि.१३/०१/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये दि.२२/०१/२०१५ अखेर मूदतवाढ देण्यात आली असून सदरहू वाढीव मूदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव/ गांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | ए.एस.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | १९२११ | ०५/०१/२०१५ |
| ०२ | सुभद्रा असोशिएटस, श्रीरामपूर | १९२१२ | ०५/०१/२०१५ |
| ०३ | श्री.विजय रामराव वाघ, कोपरगांव | २०३६१ | २१/०१/२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | ए.एस.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | २,७८,४२५.०० |
| २ | सुभद्रा असोशिएटस, श्रीरामपूर | ४,०१,९४०.०० |
| ३ | श्री.विजय रामराव वाघ, कोपरगांव | २,८८,६७५.५० |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, लेंडीबागेतील बाबांचे काळातील बावडीचे भोवती तसेच पणत्या दिवे लावण्याच्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी ए.एस.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे रु.२,७८,४२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०४ **टायर टयुब (फ्लॅपसह) खरेदीकामी आलेल्या निविदांचे टेक्निकल बीड व कमर्शियल बीड उघडून पात्र पुरवठादारांसोबत चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय होणेबाबत. (रु.४,६०,०००/-)**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :- 17 (2) (ढ)**

**प्रस्ताविक**:- दि.09.12.2014 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.1021 नुसार, वाहन विभागाकडील वापरात असलेल्या कार्यालयीन-03, रुग्णवाहीका-03, स्कुलबसेस-05, पॅसेंजर बसेस-03, व मालवाहतुक-01, अशा एकुण-15 वाहनांकरीता नवीन 51 टायर्स (टयुब, प्लॅपसह) खरेदी करणेकामी ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.4,60,000/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

दि.05/01/2015 रोजी दैनिक पुढारी (अहमदनगर आवृत्ती) या वृत्तपत्रात जनसंपर्क कार्यालय विभागामार्फत नवीन टायर + टयुब प्लॅपसह खरेदी कामी जाहिरात प्रसीध्द करणेत आलेली होती.

त्यानुसार नवीन टायर + टयुब (प्लॅपसह) खरेदी कामी ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून निविदा बोलाविण्यात आले होते, त्यानुसार दि.15/01/2015 अखेर विहित मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | आवक नंबर / दिनांक | |
|---|---|---|---|
| 01. | सतिश ऑटो सेंटर बेलापुर रोड, श्रीरामपुर | 020001-02-15/01/2015 | बंद निविदा |
| 02 | एस.जे.एस व्हिल्स, अस्तगाव, राहाता | 020003 - 15/01/2015 | बंद निविदा |
| 03. | ओम टायर्स शिर्डी. ( साकुरी शिव ) | 020023 - 15/01/2015 | बंद निविदा |

वाहन विभागातील वाहनाकरिता आवश्यक असलेले टायर टयुब (प्लॅपसह) नवीन खरेदीकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रीक (Technical Bid) व व्यावसायिक निविदा (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. उघडण्यात आलेल्या तांत्रीक निविदांची तपासणी केली असता, त्यामध्ये एस.जे.एस व्हिल्स, अस्तगाव, राहाता व ओम टायर्स शिर्डी, (साकुरी शिव) या दोन पुरवठाधारकांनी मागणीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याचे आढळून आले.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागातील वाहनांकरिता आवश्यक असलेले टायर टयुब (प्लॅपसह) खरेदीसाठी एकच निविदाधारक पात्र असल्याने तुलनात्मक दर प्राप्त होऊ शकत नाही, त्यामुळे सदरहूकामी फेरनिविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

०५ **श्री साईप्रसादालय विभागास आवश्यक लिक्विड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVAD & SUMO RINSE खरेदीकामी प्राप्त निविदांचे लिफाफे उघडणेबाबत. (रु.६,८५,०००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

श्री साईप्रसादालय विभागास आवश्यक लिक्विड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हर्सीचे SUMO NOVAD & SUMO RINSE खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ६,८५,०००/- (अक्षरी रु. सहा लाख पंचाऐंशी हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.११.०९.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमाक ७७७ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.०९.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

श्री साईप्रसादालय विभागास आवश्यक लिक्विड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVAD & SUMO RINSE ची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटिक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि. १७.१२.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी पाच निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदाचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधाकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

श्री साईप्रसादालय विभागाकरीता आवश्यक लिक्विड सोप व डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVAD & SUMO RINSE खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. नं. | साहित्याचा तपशील व मागणी | त्रिमुर्ती गृहउद्योग, औरंगाबाद दर (व्हॅटसह) प्र.लि. रु. | महावीर शॉप्स, अहमदनगर दर (व्हॅटसह) प्र.लि. रु. | माऊली केमिकल्स, औरंगाबाद दर (व्हॅटसह) प्र.लि. रु. | मे.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव दर (व्हॅटसह) प्र.लि. रु. | आर.के. एन्टरप्रायझेस, सिन्नर दर (व्हॅटसह) प्र.लि. रु |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिक्वीड सोप १०,००० लि. | ३१.५० | २०.०० (प्रति किलो) | २२.०० | १९.९० | २६.२५ |
| २ | जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVAD १५,००० लि. | --- | २२५.०० | --- | --- | --- |
| ३ | जॉनसन डायव्हसीचे SUMO RINSE १५,००० लि. | --- | २००.०० | --- | --- | --- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय विभागाकरीता आवश्यक लिक्विड सोप खरेदीकामी मे.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव यांचे रु.१९.९० प्रती लिटर (व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच डिश वॉशिंग मशिन करीता जॉनसन डायव्हसीचे SUMO NOVAD & SUMO RINSE खरेदीकामी निविदेतील मागणीप्रमाणे एकाच निविदाधारकाने दर दिलेले असल्याने तुलनात्मक दर प्राप्त होऊ शकत नाही, त्यामुळे सदरहूकामी दुबार निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०६ **कॅन्टीन विभाग प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्रीसाठी संगणकीय कुपन छपाईकामी प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत. (रु.३,५०,०००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

कॅन्टीन विभागाकरीता प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्री करणेकामी संगणकीय कुपन छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,५०,०००/- (अक्षरी रु. तीन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती

सभा दि.०३.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६४९ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१७.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

कॅन्टीन विभागाकरीता प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्री करणेकामी संगणकीय कुपन छपाईची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि.१८.१२.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. सदरचे खरेदीकामी एकूण दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी चार निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदाचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदाची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधाकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे कॅन्टीन विभागाकरीता प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्री करणेकामी संगणकीय कुपन छपाई करणेकामी प्राप्त निविदांचे लिफाफे उघडून योगृय निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभाग प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्रीसाठी संगणकीय कुपन छपाईकामी एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने तुलनात्मक दर प्राप्त होऊ शकत नाहीत, त्यामुळे सदरहूकामी दुबार निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०७ **आरोग्य विभागास आवश्यक स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत. (रु.९,७८,७५०/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

आरोग्य विभागास स्वच्छता साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,७८,७५०/- (अक्षरी रु. नऊ लाख, आठ्याहत्तर हजार, सातशे पन्नास) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२८.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८९ नुसार मान्यता मिळालेली आहे त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.०८.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

आरोग्य विभागास सदर साहित्याची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि.०१.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी सहा निविदांची विक्री झालेली आहे

सदरच्या निविदाचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

आरोग्य विभागाकरीता आवश्यक साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. न. | साहित्याचा तपशील | मे.गांधी केमिकल्स, अहमदनगर | महावीर सोप ॲन्ड डिटर्जंट इंडस्ट्रीज, अहमदनगर | मे.मगनलाल देवशंकर, नाशिक | आर.के. एंटरप्रायझेस, सिन्नर | मे.हितू जितू एंटरप्रायझेस,मुंबई | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग/किलो/लिटर (व्हॅटसह) रु | दर प्रती नग/किलो/लिटर (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग/किलो/लिटर (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग/किलो/लिटर (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग/किलो/लिटर (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग/किलो/लिटर (व्हॅटसह) रु |
| १ | सेंटेड फिनेल पाण्याशी डायल्युशन, प्रमाण १:१००, कोरे (प्युअर) आवएसआय मार्कचे/ उत्तम प्रतीचे ३,००० लिटर | नामंजूर नमुना | नामंजूर नमुना | १२८.०० | १६०.०० | ८५.०० | नामंजूर नमुना |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | लिक्वीड सोप चांगल्या प्रतीचे ३,००० लिटर | २३.०० | २२.०० | नामंजूर नमुना | २६.०० | नामंजूर नमुना | नामंजूर नमुना |
| ३ | ओडोपीक वॉश पावडर (क्लिनींग पावडर) (४.५०० किलो पॅकींगचा एक पुडा) ६ पुडयाची एक बॅग आयएसआय मार्क असलेली चांगल्या प्रतीची १,५०० किलो | १७.५० | १७.५० | २५.०० | नमुना नाही (१६.५०) | नमुना नाही (१८.००) | नमुना नाही |
| ४ | वायफर रबरी/ प्लॅस्टिक दांडयासहीत 2"-३" रुंदीचे व १८"लांब दांडे ५ फुट लांबीचे चांगल्या प्रतीचे मजबुत रबर असलेले २०० नग | १६०.०० | नमुना नाही (२९०.००) | २१०.०० | नमुना नाही (९०.००) | ८५.०० | नमुना नाही |
| ५ | रबरी हातमोजे कोणत्याही रंगाचे १० नंबर चांगल्या प्रतीचे २,००० जोड | ६५.०० | नमुना नाही (७०.००) | २७.०० | नमुना नाही (२६.५०) | ३२.०० | नमुना नाही |
| ६ | सुखलोर किटकनाशक औषध (Sukhlor) फवारणीकामी १ लिटरचे पॅकिंग आय एस आय मार्क असलेले ७० लिटर | --- | --- | ५११.०० | ५६०.०० | --- | --- |
| ७ | R 6 (लिक्वीड) वॉश बेसीन/ संडास भांडयावरील डाग काढणे करीता ५ लिटरचे पॅकींग टास्की कंपनीचे ४०० लिटर | १६५.०० | १७०.०० | १२९.०० | २२४.०० | १३०.०० | --- |
| ८ | R 7 (लिक्वीड) सर्व प्रकारचे डाग काढणेकामी ५ लिटरचे पॅकींग टास्की कंपनीचे १५० लिटर | १४५.०० | १५०.०० | १००.०० | १३४.०० | १००.०० | --- |
| ९ | बीएचसी पावडर/ फॉलीडॉल पावडर २५ किलोची बॅग आयएसआय मार्क/ चांगल्या प्रतीची २,००० किलो | ३०.८० | ३१.२० | नमुना नाही (२२.४०) | नमुना नाही (२८.००) | २१.०० | नामंजूर नमुना |
| १० | प्लॅस्टिक बादली लहान क्षमता २ लिटर चांगल्या प्रतीचे १,५०० नग | ६५.०० | नमुना नाही (७०.००) | २१.८० | नमुना नाही (३५.००) | नामंजूर नमुना | नमुना नाही |
| ११ | डस्टबीन स्टॅण्डर्ड चांगल्या प्रतीचे ५० नग | नामंजूर नमुना | नमुना नाही (७५.००) | नामंजूर नमुना | नमुना नाही (५१०.००) | नमुना नाही (१८०.००) | नमुना नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | R 5 (लिक्वीड) टॉयलेट/ बाथरुम मधील दुर्गंधी दुर करणेकरीता ५ लिटरचे पॅकींग जॉनसन & जॉनसन कंपनीचे २०० लिटर | २१२.०० | २१५.०० | १९०.०० | २३४.०० | --- | --- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागासाठी खरेदी करावयाच्या स्वच्छता साहित्याचा तपशील (Specification) संबंधीत विभागाने निश्चित करावा व त्यास कार्यकारी अधिकारी सो. यांची मंजूरी घेऊन प्रस्ताव खरेदी विभागाकडे सादर करावा. त्यानंतर खरेदी विभागाने प्रस्तावित खरेदीकामी फेरनिविदा प्रक्रिया राबवावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

०८ **ध्वनिक्षेपण विभागास आवश्यक वार्षीक माहित्य खरेदीकामी प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत. (रु.३,६६,०००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तीचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

ध्वनिक्षेपण विभागास आवश्यक वार्षिक साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३,६६,०००/- (अक्षरी रु.तीन लाख सहासष्ट हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.२६.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५५८ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१४.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

ध्वनिक्षेपण विभागास सदर साहित्याची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि.१७.१२.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी तीन निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदाचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदाची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकाची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधाकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

ध्वनिक्षेपण विभागाकरीता आवश्यक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात येऊन, त्यांमधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.न. | साहित्याचा तपशिल | रिध्दी एंटरप्रायझेस, नाशिक | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | राज ट्रेडींग कंपनी, नाशिक |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग/पुडे/बंडल (व्हॅटसह) दर रु. | दर प्रती नग/पुडे/बंडल (व्हॅटसह) दर रु. | दर प्रती नग/पुडे/बंडल (व्हॅटसह) दर रु. |
| १ | केसिंग पट्ट्या ३० mm प्रिसीजन (२००मि) १०० नग | **90.00** | 100.00 | 105.00 |
| २ | रावळ प्लग ८x२५ mm ग्रीप २०० पुडे | **15.00** | 17.00 | 19.00 |
| ३ | स्क्रु GKW ३५x८ mm ५० पुडे | **75.00** | 80.00 | 82.00 |
| ४ | स्क्रु २५x८ mm GKW २५ पुडे | **85.00** | 90.00 | 95.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | स्क्रु<br>६०x८ mm<br>GKW<br>२० पुडे | **110.00** | 115.00 | 115.00 |
| ६ | स्क्रु<br>७५x८ mm<br>GKW<br>१५ पुडे | **150.00** | 155.00 | 160.00 |
| ७ | पी.व्ही.सी. बेंड<br>२५ mm<br>प्रिसीजन<br>१०० नग | **16.00** | 17.00 | 18.00 |
| ८ | पी.व्ही.सी टू वे जंक्शन<br>२५ mm<br>प्रिसीजन<br>५० नग | **39.00** | 45.00 | 49.00 |
| ९ | पी.व्ही.सी.थ्री वे जंक्शन<br>प्रिसीजन<br>२५ mm<br>५० नग | **27.00** | 30.00 | 37.00 |
| १० | पी.व्ही.सी वन वे जंक्शन<br>प्रिसीजन<br>२५ mm<br>१०० नग | **27.00** | 30.00 | 39.00 |
| ११ | सॅडल<br>प्रिसीजन<br>२५ mm<br>२० बॉक्स | **120.00** | 130.00 | 140.00 |
| १२ | अनआर्मड<br>केबल(कॉपर) थ्री<br>कोअर<br>२.५ स्केअर mm<br>पॉलिकॅब<br>९० मिटरचे ०४ बंडल | **8,400.00** | 8,700.00 | 8,900.00 |
| १३ | अनआर्मड केबल<br>(कॉपर) टू कोअर<br>१.५ स्केअर mm<br>पॉलिकॅब<br>१५ बंडल | **4,450.00** | 4,600.00 | 5,000.00 |
| १४ | फेक्झीबल वायर टू<br>कोअर<br>२३/३६<br>पॉलिकॅब<br>१५ बंडल | **260.00** | 280.00 | 300.00 |
| १५ | पी.व्ही.सी. टेब बंडल<br>९ मिटर<br>स्टीलग्रीप<br>२०० नग | **18.00** | 20.00 | 22.00 |
| १६ | नायलॉन टॉय<br>१०० mm<br>Laser<br>२५ पॅकेट | **69.00** | 70.00 | 70.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | नायलॉन टॉय<br>१५० mm<br>Laser<br>३५ पॅकेट | **97.00** | 102.00 | 100.00 |
| १८ | नायलॉन टॉय<br>२०० mm<br>Laser<br>२५ पॅकेट | **180.00** | 185.00 | 195.00 |
| १९ | नायलॉन टॉय<br>२५० mm<br>Laser<br>२५ पॅकेट | **260.00** | 300.00 | 280.00 |
| २० | नायलॉन टॉय<br>३०० mm<br>Laser<br>१३ पॅकेट | **315.00** | 330.00 | 350.00 |
| २१ | मशिन स्क्रु<br>Mar/२०१६<br>चांगल्या प्रतीचे<br>२५ बॉक्स | **90.00** | 100.00 | 100.00 |
| २२ | अँकर स्क्रु फासनर<br>३/१० mm<br>चागल्या प्रतीचे<br>१०० नग | **65.00** | 70.00 | 95.00 |
| २३ | SDS PLUS<br>HAMMER DRIL<br>BIT<br>५x११० mm<br>ETERNITY<br>५० नग | **65.00** | 70.00 | 75.00 |
| २४ | जी.आय. सॅडल<br>१५ mm<br>चांगल्या प्रतीचे<br>१० बॉक्स | **95.00** | 100.00 | 115.00 |
| २५ | माईक केबल<br>FALCON<br>५ बंडल | **4,200.00** | 4,400.00 | 4,600.00 |
| २६ | आहूजा कंपनी डायफ्राय<br>AU40XT/60XT<br>आहूजा<br>५० नग | **150.00** | 160.00 | 180.00 |
| २७ | आहूजा कंपनी डायफ्राय<br>१५ वॅट<br>आहूजा<br>५० नग | **180.00** | 190.00 | 200.00 |
| २८ | R-G- 6 केबल<br>पॉलिकॅब<br>३०५ मिटरचे ३ बडल | **2,800.00** | 3,000.00 | 3,200.00 |
| २९ | टाटास्काय डिश रिमोट<br>टाटास्काय<br>२०० नग | **130.00** | 150.00 | 150.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | मिनी डि.व्ही. कॅसेट DVM 60 सोनी १०० नग | **145.00** | 150.00 | 150.00 |
| ३१ | ऑप्टीकल नोड 45-860 MHZ CONTECH २० नग | **1,050.00** | 1,100.00 | 1,200.00 |
| ३२ | डि.व्ही.डी. R 120 Min 4.7 GB सोनी ५०० नग | **16.00** | 17.00 | 18.00 |
| ३३ | सी.डी. R 700 MB सोनी २०० नग | **16.00** | 17.00 | 18.00 |
| ३४ | सिंगल कोअर वायर १.५ स्केअर mm पॉलिकॅब १० बंडल | **1,713.00** | 1,750.00 | 1,800.00 |
| ३५ | टि.व्ही. रिमोट (३२" LED TV साठी) सोनी २० नग | **200.00** | 210.00 | 210.00 |
| ३६ | टाटास्काय सेटअप बॉक्स स्पिचींग अॅडप्टर Out-Put 12 V-1.5 A टाटास्काय १० नग | **230.00** | 240.00 | 240.00 |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, ध्वनिक्षेपण विभागासाठी आवश्यक असलेले वार्षीक साहित्य खरेदीकामी रिध्दी एंटरप्रायझेस, नाशिक यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०९ **राजीवगांधी जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार घेणा-या रुग्णांकरिता औषधे खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडणेबाबत. (रु.५,०४,१३१/-)**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षिक औषधे सन 2013-14 करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि.26/07/2013 निर्णय क्र. 564 अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि.25/10/2013 रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठा धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा. त्रिसदस्य समिती सभा दि. 15/03/2014 चे सभेतील निर्णय क्र. 254 अन्वये दि. 19/03/2014 रोजी एकूण 66 पुरवठाधारकांना एकूण रु. 30,52,88,358/- रक्कमेचा वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत दयावी लागतात. विविध वॉर्ड विभागातुन वार्षीक औषधे खरेदी व्यतिरिक्त वेगवेगळया प्रकारची औषधांची मागणी केली जाते. परंतु ती वार्षीक खरेदीमध्ये मागणी नसल्यामुळे वेळोवेळी खरेदी करावी लागतात. त्यामुळे दि.02/05/2014 रोजीचे परिपत्रकान्वये वार्षीक मागणी व्यतिरिक्त राजीव गाधी जीवनदायी योजना रुग्णांसाठी लागत असेल त्याची मागणी करावी असे कळविण्यात आले होते. त्यानुसार सोबतच्या यादीप्रमाणे सध्या औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी व कन्झूमेबल साहित्याची नविन मागणी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा. त्रिसदस्य समिती दि.17/07/2014 रोजीचे सभेत थोडी थोडी औषधे खरेदी करण्या ऐवजी डॉक्टरांकडून मागणी घेऊन रु.900000/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख मात्र) पर्यंत लागतील ती औषधे खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार सदरची खरेदी करता येईल.

सदर औषधे व सर्जिकल साहित्य सोबतच्या यादी प्रमाणे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. 504131/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख चार हजार एकशे एकतीस मात्र) इतका खर्च येणार आहे.

दि.28/08/2014 रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.735 अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.504131/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्रि प्रेस जरनल- मुंबई, लाईफ 365 इंग्लिश-पुणे, दिव्य मराठी-नाशिक, पुण्यनगरी-औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण 72 उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात 05 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Addissun Lifescience Pvt. Ltd., Pune | 24/11/2014 |
| 2. | M/s. Rudraksh Pharma, Nashik | 25/11/2014 |
| 3. | M/s. S.S. Health Services, Rahata | 25/11/2014 |
| 4. | M/s. Balaji Drugs Chemical Agencies, Nashik | 25/11/2014 |
| 5. | M/s. Getwell Distributors, Nashik | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 05 सिलबंद तांत्रिक निविदा दि.06/01/2015 रोजी मा. उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबीच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून 05 ही निविदाधारक तांत्रीक दृष्ट्या पात्र आहेत. त्यांच्या कमर्शियल निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदांधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Medicine Name/ Contents/ Qty. | M/s. Addissun Lifescience Pvt. Ltd., Pune | M/s. Rudraksh Pharma, Nashik | M/s. S.S. Health Services, Rahata | M/s. Balaji Drugs Chemical Agencies, Nashik | M/s. Getwell Distributors, Nashik |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Amt. in Rs. | Total Amt. in Rs. | Total Amt. in Rs. | Total Amt. in Rs. | Total Amt. in Rs. |
| 1 | VIVA-D SACHET/ Cholecalciferol/ 3000 | --- | 19680.00 | 34250.00 | 17760.00 | --- |
| 2 | SYP- EASCOFF/ Terbutaline sulphate Bromohexidine Hcl/ 2200 | --- | 39732.00 | 51964.00 | 34870.00 | --- |
| 3 | TAB- WARF 5 MG/ Warfarine Sodium/ 3000 | --- | 5985.00 | --- | --- | --- |
| 4 | SYP- DIXIN PEAD/ Digoxin/ 50 | --- | --- | --- | --- | --- |
| 5 | NEXPRO SACHET/ Eso meprazole/ 200 | --- | --- | --- | --- | --- |
| 6 | TAB-ALLUPENT/ Orceprinaline/ 1200 | --- | --- | --- | --- | --- |
| 7 | TAB-ECOSPRINE GOLD 10 MG/ Atorvastatin 10 mg, Clopidogreil 175, Asprin 75 mg/ 8000 | --- | --- | --- | --- | --- |
| 8 | TAB- ASSURANCE 20MG/ Sidnafill/ 300 | --- | 3597.00 | --- | --- | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | TAB- CUDE-FORTE/ Streptococcus Thermophilus & Lactobacillus Acidophilus Bifidobacterium Longum/ 20 | --- | --- | --- | --- | --- |
| 10 | TAB- ALLEGRA 120MG/ Fexofenadine Hcl/ 100 | 2730.00 | 399.00 | 268.00 | 295.00 | **175.35** |
| 11 | TAB- ALFUSIN- D/ Alfuzosin Hcl & Dutasteride/ 700 | --- | **11686.00** | --- | --- | --- |
| 12 | TAB- EDEVERAN 30 MG/ Endrovan/ 300 | --- | --- | --- | --- | --- |
| 13 | TAB- MODALERT 100 MG/ Modafinil/ 600 | --- | --- | --- | --- | **3458.70** |
| 14 | TAB- MINIPRSS XL 5 MG/ Prazosin Hcl/ 400 | --- | 1680.00 | --- | --- | **1365.00**<br>2734.20 |
| 15 | TAB- PLETOZ 100MG/ Cilostarole/ 150 | ---<br>--- | 1834.00<br>--- | ---<br>--- | ---<br>--- | **674.10**<br>1387.58 |
| 6 | TAB- TRENTAL 400 MG/ Pentoxyfylline 400 mg/ 300 | --- | --- | --- | --- | --- |
| 17 | TAB- COMPLAMINA/ Xantinol nicotinate/ 300 | --- | --- | --- | --- | --- |
| 18 | SYP. SUCRALFATE/ Suspension Sucralfate/ 50 | --- | --- | 1837.50 | **1207.50** | --- |
| 19 | SYP. SIMYL MCT/ PROTEIN/ 25 | --- | --- | --- | --- | --- |
| 20 | TAB- SPORLAC SACHET/ Lactic Acid Bacillus/ 700 | --- | --- | **3654.00** | --- | --- |
| 21 | TAB- CEFODOXIME 200 MG/ Cepodoxime sodium/ 5000 | 388500.00 | 3675.00 | 34250.00 | 34100.00 | **23047.50**<br>42210.00<br>35910.00 |
| 22 | TAB- CEPODFRM XP/ Cepodoxime with clavanic acid/ 5000 | --- | 8765.00 | --- | **42500.00** | 45360.00 |
| 23 | CAP- ECOSPRIN GOLD 20 MG/ Aspirin 75 mg, Atorvastatin 20 mg & Clopidogel 75mg/ 15000 | --- | --- | --- | --- | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 24 | CAP-ECOSPRIN AV (75+20)/ Aspirin 75 mg & Atorvastatin 20 mg/ 5000 | --- | — | --- | — | --- |
| 25 | CAP- METOPROLOL + HTZ (25+12.5) MG/ Metoprolol succinate 25 mg & hydrochlor thigzide 12.5 mg/ 500 | --- | --- | --- | — | 1905.75 |
| 26 | INJ. MORPHINE SULPHATE/ Bupriqesica/ 100 | --- | --- | — | — | --- |
| 27 | INJ. CEFZBOLINE 500 VIAL/ Cefazoline/ 200 | --- | --- | — | --- | --- |

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, राजीवगांधी जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार घेणा-या रुग्णांकरिता औषधे खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१० **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Semi Automatic Rotary Microtome खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.८,२५,५२५/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.12/06/2013 रोजीचे मागणीपत्रान्वये 01 नग Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Microtome हे सन 2006 साली M/s. Sanjay Scientific Co., Mumbai यांचेकडुन रक्कम रु 19642/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून ते व्यवस्थित काम देत नाही, तसेच कंपनीने त्यांचे Production बंद केलेले असून दुरुस्तीसाठी त्यांचे स्पेअर्स पार्टस् देखील उपलब्ध होत नाही. सध्या त्यांचेकडे असलेले मशिन हे Mannual असल्यामुळे Testing साठी वेळ लागतो व Proper Output मिळत नाही. तसेच सध्या रुग्णालयात पेशंटची संख्या वाढत आहे, त्यामुळे त्यानी नवीन Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त Semi Automatic Rotary Microtome खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.27/06/2013 रोजीचे दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Semi Automatic Rotary Microtome | 01. | 825525.00 | 825525.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **825525.00** |

दि.14/11/2013 रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. 900 अन्वये वरील मागणीप्रमाणे Semi Automatic Rotary Microtome 01 नग विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. 825525/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात देशदुत-अहमदनगर, युवा वार्ता - संगमनेर, लोकमंथन - नाशिक या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.01/02/2014 ते 15/02/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.18/02/2014 अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण 12 उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.7005 दि 29/01/2014 अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात 02 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Labcon Scientific Instrument Pvt. Ltd , Mumbai | 17/02/2014 |
| 2 | Leica / Micro Systems, Mumbai | 18/02/2014 |

अ) तेव्हा उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 02 सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

किंवा

ब) या कामी फेर निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

वरीलप्रमाणे अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. 12/04/2014 रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णय होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे निर्णय क्रमांक 278 अन्वये ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी सार्वमत - अहमदनगर, देशदूत- नाशिक या वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन दि. 12/05/2014 ते दि. 24/05/2014 पर्यंत निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. 27/05/2014 अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण 12 अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र. 764 दि. 06/05/2014 अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते परंतु फेर जाहिरातीस अनुसरून देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहे.

तेव्हा अ) उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 02 सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

किंवा

ब) या कामी पुन्हा तिसऱ्यांदा निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

वरीलप्रमाणे अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. 07/08/2014 रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णय होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे निर्णय क्रमांक 675 अन्वये ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री- प्रेस जरनल- मुंबई, लाईफ 365 इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. 25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण 72 पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

परंतु, तिस-यादा दिलेल्या फेर जाहिरातीस अनुसरुन देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरून दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्यामुळे सदर 02 सिलबंद तांत्रिक निविदा मा.उप समिती सभेपुढे संबंधीत निविदाधारकांचे समक्ष उघडून निर्णय घेणेकामी प्रस्ताव मा.उप समिती सभेपुढे सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Semi Automatic Rotary Microtome खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

११ **श्री साईबाबा रुग्णालयातील ई.डी.पी. विभागाकरीता टोनर व कार्टेज खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक व कमर्शियल निविदा उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.२,१९,५००/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड व इतर विभागांत वेगवेगळ्या प्रकारच्या प्रिन्ट काढणेसाठी टोनर व कार्टेज ची आवश्यकता असते. सध्या त्यांच्याकडे असलेले टोनर हे वापरुन खराब झालेले आहे, तसेच खराब होत आलेले आहे. त्यामुळे दैनंदिन काम करतांना अडचणी येतात. त्यामुळे त्यांनी नवीन टोनरची मागणी केलेली आहे.

सदर टोनरची मागणी वार्षिक सन 2013-14 मध्ये केलेली नव्हती. कारण ई.डी.पी. विभाग हा माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दि. 25/12/2012 रोजी वर्ग करण्यात आले होते. त्यानंतर दि. 28/01/2014 रोजी ई.डी.पी. विभाग पुन्हा स्वतंत्र करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांनी वार्षिक सन 2013-14 चे खरेदीमध्ये मागणी केलेली नव्हती. म्हणून सदर खरेदी करणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| अ.नं. | तपशिल | कंपनी | खरेदी नग | अंदाजे किंमत प्रति नग | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | HP 1020 Laserjet - Toner Q2612A/ 12A | HP | 25 नग | 4,500.00 | 1,12,500.00 |
| 2 | HP Laserjet CP 1025 COLOR – Toner CE310 A BLACK | HP | 01 नग | 5,000.00 | 5,000 00 |
| 3 | HP Laserjet CP 1025 COLOR – Toner CE311 A Cyan | HP | 01 नग | 5,000.00 | 5,000.00 |
| 4 | HP Laserjet CP 1025 COLOR- Toner CE312 A Yellow | HP | 01 नग | 5,000.00 | 5,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | HP Laserjet CP 1025 COLOR- Toner CE313 A Magenta | HP | 01 नग | 5,000.00 | 5,000.00 |
| 6 | HP Laserjet 3392 - Toner 49 A | HP | 02 नग | 3,500.00 | 7,000.00 |
| 7 | HP Laserjet M 1136 MFP – Toner CC 388 A / 88 A | HP | 10 नग | 3,000.00 | 30,000.00 |
| 8 | EPSON LQ 2090- Reboun Cartridge | EPSON | 5 नग | 1,000.00 | 5,000.00 |
| 9 | EPSON FX 2090- Reboun Cartridge | EPSON | 5 नग | 1,000.00 | 5,000.00 |
| 10 | Canon LBP 2900 B– Toner 103/303/703 | Canon | 10 नग | 4,000.00 | 40,000.00 |
| **(अक्षरी रक्कम रु. दोन लाख एकोणावीस हजार पाचशे मात्र) एकूण रक्कम रु.** | | | | | **2,19,500.00** |

उपरोक्त टोनर व कार्टेज खरेदीकामी अंदाजे रु. 2,19,500/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

दि.28/08/2014 निर्णय क्र. 734 अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील ई.डी.पी. विभागाकरिता टोनर व कार्टेज खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.2,19,500/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री- प्रेस जरनल- मुंबई, लाईफ 365 इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण 04 पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात 01 निविदा प्राप्त झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात 06 निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण 07 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr. no. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| Shirdi Office | | |
| 1. | M/s. Godavari Enterprises, Nashik | 25/11/2014 |
| Mumbai Office | | |
| 1. | M/s. Devish Enterprises, Mumbai | 17/11/2014 |
| 2. | M/s. Bahuchar Traders, Mumbai | 20/11/2014 |
| 3. | M/s. Classic Stationers Co., Mumbai | 21/11/2014 |
| 4. | M/s. Milan Stationers & Printers, Mumbai | 24/11/2014 |
| 5. | M/s. Sai Info Services, Mumbai | 25/11/2014 |
| 6. | M/s. Shree Enterprises, Kalyan | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 07 सिलबंद तांत्रिक व कमर्शियल निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांच्या समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Description | M/s. Godavari Enterprises, Nashik | M/s. Devish Enterprises, Mumbai | M/s Bahuchar Traders, Mumbai | M/s. Classic Stationers Co., Mumbai | M/s Milan Stationers & Printers, Mumbai | M/s. Sai Info Services, Mumbai | M/s. Shree Enterprises, Kalyan |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | HP 1020 Laserjet - Toner Q2612A /12A **25 nos.** | 2916.00 | 2730.00 | 2756.25 | 3161.55 | **2724.75** | 4100.00 | 3700.00 |
| 2 | HP Laserjet CP 1025 COLOR - Toner CE310 A BLACK **01 nos.** | 3360.00 | 2730.00 | 2761.50 | 3148.95 | **2724.75** | 3788.00 | 3700.00 |
| 3 | HP Laserjet CP 1025 COLOR – Toner CE311 A Cyan **01 nos.** | 3118.00 | 2992.50 | 3039.75 | 3358.45 | **2989.35** | 4043.00 | 3500.00 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | HP Laserjet CP 1025 COLOR- Toner CE312 A Yellow **01 nos.** | 3118.00 | 2992 50 | 3039.75 | 3358.95 | <u>**2989.35**</u> | 4043.00 | 3500 00 |
| 5 | HP Laserjet CP 1025 COLOR- Toner CE313 A Magenta **01 nos.** | 3318.00 Toner CE412A | 2992 50 | 3039.75 | 3358 95 | <u>**2989.35**</u> | 4043.00 | 3500.00 |
| 6 | HP Laserjet 3392 - Toner 49 A **02 nos.** | 5134 00 | 4252 50 | 4305 00 | 4280.85 | <u>**4242.00**</u> | 5544.00 | 5500.00 |
| 7 | HP Laserjet M 1136 MFP - Toner CC 388 A / 88 A **10 nos.** | 3105.00 | 2677.50 | 2700.60 | 3148.95 | <u>**2672.25**</u> | 3869.00 | 3800.00 |
| 8 | EPSON LQ 2090 - Ribben Cartridge **05 nos.** | 945.00 | 813.75 | 822.15 | 982.00 | <u>**810.60**</u> | 1444.00 | 1500.00 |
| 9 | EPSON FX 2090 - Ribben Cartridge **05 nos.** | 341.00 | 262.50 | 273.00 | 395.85 | <u>**259.35**</u> | 1386.00 | 1500.00 |
| 10 | Canon LBP 2900 B - Toner 103/303/703 **10 nos.** | <u>**2748.00**</u> | 3412.50 | 3431.40 | 3118.50 | 3408 30 | 3696 00 | 3800.00 |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ई.डी.पी. विभागाकरीता टोनर व कार्टेज खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **संस्थानचे साईप्रसादालय येथे क्लोकरुमची व्यवस्था करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोट कलम (1) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्ताव:-** साई मंदिर सुरक्षे संदर्भात झालेल्या सभेचे इतिवृत्त, जा.क्र.९५३/२०१४,दि.२४/१२/२०१४ व मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात साई मंदिर व संस्थान परिसर सुरक्षाकामी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जा.क्र.४३७९/ २०१४, दि.२२/१२/२०१४ तसेच संरक्षण विभागाचे जा.क्र.९११/२०१४, दि.१८/१२/२०१४ पत्राव्दारे श्री साईप्रसादालयाचे प्रवेशव्दारावर साईभक्तांच्या जवळील बॅग, मोबाईल, आयपॅड ठेवणेकामी प्रसादालय अधिक्षक, उपकार्यकारी अभियंता बांधकाम व मेकॅनिकल विभाग प्रमुख यांनी संयुक्तरित्या जागेची पाहणी करुन ठिकाण निश्चित करुन लॉकर तयार करणेकामी कार्यवाही करावी असे कळविलेले आहे. त्यानुसार दि. २६/१२/२०१४ रोजी प्रसादालय अधिक्षक व मेकॅनिकल विभाग प्रमुख यांचे समवेत पहाणी केलेली असून श्री साईप्रसादालयाचे दक्षिणेकडील कंपाऊड भिंतीचे आतील बाजूने दोन्ही प्रवेशव्दारांचे मधिल मोकळया जागेत साईभक्तांच्या बॅग व इतर साहित्य ठेवणेसाठी क्लोकरुम तयार करता येईल, असे ठरले आहे.

त्यानुसार साईप्रसादालयाचे प्रवेशव्दारावर २० फुट लांब व १० फुट रुंद मापाचे कलर कोटेड पत्रे वापरुन शेड बनविणेकामी जिल्हा दर सुची २०१३-१४ नुसार अंदाजे रुपये २,२३,७२६/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे रक्कम रुपये २,२३,७२६/- मात्रचे खर्चास व विहीत पद्धतीने निविदा मागवून काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईप्रसादालय येथे क्लोकरुमची व्यवस्था करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,२३,७२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१३ **स्नान गृहासाठी प्लॅस्टिक स्टुल खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद-** १)- २१ चा (१) चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२)- (ख)-भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**प्रस्ताविक-** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत सन १९९४ पासुन साईभक्तांचे सेवेत आहे. सदर इमारतीमध्ये एकुण ४८४ खोल्या व हॉल आणि १९८ लॉकर्स वापरात आहे. विभागाकडील प्रत्येक खोलीमध्ये स्वंतत्र संडास तथा स्नानगृहाची सोय आहे. अत्यल्प सेवाआकार, मोफत बस सेवा, निसर्गरम्य वातावरण, चहा, नाष्टा प्रसादभोजनाची व्यवस्था तथा २४ तास पाण्याची उपलब्धता असल्याने साईभक्तांचा मोठया प्रमाणावर ओघ या इमारतीकडे असतो.

साईभक्तांच्या सोयीसाठी उपलब्ध खोल्यांपैकी ३०५ खोल्या ऑनलाईनसाठी व १७९ खोल्या थेट येणा-या साईभक्तांसाठी उपलब्ध आहेत. खोल्यामधील स्नानगृहामध्ये बसुन स्नान करता यावे,यासाठी प्रत्येक खोल्यांचे स्नानगृहामध्ये एक प्लॅस्टिक स्टुल ठेवल्यास साईभक्तांची चागली सोय होईल.

**विभागाची मागणी-** स्नानगृहामध्ये साईभक्तांना स्नान करतांना बसण्यासाठी प्रत्येकी एक नग प्लॅस्टिक स्टुल ठेवल्यास जेष्ठ नागरीक, अपंग, आजारी, साईभक्तांना बसण्यास अडचण येणार नाही व प्रत्येकास व्यवस्थीत बसुन स्नान करता येईल असे नम्र मत आहे. यासाठी आपणास खालीलप्रमाणे प्लॅस्टिक स्टुल खरेदी करावे लागणार आहे त्यासाठी येणारे अंदाजे खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशील | आवश्यक नग | अंदाजे प्रति नगाची किंमत रुपये/पैसे | एकूण अंदाजे येणारा खर्च रुपये/पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | प्लॅस्टिक अनब्रेकेबल स्टुल नामांकित कंपनी | ५०० | ३००/- | १,५०,०००/- |

(अक्षरी रुपये एक लाख, पन्नास हजार, मात्र)

**छाननी करुन अनुमान-** सदर प्लॅस्टिक स्टुल उपरोक्त नमुद अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन खरेदी करता येतील. सदर कामी येणा-या अंदाजे खर्च रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख, पन्नास हजार) मात्रची तरतुद सन २०१५-२०१६ चे अर्थसंकल्पामध्ये करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** सदर प्लॅस्टिक स्टुलमुळे साईभक्तांची होणारी सोय विचारात घेता येणा-या अंदाजे खर्च रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख, पन्नास हजार) मात्रला तथा प्लॅस्टिक स्टुल नामांकित कंपनीकडुन खरेदी विभागामार्फत टेडंर पध्दतीने खरेदी करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. उपसमितीचे समोर सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील खोल्यांमधील स्नान गृहासाठी आवश्यक असलेले ५०० नग नामांकित कंपनीचे प्लॅस्टिक स्टुल खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

१४ **सन २०१६-२०१७ या वर्षासाठी उदी चाळणे दराचे मंजूरीबाबत.**

श्रीसाईबाबा हयात असतांना द्वारकामाई धुनीमध्ये तयार झालेली उदी साईभक्तांना प्रसाद म्हणून स्वहस्ते वाटत असे. तीच पद्धत श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर चालू ठेवण्यात आलेली आहे. श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर सदर पवित्र उदी चाळण्याचे काम श्रीमती पार्वताबाई चंद्रभान भालेराव, रा.शिर्डी या करीत होत्या. त्या वयोवृद्ध झाल्यामुळे सन-१९९४ पासूनत्यांच्या सुनबाई सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव, रा.शिर्डी या उदी चाळण्याचे काम करीत आहेत. एकंदरीत सुमारे ८० ते ८२ वर्षांपासून उदी चाळण्याचे काम शिर्डीतील भालेराव कुटूंब उक्ती मजूरी पद्धतीने काम करीत आलेले आहे.

उदी चाळण्याचे काम अत्यंत अत्यंत त्रासाचे असून उदी चाळतांना नाका-तोंडात उदीचे अतिशय बारीक कण जातात. असे कठीण काम सदर कुटूंब गेल्या ८०-८२ वर्षांपासून करीत आहे. प्रतिदिन २॥ ते ३ गोण्या उदी चाळण्यात येते. प्रति महिन्यामध्ये साधारणत: ७५ ते ७८ गोण्या चाळणेचे काम करत आहेत. माहे-एप्रिल-२०१४ ते माहे-मार्च-२०१५ या कालावधीत उदी चाळणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-०१/३५१/२०१४,दि.२६/०४/२०१४ अन्वये प्रति गोणी रु.२००/- प्रमाणे मजूरी देण्यात आलेली आलेली आहे. माहे-मार्च-२०१५ अखेर सदर मंजूरी संपणार आहे. त्याच करिता सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यानी दि.२३ जानेवारी,२०१५ चे अर्जान्वये पुढील वर्षाकरिता आहे त्याच दरामध्ये (रु.२००/- प्रति गोणी) उदी चाळण्याचे काम मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सन २०१४-१५ मध्ये माहे-एप्रिल-२०१४ ते माहे-डिसेंबर-२०१४ अखेर एकूण ६८४ गोणीउदी चाळण्यात आलेली असून प्रती गोणी रु.२००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.१,३६,८००/- इतकी मजूरी आदा करण्यातआलेली आहे. सन-२०१५-१६ मध्ये अंदाजे १००० गोणी चाळण्याकरिता प्रति गोणी रु.२००/- प्रमाणे अंदाजे एकूण रु.२,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांना उदी चाळणीचे आहे त्याच दरामध्ये (रु.२००/- प्रति गोणी) माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ अखेर या कालावधीसाठी काम देणेकरिता सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा.उपसमितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**उपरोक्त प्रसतावावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांना मागील वर्षीचे दरामध्ये (रु.२००/- प्रति गोणी) माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ अखेर या कालावधीसाठी उदी चाळणीचे काम देणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

१५ **गोवरी खरेदी करणेकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन बंद निविदा मागविणेबाबत.**

साईभक्तांना पवित्र उदीचे वाटप करण्यासाठी मंदिरा विभागामार्फत प्रति वर्षी श्रींचे द्वारकामाईचे धुनीकरिता गोवरी खरेदी करण्यात येतात. मागील वर्षी सन-२०१४-१५ करिता १,००,००० किलो रानशेणी व २५,००० किलो प्लॅस्टीक कागदावर थापून वाळविलेली गोवरी घेण्यात येत आहे. माहे-मार्च -२०१५ अखेर निविदेची मुदत संपणार आहे. सना-२०१३-१४ मध्ये खरेदी केलेल्या१,१५,९९० किलो गोवरी पैकी अद्याप २१,६०५ किलो गोवरी शिल्लक आहे. तसेच २०१४-१५ या आर्थिक वर्षात गोवरी पुरवठा येणे बाकी आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षासाठी अंदाजे १,१०,००० किलो रानशेणी व २०,००० किलो प्लॅस्टीक कागदावर थापलेली व वाळविलेली गोवरी खरेदी करावी लागणार आहे. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.१५,००,०००ची तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी खालीलप्रमाणे गोवरी खरेदी करणेकरिता पुरवठादारांकडून दरपत्रक (निविदा) मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात देणे गरजेचे आहे.

| अ.क्र | तपशील | | अदाजे मागणी | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रुपये | एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| अ) | गोवरी खरेदी | रानशेणी गोवरी | १,१०,००० किलो | ०७ | ५० | / किलो | ८,२५,०००/- | ९,७५,०००/- |
| | | थापील गोवरी | २०,००० किलो | ०७ | ५० | / किलो | १,५०,०००/- | |

तरी उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रति वर्षाप्रमणे माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च -२०१६ अखेर या आर्थिक वर्षाकरिता द्वारकामाईचे पवित्र धुनीकरिता गोवरी खरेदी करणेकरिता जनसंपर्का कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविणेसाठी मान्यता घेणेकामी मा.उपसमितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे-एप्रिल-२०१५ ते माहे मार्च- २०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये द्वारकामाईचे पवित्र धुनीकरिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे गोवरी खरेदी करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

१६ **फुटाणे, विड्याची पाने व पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणेकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन बंद निविदा मागविणेबाबत.**

अ) मंदिर विभागात श्रींचे धुपारतीनंतर दर शुक्रवारी एकादशी वगळता फुटाणेचा प्रसाद वाटण्यात येतो. सन २०१४-१५ करिता स्थानिक फुटाण्याचे व्यापारी यांचेकडुन दर शुक्रवारी ९ किलो फुटाणे मंजूर न्युनतम दराने खरेदी करण्यात येत आहे. माहे-मार्च-२०१५ अखेर फुटाणे खरेदीची मुदत संपणार आहे. माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षात प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी ९ किलो प्रमाणे अंदाजे वार्षिकखरेदीत ४५० किलो फुटाणे खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकामी समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये रु.१,००,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

ब) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत मंदिर परिसरात श्रीसाईसत्यव्रत पूजा हॉलमध्ये दररोज श्रीसाईसत्यव्रत पूजा करण्याची सुविधा आहे. प्रत्येक पूजेकरिता पुजेच्या कौरंगावर दोन विड्याची पाने ठेवावी लागतात. करिता स्थानिक दुकानदारयांचेकडुन प्रति शेकडा प्रमाणे मंजूर न्युनतम दराने दराने विड्याचीपाने खरेदी करण्यात येतात. माहे-मार्‍-२०१५ अखेर सदर विड्याची पानेखरेदीची मुदत संपणार आहे. माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षात सत्यनारायण पूजेकरिता विड्याची पाने खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच अभिषेक पूजा मांडणी करुन सत्यनारायण पूजेप्रमाणे करणे प्रस्तावीत असल्याने त्या करिता सुद्धा विड्याची पाने लागणार आहेत. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.१,६०,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

क) श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देशातून तसेच विदेशातून अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचीत सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष साहेब, मा.उपाध्यक्ष साहेब, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी साहेब अथवा मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांचे सत्कार प्रसंगी पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थानमधुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत मा.कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते मार्बल पावडर मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो. याकरिता प्रति वर्षी मागणीनुसार ३ नंबर, ४ नंबर, ५ नंबरच्या पावडर मार्बल मूर्ती खरेदी करण्यात येतात. सन-२०१४- २०१५ची

पावडर मार्बल मूर्ती पुरविण्याची मुदत दि.३१ मार्च २०१५ अखेर संपत असल्यामुळे माहे- एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ या वर्षाकरिता पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणेकामी दरपत्रके (निविदा) मागविणे आवश्यक आहे.

ड) तसेच मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती,मा.मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, भारत सरकार, मा.सुप्रिमकोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी., व्ही.आय.पी. व इतर महत्वाचे व्यक्ती श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी प्युअर मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केट मधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेस व त्याचे होणारे बीलाची रक्कम लेखाशाखा विभागामार्फत अदा होणेस मान्यता असावी, ही विनंती.

तसेच व्हीव्हीआयपीसाठी प्युअर मार्बल मूर्ती स्थानिक व्यापारी यांचेकडुन आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी थेट खरेदी करणेकामी व सदर बील लेखाशाखेमर्फत अदा होणेस मान्यता मिळावी, ही विनंती. सदर पवडर मार्बल मूर्ती व प्युअर मार्बल मूर्ती खरेदीकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये रु.७,००,०००/- ची तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी खालीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी पुरवठादारांकडुन दरपत्रके (निविदा) मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात देणे गरजेचे आहे.

| अ.क्र | तपशील | | अंदाजे मागणी | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रु. | एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| अ) | चणा-फुटाणा | | ४५० किलो | ६० | ०० | /किलो | २७,०००/- | २७,०००/- |
| ब) | नागीणीचे पाने | | २,९०,००० नग | ०० | ५५ | /नग | १,६०,०००/- | १,६०,०००/- |
| क) | पावडर मार्बल मूर्ती | ०३ नंबर मुर्ती | ५० नग | ११० | ०० | /नग | ५,५००/- | ६१,०००/- |
| | | ०४ नंबर मुर्ती | १०० नग | १६५ | ०० | /नग | १६,५००/- | |
| | | ०५ नंबर मुर्ती | ७५ नग | ५२० | ०० | /नग | ३९,०००/- | |

तरी उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रति वर्षाप्रमाणे माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षाकरिता 'ड' प्रमाणे प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी करणेस व त्याचे होणारे बीलाची रक्कम लेखाशाखा विभागामार्फत अदा होणेस मान्यता असावी, तसेच अ, ब, क करिता जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बंद पाकीटात निविदा (दरपत्रके) मागविणेसाठी मा.उपसमितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे-एप्रिल-२०१५ ते माहे मार्च- २०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फुटाणे, विडयाची पाने व पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,४८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

१७ **वाहन क्रमांक एमएच- १७ व्ही- ९९७७ करीता नवीन डिक्स खरेदीकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील वाहन क्रमांक एमएच 17 व्ही-9977 (टोयोटो) या वाहनाचा वापर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचेसाठी संस्थानचे कार्यालयीन कामकाजाकरीता होत आहे. सततचे वापरामुळे तसेच खराब रस्त्यातील खड्यामुळे वाहनांचे डिक्स बेंड झालेने खबरदारीचा उपाय म्हणुन तातडीने

वाहन विभागाकडील दि.27/11/2014 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये, रक्कम रु.20,000/- (अक्षरी रक्कम रु. विस हजार) दोन डिक्स खरेदी करणे कामी मंजुरी घेण्यात आली होती.

तथापी प्रत्यक्षात डिक्स टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलर वासन ब्रदर्स प्रा.लि. नाशिक यांचेकडुन खरेदी करतेवेळी दरवाढीमुळे प्रत्यक्ष बिलाची रक्कम रु.27,186/- (अक्षरी रक्कम रु.सत्ताविस हजार एकशे श्याऐंशी) सर्वकरासहीत झालेली आहे.

प्रस्तुत वाढीव रक्कमेबाबत चौकशी केली असता एमएच 17 व्ही- 9977 या वाहनांचे मॉडेल सुधारीत असलने डिक्सची किमंत जास्त् असलेचे सांगण्यात आले. अत्यावश्यक बाब असलेने दोन डिक्स खरेदी करुन वाहनांस बसविण्यात आले आहे.

वरील प्रमाणे वाहन क्रमांक एमएच 17 व्ही-9977 करीता नवीन डिक्स् खरेदी करणे कामी रु.27,186/- (अक्षरी रक्कम रु.सत्ताविस हजार एकशे श्याऐंशी) मात्र खर्च आलेला आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** आर्थिक खर्चाची बाब आहे.

**मागणी/ विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** वाहनांचे नवीन डिक्स् खरेदी करणेकामी आलेल्या एकुण रक्कम रु.27,186/- (अक्षरी रक्कम रु.सत्ताविस हजार एकशे श्याऐंशी) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्रमांक एमएच- १७ व्ही- ९९७७ करीता नवीन डिक्स खरेदीकामी आलेल्या रु.२७,१८६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

१८ **कॅन्टीन व नाष्टा पाकिटे काऊंटर संगणकीकृत करणेसाठी केसींग केपींग पट्टी व त्यात LAN केबल टाकूण मिळणेचे कामाबाबत.**

संस्थानचे विविध ठिकाणी चहा व नाष्टा विक्री काऊंटर चालू करणेबाबत मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी निर्देश दिलेले आहेत. तसेच मेकॅनिकल विभाग, प्रसादालय लॅब व ज्युनिअर कॉलेज येथील ऑफीस संगणकीकरण करावयाचे प्रस्तावित असल्याचे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी कळविलेले आहे.

त्याप्रमाणे साईआश्रम भाग-०१ येथील ए आणि जे इमरतीमधील चहा काऊंटर्स, ५०० रुम येथील नाष्टा पाकीट विक्री काऊंटर्स, मंदिर परीसरातील शनिगेट जवळील चहा काऊंटर्स, पब्लीकेशन मंदिर परीसरातील काऊंटर्स, व्दारावती येथील प्रत्येक माळयावरील संगणक काऊंटर्स, साईप्रसादालय येथील ऑफीस तसेच मेकॅनिकल विभागाचे ऑफीस संगणकीकरण करावयाचे प्रस्तावित असुन उपरोक्त ठिकाणी तसेच संस्थानचे विविध विभागांचे आवश्यकतेनुसार व मागणीनुसार लॅन केबल टाकणेसाठी केसींग केपींग व त्यात LAN केबल टाकून मिळणेबाबतही माहिती तंत्रज्ञान विभागाने कळविलेले आहे. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी कळविलेप्रमाणे उपरोक्त ठिकाणी संगणकीकरणाची केबल टाकणेकरीता आवश्यक असलेली केसींग केपींग विद्युत विभागाच्या सबस्टोअरमध्ये तसेच संस्थानच्या मेन स्टोअरमध्ये उपलब्ध नाही. सदरची केसींग केपींग करणेच्या कामाकरीता प्रस्ताव सादर करावा लागणार आहे.

तथापी यापुर्वी संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथील कॉम्प्युटर लॅबमधील कॉम्प्युटरकरीता व LAN केबलकरीता केसींग केपींग तसेच कार्यालयामधील विद्युतीकरणाचे काम करणेकरीता श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे जा.नं.एसएसएस-वशी-कनिष्ठ/४६७३/२०१३ दि २५-०२-२०१३ रोजीच्या पत्रान्वये सदर ठिकाणी केसींग केपींग वायरींग करणेकरीता विद्युत विभागामार्फत दिनांक ३१-०३-२०१३ रोजी प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२७-०४-२०१३ रोजीच्या सभेतील विषय नं.४२ निर्णय क्र.३८५ अन्वये सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला होता. त्यानंतर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी जा.नं.एसएसएस-वशी-कनिष्ठ/६०६/२०१४ दि.१३-०१-२०१४ रोजीच्या पत्रान्वये मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२७-०४-२०१३ रोजीच्या सभेतील विषय नं.४२निर्णय क्र.३८५ चे संदर्भात फेर प्रस्ताव सादर करणेबाबत मा.प्रशासकीय अधिकारी यांचे आदेशाने कळविण्यात आलेले होते. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे पत्रावरील आदेशान्वये विद्युत विभागामार्फत दिनांक ११-०२-२०१४ रोजी पुन्हा फेर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यास मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१५-०३-२०१४ रोजीच्या सभेतील विषय नं.५३ निर्णय क्र.२२३ अन्वये मान्यता देण्यात आली. त्यानंतर सदरचे काम करुन घेणेसाठी ठेकेदार यांचेकडुन प्राप्त झालेली टेंडर उघडून ठेकेदारांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा.व्यवस्थापन समितीच्या दि. १७-०७-२०१४ रोजीच्या सभेतील विषय नं.०३ निर्णय क्र.५६७ (१०) अन्वये मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांना जा.नं.एसएसएस/ विद्युत/ २८२१/ २०१४ दि.१०-०९-२०१४ अन्वये रु.४,२४,७४६/- इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथील लॅब व कार्यालयामधील विद्युतीकरणाचे काम करणेबाबत दोनदा सादर करण्यात आलेला प्रस्ताव व त्यानंतर प्रत्यक्षात ते मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांना कार्यादेश देण्यापर्यंत बराच कालावधी गेलेला असल्याने दरम्यानच्या काळात संस्थानकडे जसजसे मटेरीअल उपलब्ध होत गेले तसतसे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथील लॅब व कार्यालयामधील विद्युतीकरणाचे काम विद्युत विभागामार्फत करण्यात आलेले आहे. त्यामुळे राहिलेले काम मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचेमार्फत करण्यात आल्याने दिलेल्या कार्यादेशातील रक्कम रु.४,२४,७४६/- पैकी प्रत्यक्ष रक्कम रु.२,००,८६६/- इतकेच काम झालेले असुन कार्यादेशाप्रमाणे रक्कम रु.२,२४,१८६/- शिल्लक आहे.

माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी कळविल्याप्रमाणे उपरोक्त ठिकाणी संगणकीकरणाची केबल टाकणेकरीता आवश्यक असलेली केसींग केपींग विद्युत विभागाच्या सबस्टोअरला तसेच संस्थानच्या मेन स्टोअरमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी कळविलेले काम मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथील कॉम्प्युटर लॅबमधील कॉम्प्युटरकरीता व LAN केबलकरीता केसींग केपींग तसेच कार्यालयामधील विद्युतीकरणाचे कामाचे कार्यादेशातील शिल्लक असलेल्या टेंडरच्या रक्कमेमधुन (रु.२,२४,१८६/- मधून) मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचेकडून सदरचे काम करुन घेणेकरीता विद्युत विभागाकडून दिनांक ०१-०१-२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. या टिपणीवर हा विषय मा.उप समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असा आदेश झालेला आहे.

उपरोक्त आदेशानुसार मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगाव यांचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथील कॉम्प्युटर लॅबमधील कॉम्प्युटरकरीता व LAN केबलकरीता केसींग केपींग तसेच कार्यालयामधील विद्युतीकरणाचे कामाचे कार्यादेशील शिल्लक असलेल्या टेंडरच्या रक्कमेमधून (रु.२,२४,१८६/- मधून) मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचेकडून सदरचे काम करुन घेणे आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथील कॉम्प्युटर लॅबमधील कॉम्प्युटरकरीता व LAN केबलकरीता केसींग केपींग तसेच कार्यालयामधील विद्युतीकरणाचे कामाचे कार्यादेशील शिल्लक असलेल्या टेंडरच्या रक्कमेमधून (रु.२,२४,१८६/- मधून) मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचेकडून कॅन्टीन व नाष्टा पाकिटे काऊंटर संगणकीकृत करणेसाठी केसींग केपींग पट्टी व त्यात LAN केबल टाकूण मिळणेचे काम करुन घेण्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

१९ **समाधी मंदिर व दर्शन रांगेतील इमर्जन्सी लाईटकरीता युपीएस व बॅट-या खरेदी करणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

समाधी मंदिर व दर्शनरांगेमध्ये भक्तांची मोठया प्रमाण गर्दी होत असल्याने लाईट गेल्यानंतर जनरेटर सुरु होईपर्यंत काही मिनिटे पुर्णत: अंधार होतो. त्यामुळे काही दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी ईर्मजन्सी लाईट असणे आवश्यक आहे, असे संरक्षण विभागाचे पत्रानुसार सुचविण्यात आलेले आहे. ऊर्जा फाऊंडेशन, मुंबई यानी सोलर लाईट सिस्टीम देणगी स्वरुपात बसवून दिलेली आहे. सध्या सदर सिस्टीममार्फत फक्त समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, दर्शनरांग व भुयारी मार्ग येथील काही टयुबलाईट जोडलेल्या आहेत.

जेव्हा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय जातो तेंव्हा जनरेटर सुरु होईपर्यंत सोलर लाईट सिस्टीममार्फत त्या टयुबलाईट चालूच राहतात. तसेच दर्शनरांगेच्या चारही हॉलकरीता युपीएस बसवून त्याचेमार्फत काही टयुबलाईटला सप्लाय जोडलेला आहे. त्यामुळे युपीएस कनेक्शन वरील टयुबलाईट चालू राहतात.

पिंपळवाडी रोड शेजारी असणा-या दर्शनरांगेच्या शेडमध्ये ईर्मजन्सी लाईट व्यवस्था नाही. त्यासाठी युपीएस बसवून त्यामार्फत काही लाईट चालू करावे लागतील. त्यासाठी युपीएस व लीड ॲसीड बॅट-या किंवा ड्राय बॅट-या खरेदी कराव्या लागतील. तसेच दर्शनरांगेकरीता बसविलेले युपीएस व बॅट-या जुन्या झालेल्या आहे. त्या बदलणे गरजेचे आहे. त्यासाठी नवीन युपीएस व बॅट-या खरेदी करणे आवश्यक आहे. याकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | कंपनी | साईज | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | युपीएस | SU-KAM 5 MILEY | 2 KW/ 24V 1PHASE 50HZ | ०७ नग | रु. ९,०००/- | रु. ०,६३,०००/- |
| ०२) | लिड ॲसीड बॅट-या/ ड्राय बॅट-या | SF सोनिक/ हाय पॉवर | 12V 180 AH PBx 1800/ 12V 100 AH | १४ नग | रु. १३,०००/- | रु. १,८२,०००/- |
| | | | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २,४५,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे समाधी मंदिर व दर्शनरांगेतील ईर्मजन्सी लाईटबाबत नवीन युपीएस व बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,४५,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर आणि दर्शन रांगेतील इमर्जन्सी लाईटकरीता नवीन युपीएस व बॅट-या खरेदीकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

२० **श्री साईनाथ हॉस्पिटल तसेच द्वारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता मंजुर झालेल्या ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी कामाचे ई-टेंडर तयार करणेकरीता तसेच भविष्यात विद्युत विभागामार्फत निघणा-या कामाकरीता कन्सल्टंट नेमणेबाबत.**

साईभक्तांचे सोयी सुविधेकरीता निवासव्यवस्थेसाठी संस्थानमार्फत सन १९९९ मध्ये धर्मशाळेच्या दोन प्रशस्त इमारती बांधून साईभक्तांना निवासाकरीता चालू करुन देण्यात आलेल्या होत्या. त्या वेळेचा धर्मशाळेचा इलेक्ट्रीकल लोड लक्षात घेऊन धर्मशाळा परीसरामध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ११ के.व्ही.एच.टी.सप्लाय घेऊन सबस्टेशन मध्ये ५०० के.व्ही.ए.चा एक ट्रान्सफॉर्मर व २५० केव्हीए क्षमतेचे ०२ नग जनरेटरसेट बसविण्यात आलेले होते. त्यावेळी धर्मशाळेच्या दोन्ही इमारतींचा व परीसराचा साधारण लोड १०० KW इतका होता.

सन-२००५ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने श्री साईनाथ हॉस्पीटलचे नुतनीकरण व विस्तारीकरण करण्याचे ठरविल्याने श्री साईनाथ हॉस्पीटल धर्मशाळेच्या दोन्ही इमारतींमध्ये स्थलांतरीत करण्यात आले होते. श्री साईनाथ हॉस्पीटलचे जुन्या (सध्या श्री साईबाबा हॉस्पीटल असलेल्या) इमारतीचे नुतनीकरण विस्तारीकरण काम पुर्ण झाल्यानंतर त्याठिकाणी नव्याने श्री साईबाबा हॉस्पीटल चालू करण्यात आले व धर्मशाळा इमारतीमध्ये तात्पुरते स्थलांतरीत झालेले श्री साईनाथ हॉस्पीटल कायमस्वरुपी धर्मशाळा इमारतीमध्ये ठेवण्यात आले. श्री साईनाथ हॉस्पीटल मधील विविध मशिनरी व वातानुकुलीत यंत्रे तसेच लाईटींग लोड मिळून एकुण लोड २४० KW इतका आहे. तसेच श्री साईनाथ हॉस्पीटलमार्फत नविन ए.सी.बसविण्याची मागणी सतत होत आहे. त्यामुळे साईनाथ हॉस्पीटलचा इलेक्ट्रीकल लोड यापुढेही वाढण्याची शक्यता आहे.

तसेच सन-२०११ मध्ये धर्मशाळा परीसरामध्ये व्दारावती इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन सदरील इमारत साईभक्तांना निवासव्यवस्थेकरीता देण्याचे चालू करण्यात आले. व्दारावती इमारत नव्याने बांधण्यात आल्याने सदरील इमारतीचा लाईटींग लोड व वातानुकुलीत यंत्राचा लोड मिळून २९५ KW इतका लोड आहे.

दि.०५-१२-२०१३ चे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मिटींगमध्ये झालेल्या चर्चेनुसार तसेच व्दारावती विभागाने व्दारावती इमारतीवरील सोलर सिस्टीमचे हिटर चालू करुन देणेबाबत कळविले आहे. सोलर सिस्टीमच्या एकुण सर्व गिझर बॅकअप सिस्टीमचा लोड १९२ KW इतका आहे. म्हणजेच धर्मशाळा परीसरामधील सबस्टेशनचा श्री

साईनाथ हॉस्पीटल तसेच व्दारावती इमारत येथील एकुण लोड हा श्री साईनाथ हॉस्पीटलचा २४० KW, व्दारावती इमारतचा २९५ KW, सिस्टीमच्या गिझर बंकअपचा १९२ KW मिळून एकुण ७२७ KW इतका लोड आहे.

श्री साईनाथ हॉस्पीटल व व्दारावती इमारत येथील जनसेट व सबस्टेशन हे १९९९ साली बसविण्यात आलेले आहेत त्यांना आता १४ वर्ष झाल्याने व तेथील इलेक्ट्रीकल लोड सतत वाढत असल्याने ओव्हलोडमुळे जनसेट व इतर मशिनरी गरम होऊन बंद पडत आहे. तसेच एखादेवेळी जनसेट व ट्रान्सफॉर्मर फेल होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामळे याठिकाणच्या सबस्टेशनमधील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल, जनरेटर व पॅनेल बोर्ड हे नविन खरेदी करून बसविणेकरीता तसेच नविन जनरेटर सेटकरीता नविन जनरेटर रुमचे बांधकाम करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१५-०३-२०१४ चे सभेतील विषय क्र.५० निर्णय क्र.२२० अन्वये रु. २,५०,८६,८१४/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची C.A.No.8706 OF 2014 IN P.I.L.NO.18 OF 2011 अन्वये रु.२,५०,८६,८१४/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. यामध्ये सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकामासाठी येणा-या रु.४०,००,०००/- (अक्षरी रु.चाळीस लाख मात्र) या खर्चाचा समावेश असुन सदरची रक्कम बांधकाम विभागाकडे वर्ग करावयाची आहे. त्यानुसार सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकामाची रक्कम वजा जाता रु.२,१०,८६,८१४/- इतकी रक्कम विद्युत विषयक कामास शिल्लक राहत असुन बाहेरील ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करून निविदा बोलविणेसाठी ई-निविदा तयार करणे आहे. यासाठी पॅनेलचे ड्राईंग, जनसेट ड्रॉईंग, पॅनेल डिटेल्स, जनसेट डिटेल्ससह टेंडर फॉर्म तयार करावे लागणार आहेत. आपणाकडे ड्रॉईंगसाठी लागणारे प्रिंटर्स उपलब्ध नाहीत. हे ड्रॉईंग मोठया आकाराचे पानावर तसेच ऑटोकॅडवर तयार करावे लागतात. त्यामुळे सदरचे काम हे कन्सल्टंटकडून करुन घेणेकरीता विद्युत विभागामार्फत दिनांक १६-१०-२०१४ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती.

या टिपणीवर कन्सल्टंट नेमणेकामी वर्तमान पत्रात तसेच वेबसाईटवर जाहीरात देणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असा आदेश झालेला आहे. त्यानुसार श्री साईनाथ हॉस्पीटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता मंजुर झालेल्या ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी कामाचे ई-टेंडर तयार करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१५-०३-२०१४ चे सभेत विषय क्र.५० निर्णय क्र.२२० अन्वये मंजुर झालेल्या रु. २,५०,८६,८१४/- मधुन सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकामासाठीची रक्कम रु.४०,००,०००/- (अक्षरी रु. चाळीस लाख मात्र) वजा जाता रु. २,१०,८६,८१४/- इतक्या २% दराप्रमाणे रु. ४,२१,७३६/- रक्कम कन्सल्टंट फी अदा करावी लागू शकते किंवा त्यापेक्षा कमीही फी अदा करावी लागू शकते.

उपरोक्त आदेशानुसार श्री साईनाथ हॉस्पीटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता मंजुर झालेल्या ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी कामाचे ई-टेंडर तयार करणेकरीता कन्सल्टंट नेमणेकरीता तसेच कन्सल्टंटची टेंडरमध्ये मान्य होणारी फी आदा करणेकरीता त्याचप्रमाणे भविष्यात विद्युत विभागामार्फत निघण्यात येणा-या कामाचे ई-टेंडर अथवा टेंडर तयार करणेकरीता कन्सल्टंट नेमणेकरीता वर्तमान पत्रात तसेच वेबसाईटवर जाहीरात देणे आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ हॉस्पिटल, द्वारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता मंजुर झालेल्या ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी कामाचे ई-टेंडर तयार करणे व भविष्यात विद्युत विभागामार्फत निघणा-या कामाकरीता कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, अर्ज मागविणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

२१ **बांधकाम विभागाकरीता Auto desk Auto CAD Design suite standard- 2015 Commercial New SLM ACE Promo ची Licensed Copy खरेदी करणेसाठी फेर-निविदा मागविणेबाबत व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुदः** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** मा.व्यवस्थापन समितीचे दि.06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं 955.

**प्रास्ताविकः** श्री साईबाबा संस्थानकरीता विविध बांधकाम प्रकल्प उभारणे, दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे तसेच इतर आर्किटेक्ट यांचेकडुन प्राप्त झालेले ड्राईंग संगणकावर बघता यावे व त्यात आवश्यकतेनुसार बदल करणेसाठी Auto CAD - 2015 Software खरेदीकामी बांधकाम विभागाने उपरोक्त संदर्भ क्रं. 01 अन्वये मागणी केलेली आहे. सदर Software माहिती तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध नसल्याने संबंधीत Software खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 955 अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती.

त्यानुसार Auto CAD- 2015 Software खरेदीसाठी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकाकडुन संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) संदर्भ क्रं. 04 चे मंजुर टिपणी अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा संदर्भ क्रं. 05 चे मंजुर टिपणी अन्वये मा. उप-

समितीचे दि. 23/12/2014 रोजीचे सभेत उघडणेसाठी सादर केले असता, दोनच निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असल्याने संदर्भ क्रं. 06 चे तुलनात्मक तक्त्यावरील मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार दोनच निविदा मुदतीत प्राप्त झाल्याने दोन्हीही निविदा रद्द करणेत येऊन, प्रस्तावीतकामी फेर निविदांची मागणी करणेत यावी, असे निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार प्राप्त निविदाधारकांचे अनामत रक्कमेचा डीडी सदर निविदाधारकास परत करता येईल व प्रस्तावीतकामी संबंधीत Software खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 955 अन्वये रक्कम रुपये 1,50,000/-+ टॅक्स चे खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु प्राप्त निविदेचे अवलोकन केले असता डॉलरचे दरात वाढ झाल्याने Auto CAD - 2015 Software चे दर देखील वाढल्याने प्राप्त निविदाधारकाचे नमुद दर हे 1,62,000/- च्या पुढे आहे. सबब Auto CAD - 2015 Software खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये 2,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी फेर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

**मागणीः** प्राप्त निविदाधारकांचे अनामत रक्कमेचा डीडी सदर निविदाधारकास परत करता येईल व प्रस्तावीतकामी संबंधीत Software खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 955 अन्वये रक्कम रुपये 1,50,000/-+ टॅक्स चे खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु प्राप्त निविदेचे अवलोकन केले असता डॉलरचे दरात वाढ झाल्याने Auto CAD - 2015 Software चे दर देखील वाढल्याने प्राप्त निविदाधारकांचे नमुद दर हे 1,62,000/- च्या पुढे आहे. सबब Auto CAD - 2015 Software खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये 2,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी फेर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मतः** Auto CAD - 2015 Software खरेदीसाठी फेर निविदा मागविणेस व डॉलरचे दरात वाढ झाल्याने Auto CAD- 2015 Software खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 2,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी फेर प्रस्ताव सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागाकरीता Auto desk Auto CAD Design suite standard- 2015 Commercial New SLM ACE Promo ची Licensed Copy खरेदी करणेसाठी फेर निविदा मागविणेस व डॉलरचे दरात वाढ झाल्याने Auto CAD- 2015 Software खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.2,00,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

२२ **श्री साईबाबा संस्थानचे महत्वाच्या कागदपत्रांना स्कॅनींग/ डिजिटाईज करणेकामी नामांकित कंपनीचे स्कॅनर मशिन खरेदी करणेबाबत.**

अभिलेख कक्ष विभागाकडे संस्थानचे इतर विभागाकडील जमा असलेले अ,ब व क वर्गवारीतील महत्वाचे कागदपत्र (साईलिला अंक, मा.व्यवस्थापन समिती इतिवृत्त, संस्थान मालमत्तेची खरेदीखते, नकाशे, विधी विभागाकडील कोर्ट कामकाजासंदर्भातील महत्वाची न्यायालयीन कागदपत्रे व इतर महत्वाची कागदपत्रे) भविष्यातील उपयुक्ततेच्या दृष्टीने त्यांचे संगणकीकरण करणे अत्यंत जरूरीचे आहे.

अभिलेख कक्ष विभागाकडे सध्या साईलिला अंक, व्हाऊचर्स वगळता अ,ब व क इतर विभागाकडील फाईल्स, रजिष्टर, वगैरे कागदपत्रांची मिळून अंदाजे ९,३८,३८८ पाने जमा झालेली आहेत. तसेच इतर विभागांचे ताब्यात सध्या कार्यालयीन वापराकरीता ताब्यात असलेल्या महत्वाच्या अ,ब व क वर्गवारीतील कागदपत्रांची माहीती घेतली असता अंदाजे २७,८०,८५२ पाने, अशाप्रकारे एकूण-३७,१९,२४० पाने स्कॅनींग करणे जरूरीचे आहे. सदरील कागदपत्रांचे स्कॅनींग/ डिजिटाईज करणेकामी अभिलेख कक्ष विभागाकडील दि.०१/११/२०१४ चे टिपणीनुसार प्रस्तावीत केलेप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी याकामी संस्थानने स्वतः स्कॅनींग मशिन खरेदी करून काम पुर्ण करावे असे ठरले आहे. यासंदर्भात आयटी विभागामार्फत Printech Infotech Service Pvt.Ltd, Mumbai यांचेकडून स्कॅनींग करणेबाबत प्रात्यक्षिक घेतले असून ते योग्य पध्दतीने व व्यवस्थित स्कॅनींग होत असल्याचे दिसून आले. असे स्कॅनींगचे दोन प्रकारचे मशिन खरेदी केल्यास अंदाजे रू.६,००,०००/- (सहा लाख रू.मात्र) खर्च येईल. अशा स्कॅनींग मशिनद्वारे फाईल्स व रजिष्टर दोन्हीही प्रकारच्या कागदपत्रांचं स्कॅनींग करता येईल. सदरचे स्कॅनींग मशिन आयटी विभागामार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करता येईल.

**मागणी:-** संस्थानने महत्वाचे कागदपत्र स्कॅनींग करणेकामी Kodak, Soni, Shivaji film, HP, Panasonic, अशा विविध नामांकीत कंपनीपैकी चांगल्या प्रतीच्या कंपनीचे दोन स्कॅनर मशिन खरेदी करण्यास अंदाजे रू.६,००,०००/- (सहा लाख रू.मात्र) अपेक्षित खर्च येईल. सदरचे स्कॅनींग मशिन आयटी विभागामार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करता येईल. सदरचा विषय मा.उप समितीचे सभेसमोर खर्चास मान्यतेसाठी सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमधील महत्वाच्या कागदपत्रांना स्कॅनींग/ डिजिटाईज करणेकामी नामांकित कंपनीचे स्कॅनर मशिन विहीत्त पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

२३ **संगणक स्टेशनरी खरेदीबाबत.**

संस्थानचे सर्व विभागांस दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-खरेदी/२०८१/२०१४ दि.१४.०८.२०१४ अन्वये माहिती नोंदविणेबाबत कळविण्यात आलेले होते. मुदतीअखेर विभागांकडून आलेल्या संगणक स्टेशनरीची मागणी एकत्रित करुन त्याचे परिशिष्ठ सोबत जोडलेले आहे.

यापुर्वी सन २०१३-१४ मध्ये वार्षिक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी एकत्रित करण्यात आलेली होती. सदर एकत्रित स्टेशनरी खरेदीस मा.व्य.समितीने व मा.उच्च न्यायालयाने रक्कम रु.२४,५०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी दिलेली होती.

कार्यालयीन व संगणक स्टेशनरीचे पुरवठाधारक हे वेगवेगळे असल्याने या वर्षी कार्यालयीन व संगणक स्टेशनरी यांची खरेदी वेगवेगळी करता येईल. सोबतच्या परिशिष्ठानुसार संस्थानचे विविध विभागांना आवश्यक संगणक स्टेशनरी खरेदीकामी अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.९,९०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्वद हजार) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.९,९०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्वद हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेत सादर करता येईल. मा.व्य.समितीची मान्यता मिळालेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून, स्टेशनरी खरेदी करता येईल.

तरी वरीलप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी संगणक स्टेशनरी खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.९,९०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्वद हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी संगणक स्टेशनरी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी)

---

२४ **कार्यालयीन स्टेशनरी खरेदीबाबत.**

संस्थानचे सर्व विभागांस दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-खरेदी/२०८१/२०१४ दि.१४.०८.२०१४ अन्वये माहिती नोंदविणेबाबत कळविण्यात आलेले होते. मुदतीअखेर विभागांकडून आलेली कार्यालयीन स्टेशनरीची मागणी एकत्रित करुन त्याचे परिशिष्ठ सोबत जोडलेले आहे.

यापुर्वी सन २०१३-१४ मध्ये वार्षिक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी एकत्रित करण्यात आलेली होती. सदर एकत्रित स्टेशनरी खरेदीस मा.व्य.समितीने व मा.उच्च न्यायालयाने रक्कम रु.२४,५०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी दिलेली होती.

कार्यालयीन व संगणक स्टेशनरीचे पुरवठाधारक हे वेगवेगळे असल्याने या वर्षी कार्यालयीन व संगणक स्टेशनरी यांची खरेदी वेगवेगळी करणेकामी संस्थानचे विविध विभागांना आवश्यक कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.८,११,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख अकरा हजार) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित होता.

वरीलप्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.८,११,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख अकरा हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी खरेदी विभागामार्फत दि.२४.११.२०१४ रोजी टिपणी सादर केली असता सदर टिपणीवर "मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी उपलब्ध स्टॉकचा आढावा घेऊन फेरसादर करावे" असे निर्देश दिले होते, तसेच त्याबाबत दि.२४.१२.२०१४ रोजी समक्ष सुचना ही दिलेल्या आहेत.

त्यानुसार खरेदी विभागाकडील जा.क्र ३२७/२०१४ दि.२६.१२.२०१४ रोजीचे पत्रान्वये भांडार विभागाकडून सन २०१२-१३, २०१३-१४ व सन २०१४-१५ चे माहे डिसेंबर-२०१४ अखेर खर्ची पडलेल्या साहित्याचा तपशिल व डिसेंबर-२०१४ अखेर भांडार विभागाकडे शिल्लक असलेल्या स्टॉकची माहिती मागविलेली होती. त्यानुसार भांडार विभागाकडून दि.३०.१२.२०१४ रोजी उपरोक्त माहिती प्राप्त झालेली आहे.

सदर माहितीचे आधारे तीन वर्षात खर्ची पडलेल्या साहित्याची सरासरी, भांडार विभागाकडे शिल्लक असलेला स्टॉक व विभागाकडून आलेली एकुण -मागणी यांचा मेळ करुन, प्रत्यक्षात खरेदी करावयाचे साहित्याचा एकुण परिमाण ठरविलेले आहे. त्याचे परिशिष्ठ सोबत जोडलेले आहे. सोबतच्या परिशिष्ठानुसार संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.५,६०,०००/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.५,६०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्य.समितीची मान्यता मिळालेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून, स्टेशनरी खरेदी करता येईल.

तरी वरीलप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी कार्यालयीन स्टेशनरी खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.५,६०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असणारी कार्यालयीन स्टेशनरी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२५ **मोफत नेत्र तपासणी व नंबरचे चष्मावाटप शिबीर- २०१५.**

श्री साईनाथ रुग्णालयात मोफत नेत्र तपासणी व नंबरचे चष्मा वाटप शिबीराचे आयोजन करणे बाबत श्री प्रकाश गंगवाणी, मुंबई यांची ०६ नेत्रतज्ञांची शिर्डी येथे येऊन, रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करणार असून, आवश्यक त्या रुग्णांना नंबरचे चष्मे त्यांचेमार्फत मोफत देणार आहे.

श्री प्रकाश गंगवाणी व त्यांचे टिमला शिर्डी येथे येऊन, नेत्र तपासणी करणेस व आवश्यक त्या रुग्णास नंबरचे चष्मे वाटप शिबीराचे आयोजन करणेबाबत रुग्णालयाचे नेत्र विभागाचे नेत्रतज्ञ, वैद्यकिय अधिक्षक, तसेच वैद्यकिय संचालक, यांची चर्चा झालेली असून, चर्चेनुसार सदर मोफत नेत्र तपासणी व नंबरचे चष्मेवाटप शिबीर दि. १५ फेब्रुवारी २०१५ च्या आयोजित करता येईल.

सदर शिबीरकामी येणा-या मुंबई येथील श्री गंगवाणी व त्यांचे ०६ व्यक्तींची एक दिवसासाठी राहणेची, जेवणाची दर्शन/आरतीची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करावी लागेल. तसेच शिबीराची प्रसिध्दी करावयाची झाल्यास याकामी बातमी वजा जाहीरात देता येईल याकामी येणा-या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष (रु ५०००/-) खर्चास मान्यता मिळण्यास विनंती.

तरी वरील प्रमाणे श्री गंगवाणी व टिमला श्री साईनाथ रुग्णलयात नेत्र तपासणी व मोफत नंबरचे चष्मे वाटप शिबीर आयोजनास परवानगी देणे बाबतचे प्रस्तवावर निर्णय तसेच उपरोक्त प्रमाणे येणारे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात मोफत नेत्र तपासणी व नंबरचे चष्मा वाटप शिबीराचे आयोजन करणेस व त्यानुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

२६ **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी–

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ) संस्थान मान्य यादीत असलेले परंतु रेफर न केलेले हॉस्पिटल | | | | | | |
| १. | श्री. राठी विष्णुकांत रामेश्वर<br>विभाग– साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- वैद्यकीय अधिकारी | पत्नी | Infertility | डॉ. बागडिया | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | २११५२४.०० | ११६७९.०० |
| २. | श्री. बावके भानुदास दादा<br>विभाग – विद्युत<br>हुद्दा – तारतंत्री | आई | Cancer | डॉ. कुलकर्णी | दिनानाथ मंगेशकार हॉस्पिटल, पुणे | ४९८६५.०० | ४८८००.०० |
निर्णय क्र.३२ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेकामी सल्लागार संस्था नेमणेसाठी प्रस्तावातील गुणांकाप्रमाणे टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स, नोएडा यांचे नेमणूकीबाबत ते करणार असलेल्या कामाचे सादरीकरण समितीसमोर सादर करण्यात यावे. सदरहू सादरीकरण पाहून अंतीम निर्णय घेतला जाईल.**

**तसेच, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त करावयाच्या विकास कामांबाबत साईभक्तांकडून अभिप्राय घेण्यात यावेत व ते अभिप्राय एकत्रित करुन त्यावर कार्यवाही करणेसाठी स्वतंत्र एजन्सीची नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.०५ **मौजे शिंगवे ता.राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे कंपोस्ट डेपोसाठीचे जागेस संरक्षक भिंत बांधणेसाठी व पोहच रस्त्यासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

महाराष्ट्र शासनाचे अधिनियम २००४ मधील सुधारीत कलम २१(२) (दोन)नुसार "स्थानीक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे" अशी तरतूद आहे.

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय:-**

मा. त्रिसदस्य समितीचे दि. २०/११/२०१४ रोजीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र. ९९२ संमत करण्यात आलेला आहे. *"यावर सविस्तर चर्चा होऊन मौजे शिंगवे, ता. राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांच्या मालकिचे क्षेत्रात संस्थान निधीतून घनकचरा प्रकल्प उभारणेकामी सल्लागार नेमणुकीसाठी सल्लागारांकडून प्रस्ताव (RFP) मागविणेत यावेत, तथापि त्यांना नेमणूकपत्र देण्यापुर्वी संस्थान (सिनियर कौन्सिल) वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले."*

<u>प्रस्तावना:-</u>

शिर्डी येथे साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. राहाता व शिर्डी परिसरातील निघणाऱ्या व जमा होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यात आला आहे. सदरचे प्रकल्पास शासनाचे मान्यतेसाठी बगीचा विभागामार्फत जा.क्र.एसएसएस/ बगीचा/ १०७७०/ २००९, दि.२६/०८/२००९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू प्रकल्प दि.२९/०७/२०१० रोजी साईटेक सायंटीफीक सिस्टीम यांचेमार्फत सदरहू प्रकल्प कार्यान्वीत करणेत आलेला होता. सदर ठिकाणी कचरा साठविणेस जागा कमी पडत असल्याने कचरा साठवणे करीता ९०० चौ.मी. क्षेत्रफळात वाढीव प्लॅटफॉर्म करणेत आलेला होता. सदरहू कामास शासनाचे मान्यतेस्तव इकडील विभागाचे जा.क्र.एसएसएसटी /बांधकाम/११७५/२०११ दि.०१/०६/२०११ रोजीचे पत्राने प्रस्ताव सादर करणेत आला आहे उपरोक्त दोन्हीही प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर विचाराधीन आहेत. सदरहू प्लांटमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणेचे काम सध्या स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे बंद आहे. त्यामुळे संस्थानचा निघणारा कचरा हा संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीत गट नं. १८२ मध्ये खड्डे घेऊन टाकण्यात येत आहे. तसेच संस्थानचे मौजे निमगांव- को-हाळे येथील गट नं. १४९ मध्ये स्वतंत्र घनकचरा प्रकल्प राबविणे बाबत संस्थानचे आरोग्य विभागामार्फत प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणेबाबत कार्यवाही चालू आहे.

**प्रस्ताव:-**

वर नमूद मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णयानुसार मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना इकडील जा.क्र.४७४९/ २०१४ दि.३०/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेस कळविण्यात आले होते. आता मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. नप/टेक्र-८/८८/२०१५ दि.१०/०१/२०१५ रोजीच्या पत्राने शिर्डी येथे दररोज २० ते २५ टन कचरा निर्मीती होत असून, मे. सुप्रीम कोर्टाचे सन २००० चे घनकचरा व्यवस्थापनाचे आदेशानुसार कच-यावर प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने मौजे शिंगवे येथे नगरपंचायत मालकीचे गट क्र.६९ मधील १०.३० एकर जमीनीत कपोस्ट डेपो उभारणी करण्याचे प्रस्तावीत केले आहे. सदर जागेस पिंपळवाडी–पुणतांबा रस्त्यावरुन उत्तर बाजूस २.० कि.मी. लांबीचा पोहच रस्ता असून सदर रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कचरा वाहतुकीस अडथळा निर्माण होणार आहे.

या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तसेच सदर जागेला कंम्पाउंड भिंत करणे. कच-यावर प्रक्रिया करण्यासाठी शेड बांधकाम, घनकचरा प्रक्रियेसाठी कट्टा बांधकाम करणे, प्लान्टमध्ये चेंजींग रुम, स्वच्छता गृह, भांडार गृह कार्यालय इ. बांधकाम करावे लागणार आहे. त्याचप्रमाणे खत तयार करणेसाठी अद्यावत मशिनरी उभारणी करणे इत्यादी सर्व कामे करणे आवश्यक आहे. असे मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी कळविलेले आहे. त्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | मौजे शिंगवे येथील प्रस्तावीत घनकचरा प्रकल्प जागेस संरक्षण भित बांधकाम करणे | ८,१७९,६७९.०० |
| २) | मौजे शिंगवे येथील प्रस्तावीत घनकचरा प्रकल्पाकडे जाणारा पोहच रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | ६,९६९,५१३.०० |
| ३) | मौजे शिंगवे येथील प्रस्तावित घनकचरा प्रकल्पातंर्गत मशिनरी शेड, प्रकीयेसाठी कट्टा बांधणे, स्वच्छता गृह, भांडार,घनकचरा प्रक्रीया शेड बांधणे तसेच क्षेत्रीय कार्यालय बांधणे भांडार | १०,१३७,४१९.०० |
| ४) | मौजे शिंगवे येथील प्रस्तावित घनकचरा प्रकल्पातर्गत खत निर्मीतीकरीता अद्यावत मशिनरी उभारणी करणे. | २०,०००,०००.०० |
| | एकूण | ४५,२८६,६११.०० |

तसेच शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील विशेष सभा दि. ०५/११/२०१४ रोजीचे ठराव क्र. २(८) नुसार श्री साईबाबा संस्थानकडे रक्कम रु.४,५२,८६,६११/- मात्रची मागणी केलेली आहे. याप्रमाणे मागणीनुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना शिर्डी नगरपंचायत हद्दीतील कच-याबरोबरच संस्थान परिसरात निघणाऱ्या सर्व कच-यावर प्रक्रिया करण्याच्या अटींवर रक्कम रु.४,५२,८६,६११/- (अक्षरी रु.चार कोटी बावन्न लक्ष शहाऐंशी हजार सहाशे अकरा) मात्र निधी उपलब्ध करुन देणेबाबत विचार करता येईल.यासाठी मा.त्रिसदस्य समितीच्या मान्यतेने उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तसेच विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची पूर्व मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनती.

निर्णय क्र.३३ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिंगवे ता.राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे कंपोस्ट डेपोसाठीचे जागेस संरक्षक भिंत बांधणे व पोहच रस्ते बनविणेसाठी अंदाजे रु.६,५२,८६,६११/- मात्र निधीची आवश्यकता असून सदरचा निधी संस्थानतर्फे देण्याऐवजी प्रस्तावित काम संस्थानमार्फत करुन घेण्यात यावे.**

**तत्पुर्वी उपरोक्त प्रस्तावास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच याकामी येणा-या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०६ **आपत्कालीन व्यवस्थापनासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत.**

प्रस्ताव- आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत आज दि.११/११/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात बैठक झाली. सदरहू बैठकीत आपत्कालीन व्यवस्थापनासाठी जे.सी.बी., पोकलॅन, क्रेन, डंपर, ट्रॅक्टर इ. व्यवस्था असणेबाबत चर्चा करणेत आली. आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने अशा प्रकारची मशिनरी उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदरहू व्यवस्था करावयाची झाल्यास त्यासाठी साधारणतः २ जे.सी.बी., ०२ पोकलॅन, ०१ क्रेन, ०५ डंपर, ०२ ट्रॅक्टर इत्यादी व्यवस्था करावी लागेल.

त्यासाठी आपत्कालीन व्यवस्थेबरोबरच संस्थानमार्फत वर्षभरात करण्यात येणारी कामेही त्यांचेकडूनच करुन घेता येतील. याकरीता वर्षभरासाठी दर निश्चिती करणेसाठी निविदा मागवून त्यानुसार करारनामा करुन घेता येईल. सदर करारनाम्यानुसार आपत्कालीन परिस्थीतीत तसेच वर्षभरात आवश्यकतेनुसार त्यांचा वापर संस्थान कामासाठी वेळोवेळी करता येईल.

वरील प्रमाणे व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वार्षिक निविदा मागवून वर्षभरासाठी दर निश्चिती करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आपत्कालीन व्यवस्थापनासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.०७ **संस्थानचे सर्व्हे नं.१२४ (पै.) मधील जागेत गोवरी शेडचे कामाबाबत.**

प्रस्ताव- **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुदः</u>** अधिनियम कलम 21 (1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णयः**

1. मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक 08/12/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 965.
2. मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक 04/02/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 151(1).

**प्रस्ताविकः** संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. 124 पैकी मधील जागेत श्री व्दारकामाई धुनीचे गोवरी सरपण साठ्यासाठी शेड तयार करणेसाठी ठेकेदार श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांना इकडील जा. क्र. 6061/2014 दि.26/03/2014 अन्वये रु.14,78,668/- मात्र रकमेचा कार्यादेश देणेत आला आहे. सदर कामासाठी ठेकेदार यांचे समवेत झालेले करारनाम्यानुसार सदर कामाची मुदत दि. 02/04/2014 ते दि.01/07/2014 अखेर तिन महिने अशी होती. सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी सदरहु शेडचे प्लिंथ लेव्हलचे काम झाल्यानंतर दि.05/08/2014 पासुन साईटवरील काम बंद ठेवले आहे. सदरचे काम लवकर पुर्ण करणेबाबत ठेकेदार यांना खालील पत्रान्वये तसेच वेळोवेळी साईटभेटी दरम्यान व कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत समक्ष सुचित करण्यात आले होते.

1. जा.नं 744/2014 दि.13/05/2014 रोजीचे पत्र.
2. जा.नं 1606/2014 दि. 05/07/2014 रोजीचे पत्र.
3. जा.नं 2746/2014 दि. 04/09/2014 रोजीचे पत्र.
4. जा.नं 3087/2014 दि.25/09/2014 रोजीचे पत्र.
5. जा.नं 3504/2014 दि.22/10/2014 रोजीचे पत्र.
6. जा.नं 4297/2014 fn.10/12/2014 रोजीचे पत्र.

ठेकेदार यांनी समक्ष कार्यालयात येऊन, काम लवकर पुर्ण करणेबाबत कबुल केले होते. तसेच ठेकेदार यांनी दि. 28/10/2014 रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

*"...काम करणेस मला पुन्हा एक संधी द्यावी (Within 8 days) तद्नंतर आपण जो निर्णय घ्याल तो मला मान्य राहील."*

तथापि 8 दिवस झाल्यानंतरही ठेकेदार यांनी काम सुरु केलेले नाही अथवा कधी सुरु करणार याबाबत इकडील कार्यालयास अवगत केलेले नाही.

दिनांक 07/11/2014 रोजी ठेकेदार यांनी समक्ष येऊन दि. 10/11/2014 पासून मटेरिअल येण्यास सुरुवात होईल व दि.13/11/2014 पासून साईटवर प्रत्यक्षात सुरुवात होईल असे सांगीतले. तसेच दि.10/11/2014 रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी खालील प्रमाणे कळविले आहे.

*".. Financial कारणामुळे गोवरी शेड व टॉयलेट ब्लॉकचे काम मी वेळेत पूर्ण करु शकलो नाही. तथापि, माझी भांडवलाची अडचण दुर झाले कारणे मी कामे चालू करीत आहे. पैकी काम क्र. 01 चे फॅब्रीकेशन मटेरिअलची ऑर्डर दिली असून, दोन तिन दिवसात मटेरीअल साईटवर येणे अपेक्षीत आहे. वरील कामे लवकरात लवकर देणेचा प्रयत्न करीत आहे तसे या अर्जाव्दारे लेखी वचन देत आहे. वरील कामांची मुदत संपली असून, मुदतवाढ मिळावी."*

त्यानंतरही ठेकेदार यांनी साईटवर कामास सुरुवात केलेली नसल्याने व कुठल्याही प्रकारचे मटेरीअल साईटवर न आणल्याने ठेकेदार यांना इकडील दि.10/12/2014 रोजीचे पत्रान्वये तीन दिवसाचे आत गोवरी शेडचे उर्वरीत काम सुरू करावे अन्यथा आपणास काम करावयाचे नाही असे समजुन निविदेतील पान नं.38 व 39 वरील क्लॉज नं. 10 नुसार काम रद्द करणेत येवून पुढील कायदेशीर कार्यवाही करणेत येईल यांची नोंद घ्यावी असे कळविण्यात आले होते.

तद्नतर ठेकेदार यांनी दि.22/12/2014 रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

*"... सदर काम करणेसाठी मला अर्थिक तसेच निविदेमध्ये नमूद केलेनुसारचे मटेरिअल ऑर्डर केलेनंतर किमान दोन महिन्याने मिळाले. तसेच सदर कामासाठी कुशल कामगार उपलब्ध होत नसल्याने, कामास विलंब झाला आहे. आपले कार्यालयाचे दि.10/12/2014 रोजीचे पत्र प्राप्त होणेपूर्वी मी सदर कामासाठी आवश्यक असणारे मटेरिअल साईटवर आणले व सदरचे कामासाठीचे मटेरिअल संस्थानचे साईटवर दि.18/12/2014 रोजी आणून त्याच दिवशी साईटवर कामास सुरुवात केलेली आहे.*

*तरी आपणांस विनंती आहे की, मला आलेले अडचणींचा विचार करून मला सदरचे काम पूर्ण करणेसाठी मला जानेवारी, 2015 अखेर मुदतवाढ मिळावी तसेच सदरहू कामापोटी होणारी दंड आकारणी करु नयेत हि विनंती."*

<u>प्रस्ताव</u>:- ठेकेदार श्री. शिंदे यांनी शेडचे फॅब्रिकेशसाठी स्ट्रक्चरल स्टील साईटवर आणून शेडचे काम सुरु केले आहे. ठेकेदार यांना काम पूर्ण करण्यास 214 दिवस विलंब होणार आहे. निविदेतील पान क्र. 42 व 43 मधील **Special Conditions** मधील अ. नं.07 नुसार ठेकेदार यांना कामाचे विलंबापोटी प्रती दिवस रु. 500/- प्रमाणे दि.02/07/2014 ते 31/01/2015 अखेर एकुण 214 दिवसांसाठी रु.1,07,000/- दंड आकारणी होते. तसेच उपरोक्त निविदा शर्तीनुसार कमाल दंड आकारणी रक्कम कंत्राट किंमतीच्या 7.5% (रु.14,78,668/- रकमेवर) रु.1,10,900/- मात्र इतकी येते.

सदरहु कामास ठेकेदार यांचे अर्थिक अडचणींमुळे विलंब लागलेला आहे. ठेकेदार श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव यांचेकडून सदरचे काम जानेवारी 2015 पर्यत पुर्ण करणेबाबतचे हमीपत्र घेता येईल.

तरी विषयांकीत काम ठेकेदार श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव यांचेकडून जानेवारी, 2015 पर्यंत निविदा शर्तीनुसार दंड आकारणी करून पूर्ण करुन घेता येईल. मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३५ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सर्व्हे नं.१२४ (पै.) मधील जागेत गोवरी शेडचे बांधकाम करणारे ठेकेदार श्री.बी.पी. शिंदे, पढेगांव यांना सदरहू काम पूर्ण करणेसाठी मार्च- २०१५ अखेर मुदतवाढ देण्यात येऊन, त्यांच्या बीलामधून निविदेतील अटी/ शर्तीनुसार दंड आकारणी करणेत यावी.**

**तसेच संस्थानचे सर्व्हे नं.१२४ (पै.) मधील जागेत गोवरी शेडचे बांधकामाचा सध्याचे स्थितीचा प्रगती अहवाल समिती सदस्यांना सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ संस्थानच्या हेलिपॅड सुविधेबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णयक्र.४२९ मध्ये संस्थान मालकीच्या हेलिपॅडचा वापर खाजगी संस्था/व्यक्ती/सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनुसार सशुल्क करून देणेत यावा. एका दिवसातील एका उड्डाणासाठी/ लॅण्डींगसाठी रक्कम रुपये २०००/- मात्र इतका दर आकारण्यात यावा. सरकारी/ निमसरकारी हेलिकॉप्टरच्या उड्डाणासाठी/ लॅण्डींगसाठी शुल्क आकारणे बाबत परिस्थितीनिरुप निर्णय मा.कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावा. तसेच यासाठी नियमावली मा.कार्यकारी अधिकारी यांनी तयार करावी. हेलिपॅड वापर देणेबाबतचे कामकाज जनसंपर्क कार्यालय, प्रशासन शाखा यांच्या मार्फत करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदरचा विषय जनसंपर्क कार्यालयाकडे ऑक्टोबर २००८ मध्ये आलेला आहे. त्यानुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे.

मात्र हेलिपॅड वापर आकार प्रति लॅण्डींगसाठी रुपये २०००/- व ॲब्युलन्स वापर आकार प्रति तासासाठी रुपये १०००/- सन २००८ मध्ये निश्चित केलेला असून त्यास सुमारे ०७ (सात) वर्ष झालेले असून सदरचा आकार हा नाममात्र आहे. त्यानंतर हेलिपॅड वापर व ॲब्युलन्स वापर आकारामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही हीं बाब विचारात घेणे महत्वाचे आहे कारण हेलिपॅड दुरुस्ती व देखभालीचा खर्च संस्थान वेळोवेळी करते. याठिकाणी संस्थानच्या संरक्षण विभागामार्फत एक (०१) कर्मचारी कर्तव्यावर असतो, तसेच हेलिकॉप्टर मुक्कामी असेल त्या दिवशी रात्रपाळीसाठी एक (०१) अतिरिक्त कमचारी संरक्षण विभागामार्फत याठिकाणी नेमण्यात येतो. याबरोबरच नाईट हॉल्टसाठी आलेल्या हेलिकॉप्टरकडून कोणताही जास्त आकार आकारण्यात येत नाही.

उपरोक्त बाबींचा विचार करता संस्थानचे हेलिपॅड वापर आकार रुपये २०००/- ऐवजी रुपये ५०००/- व ॲब्युलन्ससाठी प्रति तास रुपये १०००/- ऐवजी रुपये १५००/- आणि नाईट हॉल्टसाठी हेलिपॅड वापर आकार रुपये ५०००/- अधिक मुक्कामासाठी रुपये २०००/- असा एकूण रुपये ७०००/- इतका आकार आकारण्यात यावा असे वाटते.

तथापि उपरोक्त विषय मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे संस्थान हेलिपॅड वापर आकार लागू करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

विषय नं.०९ **संस्थान निवासस्थानांना ISO-9001:2008 मिळालेबाबत.**

प्रस्ताव- साईभक्त मा.श्री.सी.केशव मुर्ती साई एन्टरप्रायजेस बेंगलोर, यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमधील सर्व निवासस्थानांसाठी ISO-9001:2008 हे मानांकन मिळणे कामी दि.०७/०८/२०१४, दि.०६/०९/२०१४, दि.१८/१०/२०१४ व दि.२७/११/२०१४ असे ४ वेळेस मा.श्री आर लक्ष्मण देव मुख्य ऑडिटर, मा.श्री एस.एम.रेडडी ऑडिटर, पी.चंद्रशेखर रेडडी, हैद्राबाद यांचेसह वेळोवेळी निवासस्थानास भेट देऊन ऑडिट करुन निवासस्थानामध्ये वेळोवेळी काय-काय सुधारणा कराव्यात यांचे मार्गदर्शन करुन भक्तांना कशाप्रकारे सेवा दयावी. तसेच भक्तांशी सौजन्याने वागावे, नम्रतेने बोलावे, निवासस्थान मध्ये दैनंदिन स्वच्छता कशी ठेवावी. भक्तांच्या मार्गदर्शनासाठी कोणकोणते बोर्ड कोठे लावावे, इत्यादी माहिती दिली. त्यानुसार निवासस्थानामध्ये सेवा पुरवितांना सेवाभाव व कार्यतत्परता व गुणवत्ता राखणे महत्वाचे आहे. तसेच साईभक्तांना खोली वाटप कशा प्रकारे केली जाते. देणगीदार भक्तांना खोल्या कशा प्रकारे दिल्या जातात. कोणकोणती कागदपत्रे तपासणी केली जाते, याविषयी माहिती घेतली.

तसेच कर्मचा-यांनी स्वच्छ कपडे वापरावे, पाणी, विज व इधंन बचत करावी. सुरक्षागार्ड यांनी सतर्क राहावे. कांऊटरवर काम करणा-या कर्मचा-यांना किमान मराठी, हिंदी, इग्रजी, या भाषेचे ज्ञान असावे. गुटखा, पान, तंबाखु यांचे सेवनावर मनाई असावी. आवÕयक ठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे, डोअर मेटल डिटेक्ट्र व्यवस्थीत चालु असावे. कर्मचा-यांना फायर फायटरचे प्रशिक्षण दिलेले असावे, असे सांगितले.

विदेशातील काही तीर्थक्षेत्राच्या धर्मशाळांना - ISO-9001:2008 हे मानांकन पुर्वी मिळाले असले तरी भारतात प्रथमच हिंदु तिर्थक्षेत्रामध्ये श्री क्षेत्र शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानच्या निवासस्थानाला ISO-9001:2008 मानांकन मिळत आहे. तसेच संस्थानमधील ऑनलाईन बुकिंगचे साईभक्तांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मानांकन प्राप्तीसाठी श्री साईबाबा संस्थानचे मा.कार्यकारी अधिकारी, श्री राजेंद्र जाधव साहेब, उपकार्यकारी अधिकारी श्री आप्पासाहेब शिंदे साहेब, निवासस्थान विभागाचे प्रशासकिय अधिकारी श्री बी.डी. साबळे ,व्दारावती भक्तनिवास विभागाचे प्रभारी अधिक्षक श्री पुजांहरी कि. कोते, साईआश्रम भक्तीनिवास विभागाचे प्रभारी अधिक्षक श्री एस. बी. कासलीवाल साईधर्मशाळा विभागाचे प्रभारी अधिक्षक श्री बलभिम व. जोशी, श्री साईबाबा भक्तनिवास विभागाचे प्रभारी अधिक्षक श्री ए.एम.लाड, साईप्रसाद निवास्थान विभागाचे प्रभारी अधिक्षक श्री दिलीप ग. बकरे व निवासस्थानातील कर्मचारी वृंद या सर्वांनी मोलाचे सहकार्य केलेचे श्री सी.केशव मुर्ती यांनी सांगीतले.

सदर ISO-9001:2008 हे सर्व निवासस्थानातील क्वॉलिटी मॅनेजमेन्ट सिस्टीमसाठीचे सर्वाचे मानांकन असुन हे शनिवार दि.२४/०१/२०१५ रोजी दुपारी ३:०० वाजता श्री सी. केशव मुर्ती (साई एन्ट्रप्रायजेस,बॅगलोर) यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना प्रदान केले. असुन ते मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समितीचे वतीने स्वीकारले आहे. या मानांकना मुळे श्री साईबाबा संस्थानच्या नावलौकिकात भर पडली आहे. तसेच मानांकना प्रमाणे निवासस्थानाचे महत्व ठेवुन भक्तांना उच्च सेवा देण्याचा प्रयत्न करणार आहे, असे या वेळी सांगण्यात आले. तरी निवासस्थानासाठी मिळालेला महत्वपुर्ण व उल्लेखनीय मानांकनाची नोंद घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

निर्णय क्र.३७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निवासस्थानांना मिळालेला महत्वपुर्ण व उल्लेखनीय ISO-9001:2008 मानांकनाची नोंद घेण्यात आली.**

**तसेच सदरहू नामांकन मिळणेसाठी परिश्रम घेतलेले संबंधीत प्रशासकीय अधिकारी व सर्व निवासस्थानांचे अधिक्षक/ विभागप्रमुख यांना मा.अध्यक्ष महोदय यांचे स्वाक्षरीनिशी अभिनंदनपर पत्र देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सर्व निवासस्थाने/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१० **सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त पोलिस बंदोबस्तासाठी येणा-या वरीष्ठ पोलिस अधिका-यांना आरक्षित करण्यात आलेल्या रुम सशुल्क/ विनामुल्य देणेबाबत.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळ्या निमित्त शिर्डीत श्रींचे दर्शनसाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापनासाठी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यानी दि.२५/१२/२०१४ रोजीचे सभेमध्ये इकडील विभागाला निर्देशित केले प्रमाणे G इमारतीमध्ये चार रुम पोलीस अधिका-यांसाठी आरक्षित ठेवणेत येईल, सदर रुम्स सशुल्क किंवा विनामुल्य उपलब्ध करणेसाठी आपले विभागाकडुन विहीत पध्दतीने मान्यता घेण्यात यावी, असे निर्देश देण्यात आलेले आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१२/१२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११०५ अन्वये नाताळ सुट्टी सन २०१२ व नववर्षारंभ सन २०१३ या कालावधीत शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांच्या गर्दीचे नियोजन व मंदिर परिसराचे सुरक्षा व्यवस्थेबाबत तसेच इतर सुट्टयांच्या/सणांच्या दिवशी होणारी नगर मनमाड रोड व इतर रोड वरील वाहतूक नियंत्रण करणेकामी करावयाच्या उपाय-योजनांबाबत बंदोबस्तासाठी येणा-या पोलीस कर्मचा-यांसाठी संस्थानमार्फत भोजन देण्यात यावे. तसेच, निवासाकरीता कर्मचा-यांसाठी हॉल आणि पोलीस अधिका-यांसाठी साध्या खोल्या देण्यात याव्यात, असा निर्णय झालेला होता. ही सुविधा साईबाबा भक्तनिवास येथे करण्यात आली होती.

सिंहस्थ कुंभमेळा दि.०१ ऑगस्ट,२०१५ ते दि.३० सप्टेंबर,२०१५ या कालावधीत होणार असून सिंहस्थ कुंभमेळ्यातील महत्वाचे दिवस खालील प्रमाणे आहे.

(१) मुख्य ध्वजारोहन समारंभ-१४/०७/१५ (२) आखाड्याचे ध्वजारोहन-१४/०८/१५ (३) पहिले शाही स्नान-२९/०८/१५ (४) दुसरे शाही स्नान-१३/०९/१५ (५) तिसरे शाही स्नान-१८/०९/१५ (६) त्र्यबकेश्वर शाही स्नान-२५/०९/१५

पर्वणीच्या दिवसाचा विचार करता, पर्वणीचा दिवस व त्याअगोदर एक दिवस व त्यानंतरचा एक दिवस असे प्रत्येकी ३ दिवसाप्रमाणे ६ दिवसांसाठी १८ दिवस वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना निर्देशित केलेप्रमाणे ४ रुम आरक्षित ठेवाव्या लागणार आहेत.

**प्रस्ताव**:- येथील विभागातील एका रुम मध्ये तीन कॉट असून नॉन ए.सी. साठीचा सेवा आकार २४ तासासाठी रु.२००/- आहे. पर्वणीचे कालावधीमध्ये एक रुम १८ दिवस द्यावी लागणार असून त्यासाठी एका रुमचा सेवा आकार रु.३६००/- याप्रमाणे ४ रुमसाठी रु.१४,४००/- खर्च येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय**:-दि.१२/१२/२०१२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाचा विचार करता,

१) सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त पोलीस बंदोबस्तासाठी येणा-या वरीष्ठ पोलीस अधिका-यांना ४ रुम आरक्षित ठेवण्यास व त्या कामी येणारे अंदाजे खर्च रु.१४,४००/- चे खर्चास व पोलीस अधिका-यांसाठी ४ रुम विनामुल्य देण्यास.

किंवा,

२) सशुल्क रुम द्यावयाची असल्यास फक्त रुम आरक्षित ठेवण्यास.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णयासाठी सादर.

निर्णय क्र.३८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त येणारे पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांच्या तसेच इतर विभागांच्याही काही मागण्या असतील तर त्या सर्व मागण्या एकत्रित करुन सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.११ **साईआश्रम भक्तनिवास विभागातील ॲम्फिथिएटरमध्ये साईभक्तांना धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रमाची परवानगी देणे व त्याकामी नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:- २१(१) चा (ग)- भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावना**:- साईभक्त श्री के.व्ही.रमणीसाहेब, मॅनेजिंग ट्रस्टी,शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांकरिता माफक दरात निवास व्यवस्था व्हावी यासाठी १५३६ खोल्या व येथे उतरणा-या भक्तांना श्रींचे भजन किर्तन व इतर धार्मीक कार्यक्रम करता यावे या उद्देशाने याच परिसरात ॲम्फिथिएटर देणगी रुपाने बांधून दिलेले आहे.

सदरच्या एकूण १५३६ खोल्या साईभक्तांच्या निवासासाठी व ॲम्फिथिएटर मध्ये धार्मिक/ सांस्कृतीक कार्यक्रमासाठी दि.११/०४/२०१३ पासून सुरु करण्यात आलेले आहे. या ठिकाणी एकूण अंदाजे ८,००० ते ९,००० पर्यंत साईभक्तांची निवासव्यवस्था होते. सदरचा परिसर मोठा असून येथे ग्रुपने निवासासाठी थांबणा-या साईभक्तांच्या समुहासाठी जर काही धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रम साईभक्तांना करावयाचा असल्यास यासाठी येथे ॲम्फिथिएटर बांधण्यात आलेले असून, त्यामध्ये खालील प्रमाणे सुविधा करण्यात आलेल्या आहेत.

१) १८०० साईभक्त कार्यक्रमास बसतील अशी स्टेप-बाय-स्टेपची भारतीय बैठक व्यवस्था.
२) त्यामध्ये ४९ फुट X २० फुट साईजचे स्टेज.
३) स्टेज लगतच १४ फुट X ९ फुट या साईजच्या दोन ड्रेसिंग/ग्रीन रुम.
४) उत्तर दिशेला एक व दक्षिण दिशेला एक असे एकूण दोन प्रवेशव्दार.
५) स्टेजच्या पाठीमागील बाजूस स्टेजवर सामान ने-आण करणे कामी एक स्वतंत्र प्रवेशव्दार.
६) साहीत्य ठेवणे कामी उत्तर बाजूने एक व दक्षिण बाजूने एक असे दोन त्रिकोणी आकारच्या स्टोअररुम.
७) ॲम्फिथिएटरच्या बाहेरुन उत्तर दिशेकडून पुरुष व दक्षिण दिशेकडून स्त्रीयांसाठी प्रसाधन गृहे आहेत.

**प्रस्ताव**:- एखाद्या मोठ्या समूहाला (ग्रुपला) जर काही धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रम म्हणजेच श्री चे साई भजनसंध्या, श्री साई सच्चरित्र पारायण, हनुमान चालीसा पठण, श्रीमद् भगव्दत गीता, श्री साईबाबांच्या जीवन चरीत्रावरील नाटक व इतर सांस्कृतीक कार्यक्रम करणे कामी वेळोवेळी साईभक्त ॲम्फिथिएटरची मागणी करतात. तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी ॲम्फिथिएटर मध्ये धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रम ठेवणे कामी नियमावली तयार करुन मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तृयानुसार ॲम्फिथिएटरमध्ये कार्यक्रमाच्या वेळेस ध्वनिक्षेपण, विद्युत, बांधकाम व संरक्षण या विभागाचा सहभाग येत असलयाने या चारही विभागाकडून नियमावली सदर्भात माहिती मागविण्यात आली. सबब,उपरोक्त विभागांनी कळविलेल्या नियमात जे नियम एकसारखेच आहेत, अशा नियमात बदल करुन विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय पुढील प्रमाणे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय**:- श्री चे दर्शनाकरीता येणारे साईभक्त या विभागातील निवासामध्ये ग्रुपने (समुहाने) अथवा स्वतंत्रपणे कुटुंबासह थांबलेले आहे व त्यानी या परिसरातील ॲम्फिथिएटरमध्ये धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रम करण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्यांचे कडून संस्थानने विहीत नमुन्यातील ठरवून दिलेला फॉर्म भरुन घेऊन खालील नियमावली नुसार कार्यक्रम करण्यास परवानगी देता येईल. त्यासाठी विहीत नमुन्यातील फॉर्म अलाहिदा प्रशासकीय मानूयता घेऊन त्यावर सदरची मान्य झालेली नियमावली नमुद करता येईल.

**नियमावली:-**

१) ५ केव्हीए पेक्षा जास्त इलेक्ट्रीकल लोड असल्यास वीजपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था जनरेटर संच आणून आयोजकास स्वतः करावी लागेल.

२) ५ केव्हीए पेक्षा कमी इलेक्ट्रीकल लोड असल्यास कार्यक्रमास केलेल्या विद्युत पुरवठ्याचे वीज बील हे वीज वितरण कंपनीच्या दरानुसार व प्रत्यक्षात असलेल्या मीटर रिडींग प्रमाणे आकारण्यात येईल.

३) जर ५ केव्हीए पेक्षा कमी इलेक्ट्रीकल लोड घ्यावयाचा असल्यास वीजपुरवठ्याची अनामत रक्कम रुपये ३०००/-मात्र (एका दिवसाकरीता) संस्थानचे लेखाशाखेत जमा करुन अनामत रक्कम जमा केल्याची पावती विद्युत विभागात आणून दाखवावी व विद्युत पुरवठा जोडून घ्यावा. जर जास्त दिवस कार्यक्रम असेल तर त्या कालावधीच्या पटीत प्रति दिनाप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल.

४) कार्यक्रमास संस्थान मार्फत कोणतीही लाईटची उपकरणे, लाईटचे साहीत्य, वायरींग मटेरीअल, शिड्या वैगरे पुरविले जाणार नाही.

५) कार्यक्रमास वापरली जाणारी लाईटची उपकरणे तसेच ध्वनीक्षेपणची उपकरणे ISI प्रमाणित व नामांकित कंपन्यांची असावीत. तसेच ती संबंधीत विद्युत पर्यवेक्षक यांना दाखवून चेक करुन विद्युत पुरवठ्यास जोडावीत. अर्थ लिकेज असलेली उपकरणे विद्युत प्रवाहास जोडू नयेत

६) कार्यक्रमाला बॉक्स स्पिकरचा वापर करावा. ट्रॉम्पेटचा वापर करू नये.

७) ॲम्फिथिएटरच्या बाहेरील भक्तांना ध्वनीक्षेपणाच्या आवाजाचा त्रास होणार नाही,तसेच नियमाप्रमाणे शिर्डी पोलिस स्टेशन ठरवून देईल त्या क्षमतेपेक्षा (डेसिबल पेक्षा) जास्त आवाज असता कामा नये. याची खबरदारी आयोजकाने घ्यावी. अन्यथा कार्यक्रम बंद केला जाईल.

८) कार्यक्रमाचे फोटो व व्हिडीओ चित्रीकरण संस्थान मार्फत केले जाणार नाही.

९) संस्थान मार्फत साऊंड सिस्टीम साहीत्य व त्या कामी लागणारा कर्मचारी दिला जाणार नाही.

१०) कार्यक्रमाला साउंड सिस्टीम आपणास स्वतः करावयाची आहे.

११) सदर कार्यक्रमाचे वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आयोजकाची जबाबदारी राहील.

१२) ॲम्फिथिएटर परीसरात स्वच्छता ठेवावी.

१३) क्षमतेपेक्षा जास्त गर्दी होणार नाही याची आयोजकांनी दक्षता घ्यावी.

१४) आयोजकाने कार्यक्रम सायंकाळची श्री ची आरती संपल्यानंतर सुरु करावयाचा आहे व शेज आरतीच्या वेळेत कार्यक्रम बंद ठेवण्यात येऊन आरती झाल्यानंतर पुढे कार्यक्रम चालू ठेऊन तो कार्यक्रम रात्री ११:०० या वेळेच्या आत संपवावा.

१५) संस्थान मार्फत एखाद्या कलाकारास अगर कंपनीस मानधन देऊन किंवा निशुल्क कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या कार्यक्रमास, किंवा कार्यक्रम ठरविताना वरिष्ठ अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार किंवा मान्यतेनुसार संस्थान मार्फत साऊंड सिस्टीम, वीज पुरवठा पुरविण्यात येईल.

१६) ॲम्फिथिएटर उपलब्ध करुन देणे अथवा न देणेचा अधिकार व हक्क संस्थान व्यवस्थापनाने पुर्णपणे राखून ठेवला आहे.

१७) ॲम्फिथिएटर इमारत व इतर वस्तुंची चल अचल मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे खराबी किंवा नुकसान करु नये. या बाबत आयोजकाने काळजी घ्यावयाची आहे. अशा प्रकारे खराबी/नुकसान केलेले संस्थान प्रतिनिधीस आढळल्यास त्याची नुकसान भरपाई म्हणून मर्जीनुरुप उचित रक्कम आयोजक यांचेकडून वसूल करण्यात येईल, याबाबतचा संस्थानचा निर्णय अंतिम राहील.

१८) ॲम्फिथिएटर इमारतीस कोठेही ड्रिलींग करुन, खिळे ठोकून इमारतीस नुकसान पोहचवू नये. तसेच फ्लोरिंगवर मंडपाकरीता होल्स करु नये. सदर ठिकाणी संबंधीतांनी कार्यक्रमाकरीता आणलेला पंडाल/मंडप कार्यक्रम संपल्यानंतर त्वरीत काढून घ्यावयाचा आहे. व परिसराची त्वरीत स्वच्छता करुन द्यावयाची आहे.

१९) मंडप व इतर साहीत्य आणणे, नेणे व उभारणी करते वेळी साईभक्तांना त्याचा त्रास अथवा त्यापासून साईभक्तांना इजा होणार नाही, याची काळीजी घ्यावी. याबाबत काही अपघात झाल्यास त्यास आयोजक हे जबाबदार राहतील.

२०) मंडप व इतर साहीत्य कार्यक्रमाच्यावेळी आणणे व कार्यक्रम संपल्यानंतर त्वरीत घेऊन जाणे ही आयोजक यांची जबाबदारी राहील. याकामी संस्थानची व साईभक्तांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२१) सदर ठिकाणी आणण्यात येणा-या वस्तू/साहीत्य आयोजकाने स्वतःच्या जबाबदारीवर सांभाळावे.

२२) उपरोक्त नियमावलीमध्ये बदल करणे, त्यामध्ये वाढ करणे किंवा अंशतः बदल करणे बाबतचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाकडे राखून ठेवला आहे.

२३) संस्थानचा कार्यक्रम असेल त्या वेळेस अतिरीक्त सुरक्षा बंदोबस्त देण्यात येईल. संस्थान आयोजीत कार्यक्रमाचे व्यतिरीक्त खाजगी कार्यक्रम असेल तर तेथील सुरक्षेकामी आयोजक यांनी खाजगी सुरक्षा अथवा पोलिस बंदोबस्त स्वतः मागवावा.

२४) आयोजकांची अथवा कार्यक्रमासाठी येणारांची वाहने संस्थानने नेमूण दिलेल्या कार पार्किंगचे जागेतच पार्क करावी लागेल.

२५) कार्यक्रमासाठी आलेल्या व्यक्तींमधील काही उपद्रवी इसमांकडून साईभक्तांना त्रास झाल्यास कार्यक्रम तावडतोब बंद करावा लागेल व त्याची जबाबदारी आयोजकाची राहील.

तरी या विभागात थांबणा-या/उतरणा-या साईभक्तांना ॲम्फिथिएटर मध्ये वेळोवेळी धार्मिक/ सांस्कृतीक कार्यक्रम करण्यास परवानगी देणे व त्या करीता आवश्यक असलेल्या उपरोक्त नियमावलीस मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.३९ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील ॲम्फिथिएटर प्रस्तावातील अटी तसेच, सदरहू ॲम्फिथिएटरची बुकींग एक महिन्यापर्यंत ठेवण्यात यावी व ॲम्फिथिएटर वापरासाठी देणे किंवा न देणेचा, कार्यक्रम रद्द करणेचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवणेत यावा या अटींचा समावेश त्यामध्ये करणेत येऊन, ॲम्फिथिएटर वापरासाठी देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.१२ **साईआश्रम भक्तनिवासच्या खोल्यांमध्ये थांबलेल्या साईभक्तांना शुल्क घेऊन कपडे धुणे व इस्त्री करुन देणेकामी लॉण्ड्री ठेकेदाराची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२९ अन्वये संस्थान मधील सर्व निवासस्थान विभागासाठी ISO-9001:2008 व ISO-14001 मानांकन प्राप्त करुन घेणेबाबत निर्णय झालेला आहे.

यासाठी साईभक्त मा.श्री.केशूमुर्ती. साई एंटरप्रायजेस बँगलोर यांचेमार्फत निवासस्थानांसाठी ISO-9001:2008 मानांकन प्राप्त करुन देणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

ISO कंपनीचे प्रतिनीधी यांनी दि.२९/११/२०१४ रोजी साईआश्रम भक्तनिवास या विभागास भेट देऊन, प्रत्यक्षात कार्यालयीन कामकाज पाहणी केली. काही खोल्यांमधील व्यवस्था व प्रत्यक्षात साईभक्तांकडून फीडबॅक घेण्यात आले. त्यावेळी परिसरात ब-याच भक्तानी खोल्यांमध्ये कपडे धुऊन ते कपडे परिसरात लावलेल्या शोभेच्या झाडांवर वाळत घालतांना दिसुन आले. या कारणामुळे जे भक्त अवांतर कपडे धुतात त्यासाठी संस्थानला विनाकारण जादा पाणी लागते, यासाठी पाण्याचे नियोजन करणे हे फार महत्वाचे आहे.

खोलीमध्ये उतरलेल्या भक्तांनी फक्त अंतर्गत कपडे धुणे योग्य राहील, संस्थानने इतर कपडे त्यांना येथे धुऊ न देता त्यासाठी संस्थानने लॉन्ड्री ठेकेदाराची नेमणूक करुन, ठेकेदारास संस्थानने ठरवुन दिलेल्या दरामध्ये भक्तांना त्यांचे कपडे धुणे/ इस्त्री करुन देणे ही सुविधा उपलब्ध झाल्यास भक्त इतर अवांतर कपडे येथे धुणार नाही. त्यामुळे पाण्याचा वापर कमी होऊन पाण्याची बचत होईल. त्यामुळे परिसरात लावलेल्या बागेमधील झाडांवर व इतरत्र वाळत घातलेले कपडे दिसणार नाही. असे झाल्यास परिसर चांगला, स्वच्छ, सुंदर व सुशोभित दिसेल.

**प्रस्ताव:-** मागील वर्षापेक्षा पुढील वर्षामध्ये पाण्याची व इलेक्ट्रीसीटीची बचत झाली व ती कशा पध्दतीने केली याची आकडेवारी ISO मानांकन कंपनीच्या प्रतिनीधींच्या निदर्शनास आणून दिल्यास, संस्थान निवासस्थानांना ISO 9001:2008 च्या मानांकनानंतरचे मानांकन ISO:14001 हे मानांकन मिळेल, यासाठी ISO ऑडीटर यांनी दिलेल्या सूचनेनुसार परिसरात पाण्याचे नियोजन करणेकामी भक्तांकडून शुल्क आकारुन त्यांचे कपडे धुणे/इस्त्री करुन देणेकामी लॉन्ड्री ठेकेदाराची नेमणूक करता येईल.

भक्तांचे कपडे धुणेसाठी लॉन्ड्री ठेकेदाराची नेमणूक झाल्यानंतर खोल्यांमध्ये अगर परिसरात "अवांतर कपडे खोलीमध्ये धुवून परिसरामध्ये वाळत घालू नये- हुकूमावरुन" अशा आशयाचे बोर्ड लावता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धुणे व इस्त्री करणे या कामाची ई-निविदा मागविण्यात येणार आहे. त्याच ई-निविदेत भक्तांकडून शुल्क घेऊन त्यांचे कपडे धुणे/इस्त्री करुन देणे यासाठीचे दर मागविता येईल. त्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासच्या खोल्यांमध्ये थांबलेल्या साईभक्तांना शुल्क घेऊन कपडे धुणे व इस्त्री करुन देणेसाठी लॉण्ड्री ठेकेदाराची नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.१३ **श्रीसाईबाबा संस्थानचे परिसरातील स्वच्छता व किडनाशक तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत.**

प्रस्ताव- दि.२६/०६/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५३६ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे साई धर्मशाळा इमारत व परीसरात पेस्ट कंट्रोल करणे करीता इच्छुक, अनुभवी पात्र ठेकेदार/कंपनी यांचेकडुन सिलबंद निविदा मागविणे बाबत दि.३०/०९/२०१४ रोजीचे दै.सार्वमत वृतपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती. निविदा विक्री मुदत ०१/१०/२०१४ ते १०/१०/२०१४ अखेर दु.४. वाजेपर्यंत होती.

निविदा बंद पाकीटातुन स्विकारण्याची अंतिम मुदत २०/१०/२०१४ वार सोमवार असुन, तत्पुर्वी बुधवार, दि.१७/१०/२०१४ रोजी 0 नं. (मिटींग हॉल) येथे सर्व निविदाधारकांची प्री-बीड मिटींग आयोजीत करण्यात आली होती. त्यानुसार ०६ निविदाधारक मिटींगसाठी हजर होते.

सदर प्री- बीड मिटींगच्या दरम्यान उपस्थिता पैकी श्री सुहास वाणी नाशिक, एस.ए.के.सर्व्हीस नाशिक, यांनी संस्थान मध्ये तांत्रीक सल्लागार कोण आहे, याबाबत विचारणा केली, म्हणजे त्यांच्याशी पेस्ट कंट्रोल बीड बाबत तसेच निविदा बाबत तांत्रीक चर्चा करता येईल, असा विषय निघाला होता. त्या अनुषंगाने दि. २२/१०/२०१४ रोजी श्री सुरेश ब्राम्हणकर, नाशिक यांना पेस्ट कंट्रोल कार्यशाळेस मार्गदर्शन करणे कामी बोलावण्यात आले होते. त्यानुसार श्री सुरेश ब्राम्हणकर यांनी उपस्थीत कर्मचा-यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांचेशी तांत्रीक सल्लागारबाबत विचारणा केली असता ते येण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगीतले.

तद्नंतर श्री सुरेश ब्राम्हणकर यांनी दि. २०/११/२०१४ रोजीचे पत्रात सार्वजनिक स्वच्छता व रोगवाहक किटक यांच्या नियंत्रणासाठी विविध संस्थांसाठी काम करीत असुन, श्री साईबाबा संस्थान शिर्डीतील अशा अनुषंगाने येणा-या

कामाच्या शास्त्रोक्त व प्रभावी अंमलबजावणीसाठी तांत्रीक सल्लागार म्हणून निशुल्क, विनामुल्य सेवा करण्याची इच्छा दर्शविलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान शिर्डीसाठी आरोग्य संदर्भातील निविदातील अटी/शर्ती शास्त्रोक्त पध्दतीने तयार करणे. पेस्ट्र कंट्रोल संदर्भात येणा-या तांत्रीक अडचणी निवारण करण्यासाठी तसेच औषध फवारणीत ढेकुण, झुरळे इ. करीता पेस्ट कंट्रोल व उंदीर, घुस इत्यादीचे प्रतिबंधासाठी रोडेंट कंट्रोल करणे बाबत कोणत्या प्रकारची औषधे मारणे आवश्यक आहे, औषधाचे व पाणि यांचे प्रमाण किती असावे, तसेच औषध फवारणी किती दिवसांनी करणे आवश्यक आहे, याबाबतची माहीती संस्थान मधील कर्मचा-यांना नसते. पेस्ट कन्ट्रोल व रोडेंट कन्ट्रोल याची फवारणी ही सर्व निवासस्थाने, येथे करणे आवश्यक आहे. सध्या प्रसादालय येथे बी.व्ही.जी. विभागामार्फत औषध फवारणी करण्यात येते. तसेच आरोग्य विभागामार्फत संस्थान परीसरात तसेच गोडावुन, जनरल संडास-बाथरुम, मंदीर परीसर आतील बाहेरील बाजुस, कर्मचारी निवासस्थानातील संडास-बाथरुम इ.ठिकाणी औषध फवारणी व बगीचा विभागासही उपलब्ध असलेल्या बगीच्यातील झाडांवर औषध फवारणी केली जात असते. परंतु सदर फवारणी ही योग्य रीत्या म्हणजे औषध व पाणी यांचे प्रमाण किती प्रमाणात असावे याची माहीती नसल्यामुळे फवारणी व्यवस्थीत केली जात नाही. तसेच सदरची औषध फवारणी ही प्रशिक्षीत कर्मचा-याकडुन होत नाही. जेणे करून त्यामुळे औषधाचा परिणाम पाहीजे तसा होत नाही. औषध फवारणी करणे हे अत्यंत महत्वाचे जिकिरीचे असे काम आहे, जेणे करून रोगाचा प्रतिबंध होणे आवश्यक आहे. दर वर्षी औषध फवारणी करणे त्यासाठी औषधाची वार्षीक मागणी करणे, त्यासंबंधी निविदा काढणे व त्यात आवश्यक असलेल्या तांत्रीक अडचणी दुर करण्यासाठी त्यातील जाणकार अशा तांत्रीक सल्लागाराची संस्थानला आवश्यकता आहे, तसेच तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती केलेस त्यांचे मार्फत सर्व निवासस्थाने, प्रसादालय, आरोग्य व बगिचा विभाग, इ. ठिकाणी असलेल्या कर्मचा-यांना प्रशिक्षण देवून प्रशिक्षीत करता येईल व त्यांचे सर्व बाबतीत मार्गदर्शन घेता येईल, असे नम्र मत आहे. सदर बाबतीत संबंधीत विभाग प्रमुखांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचा अभिप्राय दिलेला असुन त्यांनी सम्मतीची स्वाक्षरी केलेली आहे.

तरी श्री सुरेश ब्राम्हणकर नाशिक, यांचे दिनांक २०/११/२०१४ रोजीचे पत्रातील विनंती नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मध्ये तांत्रीक सल्लागार म्हणुन निशुल्क, विनामुल्य सेवा करण्याची संधी देणेबाबतचा विषय मंजुरीसाठी सादर.

निर्णय क्र.४१ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री सुरेश ब्राम्हणकर, नाशिक यांचे दिनांक २०/११/२०१४ रोजीचे पत्रातील विनंती नुसार त्यांना संस्थानचे परिसरातील स्वच्छता व किडनाशक तांत्रिक सल्लागार म्हणून विनामुल्य सेवा करणेस परवानगी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

विषय नं.१४ **मयत/ आजारी असलेल्या पालखी सेवेक-यांचे ऐवजी त्यांचे नातलगांच्या (वारसांच्या) पालखी सेवेकरी म्हणून सेवा घेणेबाबत.**

प्रस्ताव- (अ) श्री साईबाबांचे स्थानिक उत्सव, श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) या तीन प्रमुख उत्सवांचे वेळी श्रींचे रथ/ पालखीची गावातुन मिरवणुक असते, तसेच दर गुरुवारी समाधी मंदिर ते चावडी व परत समाधी मंदिर अशी पालखीची मिरवणुक असते. सदरची प्रथा ही पुर्वापार चालत आलेली आहे. या पालखी/ रथ मिरवणुकीचे वेळेस प्रथेनुसार, पालखीसेवेकरी म्हणुन अब्दागिरीधारक, मृदुंग वादक, सनईवादक, शिंगवादक, ताशावादक, डफवादक, बत्तीधारक इ. सेवा देणारे पालखी सेवेकरी त्यांचे पुर्वजांपासुन सेवा देत आहेत.

या सेवेबद्दल पालखी सेवेक-यांना तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.30/01/1999 चे सभेतील निर्णयानुसार 15 पालखी सेवेकरी यांचे दरमहाचे मानधनात रु.25/- ऐवजी रु.200/- मात्र एवढी वाढ करणेत आली. तद्नंतर तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.31/03/2007 रोजीचे सभेतील निर्णयानुसार या मानधनात वाढ करण्यात येऊन दरमहा रु.250/- मात्र एकत्रित मानधन आदा करणेत आलेले आहे. तसेच यानंतर तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.21/11/2010 रोजीचे सभेतील निर्णयानुसार या मानधनात पुनश्च वाढ करण्यात येऊन, सध्या त्यांना रु.500/- मात्र एकत्रित मानधन देण्यात येत आहे.

दि.30/01/1999 व दि.21/11/2010 रोजीचे निर्णयात पालखी सेवेक-यांमध्ये, कै.माणिक रामचंद्र आरणे (शिंगवादक), श्री.दत्तात्रय नारायण शेळके (पालखी खांदेधारक) व कै.रामदास माधव गायके (बत्तीधारक) यांचा समावेश आहे.

या सेवेकऱ्यांपैकी दोन सेवेकरी मयत झाल्याने व एक सेवेकरी वृध्दापकाळाने आजारी असल्याने त्यांच्या नातलगांनी (वारसांनी) संस्थानकडे पालखी सेवा करण्याची संधी मिळावी म्हणुन विनंती अर्ज केलेले आहेत, त्याचा तपशिल -

| अ.नं. | सेवेक-यांचे नांव | तपशिल | अर्जदार / नातेवाईकाचे नांव | सेवेक-याशी नाते |
|---|---|---|---|---|
| 01 | कै.माणिक रामचंद्र आरणे (शिंगवादक- तुतारी) | मयत | 1.श्रीमती तुळसाबाई माणिक आरणे | पत्नी |
| | | | 2.श्री.साहेबराव रामचंद्र आरणे | भाऊ |
| 02 | श्री.दत्तात्रय नारायण शेळके (पालखीचे खांदेकरी) | आजारी | 1.श्री.दत्तात्रय नारायण शेळके | स्वत: |
| | | | 2.श्री.संतोष दत्तात्रय शेळके | मुलगा |
| 03 | कै.रामदास माधव गायके (बत्तीधारक) | मयत | श्री.शंकर रामदास गायके | मुलगा |

उपरोक्त अनुक्रमांक 1 ते 3 मध्ये नमूद केलेल्या सेवेक-यांच्या नातलगांनी (वारसदारांनी) पालखी सेवा करण्याची संधी मिळावी म्हणुन केलेल्या विनंती अर्जाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

(1) श्रीमती तुळसाबाई माणिक आरणे, रा. शिर्डी यांनी दि.04/09/2014 व 18/12/2014 चे अर्जान्वये "श्री साईबाबांचे मिरवणुकीपुढे वाद्य वाजविण्याची सेवा देण्याची परंपरा आमचे घरात असुन माझे आजे सासरे, त्यानंतर माझे सासरे व त्यानंतर माझे पती कै.माणिक रामचंद्र आरणे हे तुतारी वाजविण्याची सेवा देत होते. मात्र त्यांचे दि.18/05/2008 रोजी निधन झाल्याने तसेच मला मुलगा नसल्याने माझे दिर श्री. साहेबराव रामचंद्र आरणे हे विनाखंड सेवा देत आहेत. तरी त्यांना या सेवेसाठी अधिकृत करुन त्यांना याबाबतचे मानधन देण्यात यावे तसेच या सेवेसाठी संस्थान दप्तरी त्यांचे नांव लावणेस व त्यांना मानधन देण्यास माझी कोणतीही हरकत नाही." अशी विनंती केलेली आहे.

तसेच श्री.साहेबराव रामचंद्र आरणे, शिर्डी यांनी दि.24/12/2014 रोजीचे अर्जान्वये " माझा भाऊ श्री.माणिक रामचंद्र आरणे हे श्रींचे पालखी सेवेकरी म्हणुन शिंग वादनाचे काम ब-याच वर्षापासुन करीत होते. सन 2008 साली त्यांचे निधन झालेले आहे. त्यांचे पश्चात 03 मुली असुन त्यांचा विवाह होऊन त्या सासरी गेलेल्या आहेत, तसेच त्यांना मुलगा नाही. त्याचप्रमाणे आम्ही तिन भाऊ होते त्यापैकी श्री.माणिक रामचंद्र आरणे व श्री. गणपत रामचंद्र आरणे यांचे निधन झालेले असुन फक्त मीच श्री.साहेबराव रामचंद्र आरणे हयात आहे. तसेच माझी भावजई कै.माणिक रामचंद्र आरणे यांची पत्नी श्रीमती तुळसाबाई माणिक आरणे यांची याबाबत कुठलीही हरकत नाही. तरी माझा भाऊ कै.माणिक रामचंद्र आरणे यांचे ऐवजी मला पालखीची सेवा करण्याची संधी मिळावी." अशी विनंती केलेली आहे.

(2) श्री.दत्तात्रय नारायण शेळके, रा. शिर्डी यांनी दि.21/11/2014 चे अर्जान्वये, "आमचे घरातील वंश परंपरेने श्री साईबाबांचे पालखीला खांदा लावण्याचा मान मिळाला आहे, व ती सेवा मी वयाचे 20 वर्षापासुन करीत आहे. माझे वय झाले असल्याने तसेच मी अर्धांगवायुचे आजाराने त्रस्त झाल्याने मी अंथरूनावर पडुन आहे, त्यामुळे मला बाबांचे पालखीची सेवा करणे शक्य होत नाही. सध्या माझा मुलगा श्री.संतोष दत्तात्रय शेळके, शिर्डी हा बाबांचे पालखीचे काम/ सेवा करत आहे. तरी माझे अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन बाबांचे पालखीसाठी माझे ऐवजी माझा मुलगा श्री.संतोष दत्तात्रय शेळके यांस वंशपरंपरेनुसार मान मिळावा. " अशी विनंती केलेली आहे.

तसेच श्री.संतोष दत्तात्रय शेळके यांनी दि.19/12/2014 चे अर्जान्वये " मला एक भाऊ होता, परंतु तो सन 2012 मध्ये मयत झालेला असल्याने मला माझे वडीलांचे जागेवर मला पालखीची सेवा करण्याची संधी मिळावी" अशी विनंती केलेली आहे. सोबत रेशनकार्ड व भावाचे मृत्युप्रमाणपत्र सादर केलेले आहे.

(3) श्री.शंकर रामदास गायके, रा. शिर्डी यांनी दि.11/12/2014 चे अर्जान्वये, "गेल्या अनेक वर्षापासून श्री साईबाबांच्या दर गुरुवारी निघणा-या पालखीला बत्ती धरण्याची सेवा ही माझे पंजोबा कै.दादा पाटील गायके हे करीत होते. त्यांचे मृत्युनंतर त्यांचा मुलगा कै.माधव दादा गायके हे बत्ती धरण्याची सेवा करीत होते. त्यांचेनंतर त्यांचा मुलगा (माझे वडील) कै.रामदास माधव गायके हे दर गुरुवारी पालखीला बत्ती धरण्याची सेवा करीत होते. ते बांधकाम विभागात कायम कर्मचारी म्हणुन 25/27 वर्षे सेवेत होते. त्यांचे निधनानंतर मी श्री. शंकर रामदास गायके (लिपीक टंकलेखक, श्री साईबाबा हॉस्पिटल) दर गुरुवारी निघणा-या पालखीला बत्ती धरण्याची सेवा आजतागायत करीत आहे." अशी विनंती केलेली आहे.

तसेच श्री. शंकर रामदास गायके यांचे भाऊ श्री. मच्छिंद्र रामदास गायके व श्री. साईनाथ / दादासाहेब रामदास गायके यांनी दि.24/12/2014 रोजीचे प्रतिज्ञापत्रात पालखी / रथाला बत्ती धरण्याची सेवा आमचे मोठे भाऊ करतील, त्यास आमची पुर्ण सहमती असुन यापुढे यावर आमचा कोणताही हक्क राहणार नाही, असे नमुद केलेले आहे.

ब) प्र.अधिक्षक, मंदिर विभाग यांनी उपरोक्त तीनही अर्जांबाबत अनुक्रमे दि.15/11/2014, दि.27/11/2014 व दि.22/12/2014 रोजीचे मंजुर प्रशासकीय प्रस्तावात असे नमुद केले आहे की, श्रींचे स्थानिक उत्सव, प्रमुख तिन उत्सवाचे वेळी श्रींचे रथ / पालखीची गावातुन मिरवणुक असते, तसेच दर गुरुवारी समाधी मंदिर ते चावडी व परत समाधी मंदिर अशी पालखीची मिरवणुक असते. श्रींचे रथ/ पालखी मिरवणुकीचे वेळी पालखीधारक, अब्दागिरीधारक, मृदुंग वादक, सनईवादक, शिंगवादक, ताशावादक, डफवादक, बत्तीधारक इ. सेवा देणारे सेवेकरी यांना दि.21/02/2011 चे प्रशासन शाखेकडील आदेशानुसार, मंदिर विभागामार्फत प्रति माह रु.500/-प्रमाणे एकत्रित मानधन हजेरीनुसार देण्यात येत आहे. मंदिर विभागाकडील उपलब्ध रेकॉर्डनुसार, सन 1997 पासुन कै.माणिक रामचंद्र आरणे, श्री.दत्तात्रय नारायण शेळके व कै.रामदास माधव गायके यांची नांवे रजिस्टरला नमुद आहेत.

यापुर्वी तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीनुसार, प्रशासन शाखेकडील दि.30/12/2002 चे आदेशानुसार, पालखी सेवेकरी श्री साळबा नारायण आरणे (शिंगवादक) यांचे ऐवजी त्यांचा मुलगा श्री.बाळासाहेब साळबा आरणे यांचे नांव पालखी सेवेकरी म्हणुन घेण्यात आलेले असुन, त्यांना इतर पालखी सेवेकऱ्यांप्रमाणे सध्या एकत्रित मासिक मानधन देण्यात येत आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेनुसार, अर्जदार यांनी श्री साईबाबांची पालखी सेवा करण्याची संधी मिळणेबाबत केलेले विनंती अर्ज व त्यावरील प्र.अधिक्षक, मंदिर विभाग यांचे अभिप्रायाचा विचार करता,

1) कै.माणिक रामचंद्र आरणे (शिंगवादक-तुतारी) यांचे ऐवजी त्यांचे भाऊ श्री. साहेबराव रामचंद्र आरणे,

2) श्री.दत्तात्रय नारायण शेळके (पालखी खांदेकरी) यांचेऐवजी त्यांचा मुलगा श्री.संतोष दत्तात्रय शेळके व

3) कै.रामदास माधव गायके (बत्तीधारक) यांचेऐवजी त्यांचा मुलगा श्री. शंकर रामदास गायके यांच्या पालखी सेवेकरी म्हणुन सेवा घेण्यास व इतर पालखी सेवेकऱ्यांप्रमाणे मासिक रु.500/- इतके एकत्रित मानधन अदा करणेस मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर

निर्णय क्र.४२ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रशासकीय नियमावलीस अनुसरुन मयत/ आजारी असलेल्या पालखी सेवेक-यांचे ऐवजी त्यांचे नातलगांच्या (वारसांच्या) पालखी सेवेकरी म्हणून सेवा घेणेस व त्यांना प्रचलीत दराने मानधन देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१५ **संस्थानचे मुंबई कार्यालयाकडील कर्मचा-यांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना तात्काळ सेवा-सुविधा पुरविणेकामी मनुष्यबळ कार्यक्षमता पडताळणी करणेकामी दि.23/10/2014 व दि.06/11/2014 रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळवून तपशिलवार माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहितीनुसार प्रत्येक विभागाचे संबंधीत कर्मचाऱ्यांसमवेत मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात बैठक आयोजित करुन मनुष्यबळ पडताळणी करण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे.

त्याकामी मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात दि.08/11/2014 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.कार्यकारी महोदय यांनी मुंबई कार्यालयाकडील सर्व कर्मचाऱ्यांना पुर्णवेळ वर्कलोड नसलेबाबत तसेच प्रकाशने विभागाकडील दि.05/11/2014 रोजीचे पत्रान्वये साईलीला मासिकाचे कामकाजावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी 02 लिपीक वर्गीय कर्मचारी, 01 शिपाई व 01 स्वच्छता कर्मचारी ठेऊन उर्वरीत सर्व कर्मचारी साईलीलाचे कामासह शिर्डी येथे वर्ग करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

**अ) मुंबई कार्यालयाकडील स्थायी कर्मचाऱ्यांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-**

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | थोडक्यात कामाचा तपशील |
|---|---|---|---|
| 01 | श्री.सुनिल दत्तात्रय राणे | सहाय्यक संपादक | साईलीला मासिक लेखन, संपादन व प्रकाशन संबंधातील कामकाज |
| 02 | श्री.रामचंद्र बाबु दर्गे | पर्यवेक्षक तथा प्र.कार्यालय अधिक्षक | कार्यालयीन टिपण्या, पत्रव्यवहार व इतर कामकाज तसेच आवश्यकतेनुसार मंत्रालय विभागासंबंधातील कामकाजाचा पाठपुरावा करणे, दैनंदिन फोटो-पुस्तके विक्री व देणगी बाबतचे हिशेब ठेवणे इत्यादी. |
| 03 | श्री.मधुकर जयराम महाजन | वरिष्ठ लिपीक | देणगी स्विकारणे, टेंडर विक्री पावत्या, पुस्तके-फोटो, कॅसेट विक्री पावत्या, मनिऑर्डर, चेक रक्कम तपासणे, आवक-जावक खर्चाचे हिशेब ठेवणे तसेच ऑनलाईन दर्शन व निवासव्यवस्था इत्यादी बाबत काम |
| 04 | श्री.पी. राधाकृष्णन | वरिष्ठ लिपीक | मनिऑर्डर, चेकच्या पावत्या करणे, फोटो, पुस्तके, कॅसेट विक्री, ई-मेलद्वारे पत्रांना उत्तर देणे, भक्तांना आर्थिक मदतीविषयी (रूग्ण अनुदानाबाबत) माहिती देणे, ऑनलाईन दर्शन व निवासव्यवस्था इत्यादी बाबत काम |
| 05 | श्री.किशोर केशव क्षिरसागर | लिपीक-टंकलेखक | साईलीला मासिक सभासदाच्या नोंदी घेणे, नविन नुतनीकरण करणे, स्टिकर्स छपाई करणे, फ्रैंकींग करणे इत्यादी |
| 06 | श्री.हरिश्चंद्र गोपाळ काते | शिपाई | आवक-जावक टपालाच्या नोंदी रजिस्टरमध्ये घेणे, कार्यालयात कामात मदत करणे तसेच बाहेरील टपाल देणेबाबतची कामे करणे. |

**ब) मुंबई कार्यालयाकडील कंत्राटी कर्मचाऱ्यांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | थोडक्यात कामाचा तपशील |
|---|---|---|---|
| 01 | श्री. जयपाल राज | कंत्राटी ड्रायव्हर | गरजेनुसार वाहन चालविणे |
| 02 | श्री. प्रकाश सामंत | डीटीपी ऑपरेटर (एकत्रित मानधनावर) | मराठी व इंग्रजी साईलीला मासिकाचे डिटीपीचे काम करणे |
| 03 | श्री. दिपक खडांगळे | कंत्राटी शिपाई | साईलीला मासिकाचे कामकाज करणे |
| 04 | श्री. शाम शिंदे | कंत्राटी स्वच्छता कामगार | कार्यालय तसेच संडास व बाथरुमची साफ सफाई करणे. |

वरीलप्रमाणे मुंबई कार्यालयाकडे 06 स्थायी 04 कंत्राटी कर्मचारी असे एकूण 10 कर्मचारी कार्यरत आहेत. प्र.मुंबई कार्यालय अधिक्षक यांनी दि.31 ऑक्टोबर, 2014 रोजी मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत दिलेल्या पदनिहाय जबाबदारी व कर्तव्याबाबत तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, संबंधीत कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ कामाचा वर्कलोड नाही. तसेच मुंबई कार्यालय येथून श्री साईलीला अंक (मराठी) व (हिंदी-इंग्रजी) हे द्वैमासिक प्रसिध्द करण्यात येते. मासिकाची अंतिम छपाई करण्यापुर्वी संपादक (कार्यकारी अधिकारी) यांना दाखविले जात नाही. सदरचे कामावर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याकामी उपरोक्त 'अ' मध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.रामचंद्र बाबु दर्गे, पर्यवेक्षक यांना दररोजचे कार्यालयीन कामाचा तसेच मंत्रालयासंबंधीत कामाबाबत माहिती असल्याने त्यांना व श्री.मधुकर जयराम महाजन, वरिष्ठ लिपीक यांना दररोजचे कार्यालयीन कामासाठी व श्री.हरिश्चंद्र गोपाळ काते, शिपाई यांना दैनंदिन आवक जावक टपाल व

माल देवाण घेवाणीचे कामासाठी व श्री.शाम शिंदे, कंत्राटी कर्मचारी यांना बाथरुम व संडास तसेच कार्यालय साफ सफाईचे कामासाठी असे एकूण 04 कर्मचाऱ्यांना मुंबई कार्यालय येथे ठेवून उर्वरीत 03 स्थायी व 03 कंत्राटी एकूण- 06 कर्मचारी शिर्डी येथे वर्ग करणेबाबत तसेच मुंबई कार्यालयाकडील साईलीला मासिकाचे कामकाज शिर्डी येथे वर्ग करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.४३ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मुंबई कार्यालयाकडील कर्मचा-यांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत सदरहू कार्यालयाच्या गरजेनुसार कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा. तसेच मुंबई कार्यालय इमारतीमध्ये वास्तव्य करणा-या भाडेकरुंचा करारनामा अध्यक्ष महोदय यांना दाखविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ मालमत्ता कक्ष विभागप्रमुख)

---

विषय नं.१६ **लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेले परंतु विभागीय परिक्षेत दोन वेळा अनुत्तीर्ण झालेले संस्थान सेवेत कायम न केलेल्या कर्मचा-यांबाबत.**

प्रस्ताव- संस्थानने सन 1991 ते डिसेंबर 2000 अखेर जे कंत्राटी कर्मचारी सलग सेवेत होते अशा 1052 कर्मचाऱ्यांना दि.02 डिसेंबर 2006 रोजीचे आदेशान्वये वर्ग-04 चे पदावर एकत्रित मानधन रु.2000/- प्रति महिना याप्रमाणे संस्थान सेवेत सामावून घेणेत आले. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी कामावर हजर झाल्याचे तारखेपासून शासनाची मान्यता येईपर्यंत एवढया कालावधी करिता निश्चित करण्यात आलेला होता. दरम्यानचे कालावधीत शासन निर्णयान्वये सदर कर्मचाऱ्यांचे एकत्रित मानधनात वाढ करण्यात आली.

त्यानंतर, शासन निर्णय क्रमांक: सासंवि-2009/433/(37/09) का.सोळा. मंत्रालय मुंबई 32, दि.07/08/2009 नुसार शासनाने संस्थानचे आस्थापनेवरील एकूण 4826 (2908 स्थायी + 1918 कायम स्वरुपी कंत्राटी) पदांचे आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती दि.19/09/2009 रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस / वशी-01 / 3503 दि.01/10/2009 चे आदेशान्वये वेतनबँण्ड 4440-7440 अधिक ग्रेड पे 1300 ही वेतनश्रेणी दि.07/08/2009 पासून एकत्रित मानधनावरील वर्ग-04 चे 1052 कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली. या आदेशात कुशलचे वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, आकृतीबंधानुसार रिक्त पदे व प्रत्यक्षात करण्यात येणारे काम तपासून नियमानुसार वेतनबँड तसेच अकुशल कर्मचाऱ्यांना स्थानापन्नतेचे आदेश यथावकाश देण्यात येतील, असे नमूद करण्यात आले.

त्यानंतर, सदर कर्मचाऱ्यांपैकी मंजुर आकृतीबंधानुसार प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता ज्या कर्मचाऱ्यांनी धारण केलेली आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांना लिपीक-टंकलेखक, दूरध्वनी चालक, तारतंत्री, वेल्डर, वाहन चालक व इतर तांत्रिक पदांवर पुर्वलक्षी प्रभावाने दि.07/08/2009 पासून एकूण 141 कर्मचाऱ्यांना ज्या त्या पदावर एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना करण्यात आली.

यानंतरही वर्ग-04 पदावरील 12 कर्मचाऱ्यांनी लगतच्या पदाची प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता पुर्ण केल्याने त्यांची लिपीक-टंकलेखक, तारतंत्री वगैरे पदावर दि.01/11/2010 पासून एकूण 12 कर्मचाऱ्यांना एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना करण्यात आली.

तद्नंतर, संस्थानने दि.07/08/2009 व दि.01/11/2010 पासून एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना केलेल्या एकूण 153 कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक आहे किंवा नाही याची पडताळणी करणेकामी दि.14/11/2010 रोजी 100 गुणांची विभागीय लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेतली. सदर परिक्षेचे सिलबंध लखोटे उघडणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.19/11/2011 रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला. त्यावर मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्र.765(4) खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांच्या दि.14/11/2010 रोजी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेल्या कार्यवाहीच्या पदनिहाय प्रश्नोत्तर पत्रिका व गुणपत्रकांच्या याद्यांचे सिलबंद लखोटे आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक व इतर तांत्रिक पदांवर पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांच्या संस्थानमार्फत घेण्यात आलेल्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत, ज्या कर्मचाऱ्यांना लेखी परिक्षेत किमान 35% गुण व प्रात्यक्षिक परिक्षेत किमान 40% गुण मिळाले अशाच कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात यावे. तसेच या नियमानुसार अपात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी 1 वर्ष वाढवून त्यांना पुन:श्च एक संधी म्हणून त्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात याव्यात. जोपर्यंत सदरहू कर्मचारी उत्तीर्ण होत नाहीत अशा कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येऊ नये."

उपरोक्त निकषानुसार एकूण 153 कर्मचाऱ्यापैकी 138 कर्मचारी उत्तीर्ण झाले व 15 कर्मचारी अनुत्तीर्ण झालेले होते. उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत ज्या त्या पदावर कायम करण्यात आले. अनुत्तीर्ण कर्मचाऱ्याना जा.नं.एसएसएस/4782/2012 दि.23/01/2012 चे ज्ञापनाने लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत उत्तीर्ण होणेचे अटीवर त्यांचा परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात आलेला आहे. तसेच सदरची पूर्तता केल्यानंतर संबंधीतांना सेवेत कायम करणेबाबत तसेच वार्षिक पगारवाढ देणेबाबत विचार करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 (एक) मधील तरतुदीनुसार संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांचा एक वर्ष परिवीक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना पहिली वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

तद्नंतर, शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार स्थायी मंजूर विविध पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी तत्वत: मान्यता मिळणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समिती

दि.19/11/2011 रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्र.765(3) खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणाऱ्या मान्यतेच्या आधीन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध हुद्देवरील रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास तत्वता मान्यता देण्यात आली. विविध रिक्तपदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना, पदोन्नती द्यावयाचे पद व त्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेला संवर्ग, पदोन्नती पदाची शैक्षणीक पात्रता पदोन्नती द्यावयाच्या कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल व पदोन्नतीच्या पदावर काम करण्याची त्यांची कुवत इत्यादी बाबी विचारात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येतात. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थानमध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून, संस्थानचे सर्व विभागांचे संगणीकरण करण्यात येत आहे. या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतलेली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असून प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पदोन्नती द्यावयाचे पदावर, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधित पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात यावी व परिक्षामध्ये मिळणाऱ्या गुणानुसार त्यांची शैक्षणीक पात्रता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात यावी. या परिक्षेत पदोन्नतीस अपात्र ठरणाऱ्या अथवा गुणवत्ता प्राप्त न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना संधी देण्याचे दृष्टीने त्यांना सहा महिन्याची मुदत देऊन त्यांची पुन्हा समितीसमोर फेर परिक्षा घेण्यात यावी.

या परिक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशात खंबसवाडकर, नाशिक यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात येत असून या समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करण्यात येऊन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी."

तद्नंतर, यापुर्वीचे दि.14/11/2010 रोजीचे परिक्षेत अनुत्तीर्ण झालेले 15 कर्मचारी व वर्ग-04 पदावरील कर्मचाऱ्यांनी लगतच्या पदाची प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता पुर्ण केलेले इतर 110 कर्मचारी अशा एकूण 125 कर्मचाऱ्यांची पुन्हा दि.26/02/2012 रोजी उपरोक्त सल्लागार, श्री.प्रशांत खंबसवाडकर व समिती सदस्यांसमोर 100 गुणांची लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेली आहे.

सदर परिक्षेत यापुर्वी अनुत्तीर्ण झालेल्या 15 कर्मचाऱ्यांपैकी (दि.07/08/2009 रोजी पदस्थापना केलेल्यांपैकी) 7 कर्मचारी उत्तीर्ण झाले व 8 कर्मचारी पुन्हा दुसऱ्यांदा अनुत्तीर्ण झाले. उत्तीर्ण अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.15/09/2012 रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्र.791 नुसार उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात आले. परंतु जे कर्मचारी विभागीय परिक्षेत दुसऱ्यांदा अनुत्तीर्ण झाले अशा सर्व कर्मचाऱ्यांची पुनःश्च लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात यावी असे ठरले. दुसऱ्यांदा अनुत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ.नं | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| 01 | श्री.रावसाहेब चंद्रभान कासार | लिपीक-टंकलेखक | प्रसादालय विभाग |
| 02 | श्री.विजय यशवंत सोनवणे | लिपीक-टंकलेखक | साईबाबा भक्तनिवासस्थान |
| 03 | श्री.संजय तुळशीराम पठारे | लिपीक-टंकलेखक | प्रसादालय विभाग |
| 04 | श्री.सुनिल सुर्यभान तुरकणे | लिपीक-टंकलेखक | प्रसादालय विभाग |
| 05 | श्री.सुदाम निवृत्ती जमधडे | लिपीक-टंकलेखक | साईबाबा हॉस्पिटल |
| 06 | श्री.संतोष शामराव परसपाटकी | लिपीक-टकलेखक | लेखाशाखा विभाग |
| 07 | श्री संजय बबन डांगे | लिपीक-टंकलेखक | साईबाबा भक्तनिवासस्थान |
| 08 | श्री.भिवाजी जाखू देवकर | लिपीक-टंकलेखक | लेखाशाखा विभाग |

दरम्यानचे कालावधीत जा.नं.एसएसएस/वशी-01/330/2013 दि.26/04/2013 रोजीचे परिपत्रकान्वये मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त वायरमन, पुजारी, मुकादम व शिफ्ट सुपरवायझर या पदासाठी प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या कर्मचाऱ्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा तसेच मुलाखतीचे दि.28/04/2013 रोजी आयोजन करण्यात आले होते. परतु अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना यानी दि.23/04/2013 रोजी दिलेले पत्र व दि.27/04/2013 रोजी संघटनेने दिलेले निवेदन तसेच संघटनेने मा.हायकोर्टात कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीबाबत रिटपिटीशन दाखल करून मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांना समक्ष भेटून सदर परिक्षा तात्पुरत्या स्थगीत करणेबाबत केलेली विनंती इत्यादी सर्व बाबी विचारात घेऊन दि.28/04/2013 रोजी घेण्यात येणाऱ्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा तसेच मुलाखती तात्पुरत्या स्थगित ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच अद्यापपावेतो मा कोर्टाकडून सदर विषयी संस्थानला कोणत्याही प्रकारचे आदेश झालेले नाहीत.

तसेच, शासनाचे विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, 2004 चे कलम 5 मधील पोट-कलम (1), (2) तरतुदीस अनुसरून दि.27 मार्च 2012 रोजीचे

अधिसूचने अन्वये 15 सदस्यीय व्यवस्थापन समितीचे गठन करणेत आले होते. तथापि, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सदरचे अधिसूचनेस तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

त्यानंतर मा उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार दि.30/03/2012 पासून श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे कामकाज पहाणेसाठी त्रिसदस्य समितीचे गठन करणेत आलेले आहे. त्यामुळे यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.19/11/2011 निर्णय क्र.765 (3) अन्वये पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधीत पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी घ्यावयाचे संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेणेकामी व सदर परीक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांची नियुक्ती करणेत आली होती. तसेच पदनिहाय रिक्त पदावर पदोन्नती देणेकामी समितीचे पाच सदस्यांची उपसमिती गठीत करण्यात आली होती व या उपसमिती समोर परिक्षेची कार्यवाही करणेत येवून कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी असे ठरले होते. तथापि, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मा.त्रिसदस्य समितीचे गठन दि.30/03/2012 पासून करणेत आलेले असल्यामुळे उपरोक्त पाच समिती सदस्यांची उपसमिती आपोआप बरखास्त झालेली असल्यामुळे यापुर्वी अनुत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची तिसऱ्यांदा पुन:श्च लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेता आली नाही.

शासन क्रमांक: सासंवि-2012/प्र.क्र.19/पुनर्बांधणी-7/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-32 दि. 28 ऑक्टोबर, 2013 अन्वये शासनाने कर्मचारी सेवा विनियमास मान्यता दिलेली आहे. त्यातील सर्वसाधारण सेवा अटी विनियम, 2013 मध्ये (6) पदोन्नती आणि पदावनती मध्ये कलम नं.24 मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे -

कलम नं 24 (2) सर्व साधारणपणे "गुणवत्ता आणि सेवाज्येष्ठता" हे तत्व पदोन्नतीसाठी लागू करण्यात येते आणि संस्थानचा कोणताही कर्मचारी ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीचा दावा करु शकत नाही.

(3) या संबंधीच्या समितीच्या सर्वसाधारण निकषानुसार कार्यकारी अधिकारी विविध पदावरील पदोन्नतीसाठी निकष निश्चीत करु शकतात.

यापुर्वी मंजुर आकृतीबंधानुसार स्थायी रिक्त पदावर वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीने घेतलेले निर्णय तसेच निश्चित केलेल्या निकषानुसार विभागीय परिक्षा घेऊन पदोन्नती देणेबाबतची कार्यवाही केलेली आहे.

उपरोक्त नमुद बाबींचा विचार करता, लिपीक-टंकलेखक या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या कर्मचाऱ्यांना दि.07/08/2009 पासून लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेले परंतु परिविक्षाधीन कालावधीत त्यांचे काम समाधानकारक आहे किंवा नाही याची पडताळणी करणेकामी दि.14/11/2010 व दि.26/02/2012 रोजी घेतलेल्या विभागीय परीक्षेत दोन वेळेस अनुत्तीर्ण झालेले आहेत, त्यांना मा.व्यवस्थापन समिती दि.15/09/2012 चे सभेतील निर्णय क्र.791 नुसार पुन:श्च तिसरी संधी देऊन त्यांची 100 गुणांची लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेऊन यापुर्वीचे निकषानुसार उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना लिपीक-टंकलेखक या पदावर संस्थान सेवेत कायम करता येईल. उर्वरीत अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांना पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत अंतिम चौथी संधी देऊन यथायोग्य कार्यवाही करता येईल. तसेच येथूनपुढे संस्थानचे स्थायी पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना विभागीय परिक्षेत उत्तीर्ण होणेसाठी जास्तीत जास्त तीनच संधी देणेत येऊन कार्यवाही करता येईल. तीन संधीत उत्तीर्ण न होणारे उमेदवार आपोआपच नियुक्तीसाठी अपात्र होतील. तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४४ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना केलेले परंतु विभागीय परिक्षेत दोन वेळा संधी देऊनही अनुत्तीर्ण झालेल्या प्रस्तावित कर्मचा-यांना पुन:श्च एक वेळ संधी देण्यात येऊन, त्यांची उपसमिती समोर १०० गुणांची लेखी व प्रात्यक्षित परिक्षा घेण्यात यावी.**

**तसेच यापुढे संस्थानचे स्थायी पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना विभागीय परिक्षेत उत्तीर्ण होणेसाठी तीन वेळा संधी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१७ **राज्य गुप्त वार्ता विभाग, उपकेंद्र शिर्डी यांचे कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या रुमबाबत.**

प्रस्ताव- (अ) श्री.एन.झेड.गायकवाड, वरीष्ठ गुप्तवार्ता अधिकारी, राज्य गुप्तवार्ता विभाग यांनी दि.23/06/2011 रोजीचे पत्राने संस्थानकडे दैनंदिन कार्यलयीन कामकाजासाठी 01 रुम मिळणेची विनंती केलेली होती, त्यावर संरक्षण विभागाने सादर केलेल्या दि.23/06/2011 रोजीच्या टिपणीतील पार्श्वभूमीनुसार, "...मंदिर व मंदिर परिसराची सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेणेकामी दि.18/06/2011 रोजी तत्कालीन पोलीस महासंचालक श्री. अजित पारसनीस सा०. यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी येथे तत्कालीन कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांचेसमवेत झालेल्या बैठकीमध्ये राज्य गुप्तवार्ता विभाग, उपकेंद्र शिर्डी यांचे कार्यालयासाठी संस्थानची एक खोली उपलब्ध करुन देण्याबाबत ठरलेले होते. त्यानुसार संरक्षण विभागाने सादर केलेली दि.01/07/2011 रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार, राज्य गुप्तवार्ता विभाग, उपकेंद्र शिरडी यांचे कार्यालयाकरीता इकडील विभागाचे दि.23/08/2011 रोजीचे आदेशाने जुन्या प्रसादालयातील उपभांडाराच्या पश्चिमेकडील 13 x 11.9" या आकाराची खोली महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार होणारी भाडे रक्कम सेवाआकार म्हणून व मिटर रिडींगप्रमाणे होणारी विद्युत आकार दरमहा भरण्याचे अटीवर उपलब्ध करुन देणेत आलेली होती.

(ब) राज्य गुप्तवार्ता विभाग, उपकेंद्र शिर्डी यांचे कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या खोलीचे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार होणारी भाडे रक्कम निश्चित करणेकामी सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोणी यांना दि.14/09/2011 रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. तथापी, त्यांनी

याकामी संबधीत इमारतीचे 1. बांधकाम पूर्ण झालेबाबत नगरपालिका दाखला. 2. इमारत नकाशा. 3. जागेचा उतारा इ. कागदपत्रांची मागणी केलेली होती व सदरचे पूर्ततेनंतर होणारी भाडे रक्कम कळविणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोणी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणेकामी संस्थानचे बांधकाम विभागास वेळोवेळी लेखी व तोंडी कळविलेले आहे. परंतु सदर इमारत फार जुनी असल्याने कागदपत्रे उपलब्ध नसल्याबाबत बांधकाम विभागाकडून तोंडी कळविणेत आलेले असून आज अखेर त्यांचेकडून याबाबतची माहिती अप्राप्त आहे. त्यामुळे राज्यगुप्तवार्ता विभाग यांचेकडून सदर खोलीचे भाडे अद्यापही वसूल करता आलेले नाही.

**(क)** दरम्यानचे काळात राज्य गुप्तवार्ता विभाग यांनी दि.29/01/2014 रोजीचे अर्जाने, कार्यालयासाठी देण्यात आलेल्या जुन्या प्रसादालयातील रुम ऐवजी व्दारावती भक्तनिवास येथील तळमजल्यावरील खोली क्रं.02 (ड्रायव्हर रुम) बदलून मिळणेबाबतची विनंती केलेली होती. त्यानुसार त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-01/5619/2014 दि.07/03/2014 रोजीचे आदेशाने व्दारावती भक्तनिवास या इमारतीमधील तळमजल्यावरील खोली क्रं.02 (ड्रायव्हर रुम) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार संस्थान निश्चित करील त्याप्रमाणे होणारी भाड्याची रक्कम व होणारी विद्युत आकाराची रक्कम दरमहा भरण्याचे अटीवर उपलब्ध करुन देणेत आलेली असून, त्यांनी सदर खोलीचा ताबा दि.01/05/2014 पासून घेतलेला आहे.

व्दारावती भक्तनिवासस्थान येथे उपलब्ध करुन देणेत आलेल्या खोलीचे महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार होणारी भाडे रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून इकडील कार्यालयास दि.23/12/2014 रोजीचे पत्राने प्राप्त झालेली असून त्यांनी निश्चित करुन दिलेल्या रक्कमेनुसार संबधीतांना दि.01/05/2014 ते दि.31/12/2014 अखेर होणारी भाडे रक्कम कळविणेकामी दि.28/12/2014 रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती, तथापी त्यावर खालील प्रमाणे निर्देश नोंदविणेत आलेले आहेत.

1. 25/2012 केसमध्ये चौकशी सुरु आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत विषय तहकूब ठेवावा.

2. 11 महिन्याच्या कराराने देता येईल असे मत आहे. व्यवस्थापन समितीची मान्यता घेतली किंवा कसे याचा उल्लेख नाही. नसल्यास व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

**(ड)** संरक्षण विभागाचे दि.01/07/2011 रोजीचे मंजुर टिपणीनुसार राज्य गुप्तवार्ता विभाग यांचे कार्यालयासाठी इकडील विभागामार्फत जुन्या प्रसादालयातील खोली प्रशासकीय पातळीवर उपलब्ध करुन देणेत आलेली होती. याबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत आलेली नव्हती, त्यामुळे उपरोक्त निर्देशानुसार सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेकरीता सादर करता येईल.

तत्पूर्वी राज्य गुप्तवार्ता विभाग यांना जुन्या प्रसादालयातील 13 x 11.9" या आकाराची खोली महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बाधकाम विभागाकडील दराप्रमाणे होणारे भाडे रक्कम सेवाआकार म्हणून दरमहा भरणेची अटीवर उपलब्ध करुन देणेत आलेली होती. परंतु सदर इमारती संबधी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे रक्कम निश्चित करुन मिळालेली नाही, त्यामुळे राज्य गुप्तवार्ता विभाग यांचेकडून दि.01/09/2011 ते दि.30/04/2014 अखेर पर्यंतचे भाडे अद्यापही वसूल करता आलेले नाही. त्यामुळे सदर बाब मा. त्रिसदस्य समितीचे निर्देशनास आणून देणे आवश्यक आहे.

तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचेकडील जा. नं. 13240/2014 दि.17/12/2014 रोजीचे पत्राने राज्य गुप्तवार्ता विभाग यांचे कार्यालयाकरीता सध्या व्दारावती भक्तनिवासस्थान येथे उपलब्ध करुन देणेत आलेल्या खोलीचे महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्क्वेअर फुटाचे दरानुसार होणारी भाडे रक्कम रु.3,435/- मात्र (स्थानिक कर वगळून) दरमहा असल्याचे कळविले असून, त्या दरानुसार संबधीताकडून सध्याचे व पुर्वीचे भाडे वसुल करता येईल असे मत आहे.

तरी (अ) राज्य गुप्त वार्ता विभाग, उपकार्यालय शिर्डी यांचे कार्यालयासाठी संरक्षण विभागाचे दि.01/07/2011 रोजीचे मंजुर टिपणीनुसार उपलब्ध करुन देणेत आलेल्या जुने प्रसादालयातील व त्यानंतर दि.07/03/2014 रोजीचे आदेशाने सध्या व्दारावती भक्तनिवासस्थान येथे उपलब्ध करुन देणेत आलेल्या खोलीस कार्योत्तर मान्यता मिळणेस (ब) संबधीतांना यापूर्वी कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या जुन्या प्रसादालयातील उपभांडाराच्या पश्चिमेकडील 13 x 11.9" खोलीचे वापरापोटी अद्याप वसुल न करता आलेले (दि.01/09/2011 ते दि.30/04/2014 अखेरचे) व त्यापुढील भाडे रक्कम, संबधीतांना सध्या व्दारावती भक्तनिवासस्थान येथे उपलब्ध करुन देणेत आलेल्या खोलीचे दरा प्रमाणे (दरमहा रुपये 3,435/- या दराने) वसुल करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४५ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, राज्य गुप्त वार्ता विभाग, उपकार्यालय शिर्डी यांचे कार्यालयासाठी व्दारावती भक्तनिवासस्थान येथे उपलब्ध करुन देणेत आलेल्या खोलीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**तसेच त्यांना यापूर्वी उपलब्ध करुन देणेत आलेल्या जुन्या प्रसादालयातील उपभांडाराच्या पश्चिमेकडील 13 x 11.9" खोली वापरापोटीचे (दि.01/09/2011 ते दि.30/04/2014 अखेरचे) भाडे वसूल करणेसाठी त्या ठिकाणची जागा मोजा व महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार होणारी रक्कम भाडे म्हणून जमा करा, असे लेखी कळविणेत यावे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१८ **श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

प्रस्ताव- श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार,आरोग्य विभाग हे दि.०५-१२-२००६ पासून संस्थान सेवेत वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. श्री.बनसोडे हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत असतांना

त्यांचेकडून दि.२०-१२-२०१३, दि.२३-१२-२०१३ ते दि.२९-०८-२०१४ अखेर २५१ दिवस या कालावधीत खलीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.२०-११-२०१३,दि.२३-१२-२०१३ ते दि.२९-०८-२०१४ अखेर २५१ दिवस या कालावधीत पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीले आहे.त्यामुळे कामाची गैरसोय झाली.श्री.बनसोडे यांना विनापरवानगी,रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे.असे प्र.अधिक्षक,आरोग्य विभाग यांची निवदेन प्राप्त झालेली आहे.श्री.बनसोडे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून,गंभीर गैरशिस्त् वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त् वर्तनाबाबत श्री.बनसोडे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३१६८/२०१४ दि.२७-१२-२०१३,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३३७२/२०१४ दि.०८-०१-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ५२४९/२०१४ दि.१५-०२-२०१४,जा.नं.दि.१५-०२-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५७३२/२०१४ दि.१२-०३-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५८/२०१४ दि.१०-०४-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६१२/२०१४ दि.१०-०५-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७/१३०८/२०१४ दि.१७-०६-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६४४/२०१४ दि.०८-०७-२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून,त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते.तथापि, श्री.बनसोडे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा काढून,त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते.तथापि,श्री.बनसोडे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा काढून अनुक्रमे दि.१५-०१-२०१४, दि.२१-०१-२०१४,दि.२६-०२-२०१४, दि.२४-०३-२०१४, दि.२१-०५-२०१४, दि.२५-०६-२०१४, दि.१४-०७-२०१४ रोजी प्राप्त् होऊन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते

म्हणून श्री.बनसोडे यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/२१२३/२०१४ दि.१८-०८-२०१४ अन्वये आरोपपत्र् देवून, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑडर्स) अॅक्ट,१९४६ चे कलम क्र.२४ (एफ),२४ (एल) व २४ (एक्स) प्रमाणे नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग दहापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे.आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सव्दर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे,स्टॅंडिंग ऑडर्स अनुसाराचे आरोपपत्र आदेश किंवा इतर पत्र घ्यायला नकार देणे इ.कृत्ये हे दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑडर्स) अॅक्ट १९४६ चे कलम नंबर २४ (एफ),२४ (एल) व २४ (एक्स) अन्वये गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री.बनसोडे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते.

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचे विरुध्द दि.१८-०८-२०१४ रोजी ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खातेचौकशी अॅडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करुन, त्यांचा दि.०१-१२-२०१४ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

आदेश

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आहेत.श्री.बनसोडे यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑडर्स) अॅक्ट,१९४६ मधील मॉडेल स्टॅंडींग ऑटर्स कलम २४ (एफ),२४ (ए),२४ (एफ),२४ (एक्स) चा भंग केल्याने ते दोषी आहेत.

श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.बनसोडे हे दि.२५-०५-२०११ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले म्हणून त्यांना दि.२५-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

२) श्री.बनसोडे हे दि.२४-०८-२०११,दि.२५-०८-२०११,दि.३१-०८-२०११ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि २४-१०-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

३) श्री.बनसोडे हे दि.०७-१०-२०११,दि.१९-१०-२०११,दि.२०-१०-२०११,दि.२८-१०-२०११ ते दि.२०-११-२०११ असे २७ दिवस विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२३-१२-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

४) श्री.बनसोडे हे दि.३०-११-२०११ ते दि.०२-१२-२०११,दि.११-१२-२०११,ते दि.१४-१२-२०११ अखेर ०७ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहिले.म्हणून त्यांना दि.३०-०१-२०१४ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

५) श्री.बनसोडे हे दि ११-०१-२०१२ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.११-०२-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

६) श्री.बनसोडे हे दि.२३-०१-२०१२,दि.२४-०५-२०१२ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१२-०४-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

७) श्री.बनसोडे हे दि.०१-०५-२०१२ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०५-०७-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून सक्त ताकीद देणेत आली.

८) श्री.बनसोडे हे दि.१०-०६-२०१२ ते दि.३०-०९-२०१२ अखेर ११३ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहिले, म्हणून त्यांना दि.२७-१०-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

९) श्री.बनसोडे हे दि.१३-११-२०१२ ते दि.३१-०१-२०१३ अखेर ८० दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१९-०३-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

१०) श्री.बनसोडे हे दि.०१-१०-२०१२ ते दि.२८-१०-२०१२ अखेर २८ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२३-०३-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून एक दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

११) श्री.बनसोडे हे दि.०१-०२-२०१३ ते दि.१९-०३-२०१३ अखेर ४७ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०८-०५-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून तीन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

१२) श्री.बनसोडे हे दि.१७-०५-२०१३ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१०-०७-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

१३) श्री.बनसोडे हे दि.२६-०६-२०१३ ते दि.२८-०९-२०१३ अखेर ९५ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०७-११-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.

१४) श्री.बनसोडे हे दि.११-१०-२०१३ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.२८-१२-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

१५) श्री.बनसोडे हे दि.१४-१०-२०१३ रोजी विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.०४-१२-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली.

१६) श्री. बनसोडे हे दि.२०-११-२०१३,दि.२३-१२-२०१३ ते दि.२९-०८-२०१४ अखेर २५१ दिवस या कालावधीत विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीले.म्हणून त्यांना दि.१८-०८-२०१४ रोजीचे आदेशान्वये खाते चौकशीकामी आरोपपत्र देण्यात आलेले असून त्यांचा खाते चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून त्यात ते दोषी आहेत.

अशाप्रकारे श्री.बनसोडे यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकूण १५ वेळा शिक्षा झालेली असून,त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

श्री.बनसोडे यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत. आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑडर्स) रूल्स १९५९ चे कलम २५ (१) अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

अ) ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

ब) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट,१९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा.(एकुण वेतनाचे ३/ इतका दंड)

क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

ड) नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

सबब,श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने,व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने,त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत वरील अ,ब,क,ड या चार शिक्षेपैकी एक शिक्षा देता येईल.

तसेच श्री.बनसोडे यांना ड प्रमाणे शिक्षा करावयाची झाल्यास त्यांना प्रथम संस्थान सेवेतुन बडतर्फ (डिसमीस) का करु नये अशी सेकंड शोकॉज नोटीस देवुन,त्यासोबत दि.०१-१२-२०१४ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल श्री.बनसोडे याना पाठवावा लागेल.त्याकामी श्री.बनसोडे याचेविरुध्द संस्थानचे वतीने मा. कामगार व औद्योगिक न्यायालय,अहमदनगर व मा.दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन,कोपरगाव व ज्युनियर डिव्हीजन,राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागले.

सबब, श्री.किशोर मार्कस बनसोडे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने,व ते खातेचौकशीत दोषी आढळुन असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेपैकी कोणती शिक्षा करावी.सदरचे प्रस्ताव श्री. बनसोडे यांना करावयाचे शिक्षेकरीता सविनय सादर.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.४६** **दि.०१.०१.२०१५ पासून संस्थान कर्मचा-यांना नवीन सेवानियम लागू केलेले असून श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांची गैरशिस्त वर्तनाबाबतची चौकशी जुन्या सेवानियमास अनुसरुन झालेली असल्यामुळे त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षाही जुन्या सेवानियमास अनुसरुनच करणेत यावी, असे समितीचे मत आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.किशोर मार्कस बनसोडे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत दोषी आढळून आलेले असल्याने, तसेच आरोपपत्रातील आरोपाचे गांभीर्य विचारात घेऊन, त्यांना दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑडर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (१) मधील ड प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय बडतर्फ करणेत यावे, अशी शिक्षा देता येईल. मात्र तत्पुर्वी शेवटची संधी म्हणून श्री.बनसोडे**

यांना संस्थान सेवेतून बडतर्फ का करणेत येऊ नये? अशी अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व त्या नोटीसीसोबत खाते चौकशी निष्कर्ष अहवालाची प्रत पाठविणेत यावी. सदर नोटीसीस अनुसरुन श्री.बनसोडे यांनी लेखी खुलासा सादर केलेनंतर पुन्हा प्रस्ताव त्रीसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

विषय नं.१९ **श्रींचे शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीतील नियोजनाबाबत.**

प्रस्ताव- श्रींचे समाधीस सन २०१७-१८ मध्ये १०० वर्षे होत असल्याने श्री पुण्यतिथी उत्सव -२०१८ चे कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांचे नियोजन करण्यापुर्वी या महाउत्सवाचे कालावधीत साज-या करण्यात येणा-या कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे, याबाबत भक्तांच्या कल्पना/ अभिप्राय मागविणेकामी जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक तसेच देशाचे तसेच सर्व राज्यांचे राजधानीचे तसेच मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपुर या ठिकाणाहुन प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्रामध्ये मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेमध्ये देणेस तसेच संस्थानचे वेबसाईटवर प्रसिद्ध करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता घेणेकामी मा.व्यवस्थापनसमितीचे दि.०६.११.२०१४ रोजीचे बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्र.९४१ अन्वये प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली व झालेल्या चर्चेनुसार फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले आहे.

त्यानुसार वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाचे जाहिरातीचा नव्याने मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये मसुदा तयार करुन त्यानुसार जाहिरात प्रसिद्ध करणेकामी येणारा खर्चाबाबत जनसंपर्क कार्यालय यांचेकडुन खर्चाचा अभिप्राय मागविण्यात आला होता. जनसंपर्क विभाग यानी "मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.१५/०९/२०१४ च्या सभेतील निर्णय क्र.७८६ नुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत संस्थानच्या विविध विभागांच्या सूचना, पाहिजेत, प्रवेश सूचना, आदि प्रकारच्या जाहिराती विविध वर्तमानपत्रात शासकीय दराने प्रसिद्ध करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मंदिर विभागाची जाहिरात शासकीय दराने प्रसिद्ध करावयाची झाल्यास सदरची जाहिरात महाराष्ट्रात मुंबई शहरातील ०२ इंग्रजी व ०२ मराठी दैनिके, पुणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापुर व नागपूर या प्रमुख शहरातील ०१ मराठी दैनिकातून शासकीय दराने प्रसिद्ध करण्यासाठी सुमारे २ लाख रुपये खर्च अपेक्षीत आहे. त्याचबरोबर उपरोक्त जाहिरात प्रसिद्ध करावयाची झाल्यास खर्चाचा अंदाज करणे अवघड आहे."

सोबत जोडण्यात आलेल्या मसूद्याप्रमाणे मराठी, व इंग्रजी भाषेमध्ये जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत शासकीय दराने महाराष्ट्रात मुंबई शहारातील ०२ इंग्रजी व ०२ मराठी दैनिके पुणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापुर व नागपूर या प्रमुख शहरतील ०१ मराठी दैनिकातून प्रसिद्ध करणेस व याकामी येणारे ०२ लाख रुपये खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदर जाहिरात संस्थानचे वेबसाईटवर नव्याने मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात आलेल्या मसूद्याप्रमाणे प्रसिद्ध करणेस व वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी होणा-या खर्चास मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेची मान्यता असावी ही विनंती आहे.

निर्णय क्र.४७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे शताब्दी महोत्सव २०१७-१८ या महाउत्सवाचे कालावधीत साज-या करण्यात येणा-या कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे, याबाबत भक्तांच्या कल्पना/ अभिप्राय मागविणे कामी या नियोजनाबाबतचा प्रस्तावित मजकुर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.**

**तसेच सदरहू मजकुर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द झालेपासून एक महिन्यासाठी मुदतीपर्यंत साईभक्तांच्या मार्गदर्शनपर सुचना स्विकारणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग/ कुंभमेळा व शताब्दी महोत्सव कक्ष)

---

विषय नं.२० **मंदिर व मंदिर परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तू बाबत.**

प्रस्ताव- मंदिर व मंदिर परिसरात सापडलेल्या बिनधनी रक्कमा, वस्तु संरक्षण कार्यालयात जमा होत असतात कर्मचाऱ्यांनी अथवा साईभक्तांनी सापडलेल्या वस्तू अथवा पैसे जमा केलेनंतर त्याची रितसर पोहोच जमा कर्त्यास देण्यास येते. दर महिण्याचे अखेरीस सदरील रक्कम व वस्तूंची रितसर प्रशासकिय मंजुरी घेऊन लेखाशाखा विभागात जमा करण्यात येतात. सदरील दप्तराची ऑडीटर मार्फत तपासणी करण्यात येते अशाप्रकारे बिनधनी वस्तू व रकमेबाबतची कार्यवाही आजतागायत चालू आहे. दुसरे असे की, मंदिर व परिसरात गर्दीमध्ये बऱ्याच भक्ताचे पैसे पाकीट चोरीस जातात अशा भक्तांजवळ त्यांचे गावी जाण्यापुरते सुद्धा पैसे शिल्लक रहात नाही. त्यामुळे असे असहाय्य साईभक्त संरक्षण कार्यालयात येऊन मदतीची याचना करतात. परंतु संस्थानमार्फत अशा कुठल्याही तजवीज नसल्यामुळे भक्तांस मदत करता येणे शक्य होत नाही.

करीता संरक्षण विभागामार्फत लेखाशाखेत दरमहा जमा होणाऱ्या बिनधनी रकमेचा लेखाशाखेमार्फत स्वतंत्र भक्त मदत सुविधा नावाची योजना तयार करुन त्या खाती सदरील रक्कम जमा करता येईल व ज्या साईभक्तांचे पैसे चोरीस गेले अथवा हरवले आहेत अशा साईभक्तांची त्याबाबत शहानिशा करुन त्यांचे गावापर्यंतचे प्रवास भाडयापुरते पैसे लेखाशाखेमार्फत सदरील योजनेतून त्यांना पैसे देता येईल व त्याची रितसर स्वतंत्र नोंद लेखाशाखा विभागाकडे ठेवता येईल.सदर भक्त मदत सुविधा योजनेस विषय न.43 व निर्णय क्रं.699 अन्वये सदर प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे बिनधनी रकमेचा भक्त मदत सुविधा फंड तयार करुन त्यामध्ये संस्थानचा रुपये 1 लाख निधी टाकण्यात यावा.ज्या साईभक्तांचे पैसे चोरीस गेले अथवा हरवले आहेत अशा साईभक्तांची त्याबाबत शहानिशा करुन त्यांचे गावापर्यंतचे प्रवास भाडयापुरते पैसे देणेबाबत मुख्य लेखाधिकारी व संरक्षण अधिकारी यांनी शहानिशा करुन निर्णय घ्यावा. असे ठरले आहे.

त्यानुसार ज्या साईभक्तांचे मंदिर व मंदिर परिसरात पैसे पाकीट चोरीस अथवा गहाळ झाले व त्यांना त्यांचे गावी परत जाण्यासाठी पैसे नाही अशा साईभक्तांनी शिर्डी पोलिस स्टेशन शिर्डी येथे फिर्याद अथवा नोंद केले नंतर त्यांना शिर्डी पोलिस स्टेशन मार्फत नोंद घेतल्याची पावती देण्यात येते अशा साईभक्तांना त्यांचे गावी जाण्यासाठी, प्रवास भाडे व चहापाणी नाष्टा याकरिता सदर भक्त मदत फंड योजनेतून रक्कम देण्यात येते. सदरची कार्यवाही ही दि.28.12.2009 पासून चालू असून आजअखेर रक्कम रुपये 2,28,430/- मात्र साईभक्तांना भक्त मदत सुविधा फंड योजनेमधून मदत करण्यात आलेली आहे.

तथापी माहे ऑक्टोंबर 2014 मध्ये सापडलेल्या बिनधनी वस्तु/ रक्कम लेखाशाखेकडे जमा करणेसाठी दि.24/11/2014 रोजी टिपणी सादर केली असता सदरचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी बिनधनी वस्तूबाबत विल्हेवाट लावण्याचा कायद्यानुसार संस्थानला अधिकार आहे काय? कायदेशीर सल्ल्यासह सादर करावे असे निर्देश दिले होते. त्यानुसार सरक्षण विभागाने जा क्रं.927/2014 दि.21.12.2014 रोजी विधी अधिकारी विधी विभाग याना कायदेशीर सल्याबाबत विचारले असता विधी विभागाने ॲड.आर एस जपे पाटील, कोपरगाव कोर्ट यांचा सल्ला घेतला असता त्यांनी पुढील प्रमाणे लेखी सल्ला दिला आहे.

1. धनिविरहीत सापडलेल्या अगर मिळालेल्या वस्तूंची विल्हेवाट कशी लावावी खर्च कसा वसूल करावा व काय कार्यवाही करावी व कसे अधिकार आहेत हे इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट कलम 169 प्रमाणे नमुद आहे.
2. आपले कार्यवाहीत सर्व सामान्य नियमावली करून त्या नियमावली अंतर्गत ठराविक कालावधी अंतर्गत सापडलेली वस्तू घेवून जाणेबाबत जाहिर प्रगटन करावे. संबधीत कालावधीत कोणी मालकी सांगणेस अगर वस्तू मागणेस आले तर ती वस्तू योग्य तो पुरावा ठेवून मालकीची शहानिशा करून संबधित व्यक्तीस घ्यावी. तशा प्रसंगी कोणीही मालकीसाठी व कब्जा मागणीसाठी आले नाही तर संबधित वस्तूची विक्री करुन आलेली रक्कम ठराविक खात्यात जमा करावी.
3. वरील कार्यवाहीसाठी सामान्य नियमावली सामान्य कालावधी, विल्हेवाट साठवण वगैरे संदर्भात धोरण ठरवावे त्यासाठी लागणारी नियमावली व साधारण कार्यपद्धतीचा मसूदा करता न आल्यास तो माझे कार्यालयातून करून दिला जाईल.

वरीलप्रमाणे वस्तूंची विल्हेवाट लावण्याची आपले कार्यालयास अधिकार आहेत व तो इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टचे वरील कलम 168 व 169 अंतर्गत करता येईल.टिप वरील सर्व कार्यवाहीस पुर्ण सुसूत्रता सामान्य धोरण नियम व कार्यवाही भविष्यातील सोयीसाठी करावी सविस्तर माहितसाठी व चर्चेसाठी माहितगार इसम आल्यास समन्वय चांगला होईल. तसेच इंडिन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट चे पुस्तीकेची पानाची छायांकित प्रत दिली आहे.

तरी आपल्या लेखी निर्देशावरून कायदेशीर सल्ला घेवून संस्थानच्या परिसरात (मंदिर व मंदिर संलग्न भाग) सापडलेल्या बिनधनी वस्तूची विल्हेवाट लावण्याची आपले कार्यालयास अधिकार असल्यामुळे सदरच्या वस्तू ,रोख रक्कम, सोने व चांदी पूर्वी प्रमाणे प्रथा चलू ठेवावी असा कायदेशीर सल्ला लेखी पत्राद्वारे दिलेला आहे.

तरी मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान सलंग्न परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तूंची विल्हेवाट लावणेबाबतची प्रस्तावात नमृद केले प्रमाणे कार्यवाही ही इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट प्रमाणे योग्य असल्याने सध्या चालू आहे त्याच पद्धतीने सापडलेल्या बिनधनी वस्तूंची विल्हेवाट लावण्यास (लेशाखाशेकडे जमा करणेस) मान्यता असावी.

निर्णय क्र.४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तूंची विल्हेवाट लावणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, (१) रोख रक्कम/ सोने, चांदी, मौल्यवान व इतर बिनधनी वस्तू/ साहित्य सापडल्यास त्या वस्तूंची माहिती त्वरीत मंदिर परिसरातील ध्वनीक्षेपण कक्षामार्फत प्रसारीत करणेत यावी. त्यानंतर वस्तू/ साहित्य घेण्यास आल्यास त्या वस्तू/ साहित्याची संरक्षण अधिकारी यांनी योग्य पुराव्यानिशी पडताळणी करुन वस्तू/ साहित्य परत कराव्यात.**

**(२) वरील नं.१ मधील नमूद कार्यवाहीनंतर शिल्लक असलेल्या वस्तू/ साहित्यापैकी रोख रक्कम, सोने, चांदी व इतर मौल्यवाण वस्तू ह्या लेखाशाखा विभागात लवकरात लवकर जमा कराव्यात.**

**(३) वरील नं.१ मधील नमूद कार्यवाहीनंतर शिल्लक राहिलेल्या इतर वस्तू/ साहित्य यांची यादी वर्तमानपत्रामध्ये जाहीर करुन त्या वस्तूंची ओळख पटवून घेऊन जाव्यात, अन्यथा एक महिन्यानंतर त्यांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेत येईल, असे प्रसिध्द करणेत यावे.**

**(४) वर्तमानपत्रातील प्रसिध्दीपासून एक महिन्याचे कालावधीनंतर बिनधनी वस्तू/ साहित्यांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेत यावी व रोख रक्कम संस्थानखाती जमा करुन घेण्यात यावी.**

**याप्रमाणे सापडलेल्या बिनधनी वस्तू/ साहित्य यांची विल्हेवाट लावणेकामी प्रतिमाह कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.२१ वाहन विभागाकडील सर्व वाहनांचा विमा नुतनीकरण करणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद- १७ (२) (ड) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्ताविक:-** वाहन विभागाकडे कार्यालयीन, रुग्णवाहीका, बसेस व मालवाहतुक अशी विविध प्रकारची एकुण 78 वाहने वापरात आहे. सदर वाहनांचा विमा दि.31.03.2015 अखेर संपुष्टात येत असलेने पुढील दि.01.04.2015 ते दि.31.03.2016 अखेर एक वर्षाकरीता सर्व वाहनांचा विमा उतविण्याचा असलेने राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून ई-निविदा बोलाविणे आवश्यक आहे. याकामी अंदाजे रु.15,00,000/- (अक्षरी रक्कम रु. पंधरा लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**मागणी:-** उपरोक्त प्रमाणे वाहन विभागातील सोबतच्या यादीतील सर्व वाहनांचा विमा नुतणीकरण करणे कामी राष्ट्रीयकृत कंपन्या यांचेकडून ई-निविदा बोलाविणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.15,00,000/- (अक्षरी रक्कम रु. पंधरा लाख) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** वाहन विभागाचे सन-2015-16 या आर्थीक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये विमा खर्चाकरीता रु.20,00,000/- मात्र खर्चाची तरतुद असुन सदरचा खर्च मोटारकार विमा खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

निर्णय क्र.४९ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील एकूण ७८ वाहनांचा विमा दि.३१.०३.२०१५ पुर्वी नुतनीकरण करणेस व धाकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

वाहन विभागाकडील वाहने वेगवेगळया मॉडेल व आसन क्षमतेचे आहेत. त्याकरिता कार्यालयीन, रुग्णवाहीका, मालवाहतूक वाहनांकरिता वेगळया व सर्व बसेस करिता वेगळी या अशा दोन स्वतंत्र निविदांची वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून मागणी करणेत यावी.

तसेच वाहन विभागाकडे १२ कार्यालयीन वाहने असून सध्या स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे या वाहनांचा वापर होत नाही व दुरुस्ती देखभालीचा खर्च करावा लागत आहे. त्यामुळे कार्यालयीन वाहनांमधील ०८ वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.२२ **Van Mounted Hyderaulic Extension Ladder खरेदी करणेकामी दि.०८.०१.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६ मध्ये बदल होणेबाबत.**

प्रस्ताव- मा. मुंबई उच्च न्यायालयाचे मुंबई औरंगाबाद खंडपिठाने **C.A NO. 8707 OF 2014 IN P.I.L NO. 18 OF 2011** अन्वये रक्कम रु. **40,00,000/-** (अक्षरी रक्कम रु.चाळीस लाख) इतक्या खर्चास प्रस्तुत हायड्रोलिक लॅडर खरेदी करणे कामी मान्यता मिळाली आहे.

विद्युत विभागाने संदर्भीय **अ.न.1** नुसार इकडील विभागामार्फत लॅडर खरेदीची प्रक्रिया राबवणे बाबत कळविले आहेत. तथापी मा.व्य.समितीचा निर्णय विदयुत विभागाची मागणी याबाबत भिन्नता आढळलेने इकडील विभागाने दि.25/12/2014 रोजी विद्युत विभागाकडुन लॅडरचे तांत्रिक विश्लेषणाबाबत निश्चित मागणी कळविणे कामी पत्र दिलेले होते.

संदर्भीय **अ.न.2** नुसार विद्युत विभागाने 25 मिटर उंचीचे लॅडर लवकर वेळेत उपलब्ध होत नसलेने 20 मिटर उंचीचे लॅडरची खरेदी प्रक्रीया राबवावी असा अभिप्राय दिलेला आहे.

**मागणी :-** लॅडरच्या उंची बाबत 25 मिटर ऐवजी 20 मिटर पर्यंत असा तांत्रिक बदल मा.व्य.समितीचे सभेत होणे कामी लेखा परिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असले कारणाने सदरचा विषय मा. व्य. समितीचे (त्रिसदस्य) सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** कलम 21 (1) क नुसार

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** विद्युत विभागाचे मागणीनुसार 20 मिटर पर्यंतचे लॅडर दैनंदिन विदयुत विभागाचे पोलचे लाईटींग दुरुस्ती कामकाजाकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरीता 25 मिटर लॅडरची उंची ऐवजी 20 मिटर लॅडर उंची असा तांत्रिक बदल मा. व्य. समितीचे (त्रिसदस्य) सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.५० **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी खरेदी करावयाचे २५ मीटर उंचीचे Van Mounted Hyderaulic Extension Ladder च्या उपलब्धतेबाबत उत्पादक कंपन्यांच्या संकेतस्थळावरुन माहिती संकलित करणेत यावी व २५ मीटर उंचीचे लॅडर उपलब्ध न झाल्यास २० मीटर उंचीचे लॅडरने आपली गरज भागत असेल तर ती विहीत पध्दतीने खरेदी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.२३ **स्टेट बॅंक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- स्टेट बॅंक ऑफ इंडिया यांनी दि. 23/11/2014 रोजीचे पत्राने संस्थानचे सिटी सर्व्हे नं.32 मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील 162.88 स्क्वे.मीं. जागेस दि. 11/11/2014 पासून पुढे मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

स्टेट बॅंक ऑफ इंडियास मा. त्रिसदस्य समितीचे दि.04/11/2013 चे सभेत आयत्या वेळचा विषय नं. 02 निर्णय क्र. 888 चे निर्णयास अनुसरुन मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं. 3686/2014 दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. 02/05/2014 रोजी खालील प्रमाणे आदेश केलेला आहे.

"By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions."

उपरोक्त आदेशास अनुसरुन स्टेट बॅंक ऑफ इंडियास साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील जागेस जा.क्र एसएसएस वशी- विधी/ 811/2014 दि. 15/05/2014 चे आदेशाने दि. 11/11/2013 ते दि. 10/11/2014 अखेर एक वर्षाचे कालवधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. सदरची मुदत दि. 10/11/2014 रोजी संपुष्टात आलेली आहे, त्याबाबतचा करारनामा करण्यात आलेला आहे. आता स्टेट बॅंक ऑफ इंडिया यांनी बॅंकेसाठी

साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील 162.88 स्क्वे.मी. जागेस दि. 11/11/2014 पासून पुढे मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

संस्थान अधिनियम 2004 : - कलम 17 (3) नुसार विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही, अशा आशयाचा आहे.

मा.उच्च न्यायालयाचे दि. 16/10/2012 रोजीचे निर्देश:-6 (अ) मध्ये-shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2-trust; असा असून त्यात संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये.

(ब) मध्ये- shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2 - Trust; असा असून त्यात संस्थान मार्फत कोणत्याही प्रकारचे अचल मालमत्तेच्या खरेदीचे कॉंट्रक्ट किंवा करारनामे करु नये, असा आदेश झालेला आहे.

विभागाचा अभिप्राय:- उपरोक्त संस्थान अधिनियम व मा. उच्च न्यायालयाचे दि. 02/05/2014 रोजीचे आदेशाचा विचार करता, स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे सिटी सर्व्हे नं.32 मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील 162.88 स्क्वे.मी. जागा बँकेसाठी दि. 11/11/2014 पासून पुढे एक वर्षासाठी दि. 10/11/2015 अखेर मासिक परवाना फी मध्ये 10% वाढ करुन म्हणजे रु. 64,850/- + रु. 6485/- (10%) = 71,335/- (अक्षरी रु. एक्काहत्तर हजार तीनशे पस्तीस मात्र) आकारण्यात येवून व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील जागेस लिव्ह अँण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.२४** **ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांना पी.आय.एल. नं.२५/ २०१२ श्री.संजय काळे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतरची वकील फी अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगबाद यांचे कोर्टात पी.आय.एल.नं.25/2012 संजय भास्कर काळे विरुध्द् महाराष्ट्र शासन व इतर दाखल झालेले होते. प्रस्तुत पी.आय.एल.मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 चे अधिसुचने नुसार कार्यरत आहे. प्रस्तुत अधिसुचने नुसार नेमण्यात आलेले व्यवस्थापन मंडळ पुर्ण राजकीय आहे. 1)संस्थानचे लाडु काऊंटर मंदीर परिसराचे बाहेर काढुन एम्प्लॉईज सोसायटीला पेढे विक्री करणेकामी जागा करुन दिली .2) बेकायदेशिर रित्या संस्थान बाहेरील कांही व्यक्तीस संस्थानचे जागेत राहण्यासाठी निवासस्थान दिले.3) संस्थानचे उपाध्यक्ष यांचे सांगणेवरुन "येसगांव" येथे अनाधिकृत पणे पालखी थांब्याचे बांधकाम केले. 4) संस्थानने जिल्हा परिषद शाळेसाठी बेकायदेशीर पणे बेंचेसचे वाटप केले. 5) विश्वस्तांनी त्यांचे मतदारांना हॉस्पिटल सुविधेच्या बीलामध्ये बेकायदेशीर सवलती दिलेल्या आहेत. 6) संस्थानने 6 आर, 12 मी.जागेची बेकायदेशीरपणे आदलाबदल केलेली आहे. 7) विश्वस्तांनी त्यांचे पाहुण्यांसाठी संस्थानच्या निवास्थानांचा गैरवापर केलेला आहे. 8) संस्थानचे कोपरगांव नगर परिषदेसाठी, 1 कोटी 12 लाख रुपयाची रक्कम पालखी रस्ता तयार करणेकामी बेकायदेशीर दिलेली आहे 9) सन 2007-2008 चा वार्षिक अहवालावरुन संस्थानचे अधिनियमामध्ये अनेक त्रुटी असल्याचे दिसुन येते. 10) संस्थानने विमान विकास कंपनिला विमानतळ बांधकाम करणेकामी दि.05/07/2011 व दि.25/07/2011 रोजी रु.35 कोटी रुपये घटाना बाहय व अनाधिकृत पणे दिलेले आहे. 11) श्री राधाकृष्ण विखे पा. त्यावेळी विधी व न्याय विभागाचे मंत्री होते. त्यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग केला. 12) संस्थान संबंधी साईटेक प्रोजेक्ट कॉगिजंट कंपनी चेन्नई यांना दिलेला आहे. त्याबाबतचे ॲग्रीमेंट पोस्ट फॅक्टो केले आहे. जाने 2010 पासुन जुन 2011 पावेतो काम पुर्ण होणे आवश्यक होते, परंतु 6 जुन 2011 मध्ये पहीले पेमेंट Release झाले आहे. व संस्थानला अर्थिक नुकसान केलेले आहे. 14) आरक्षण क्र.9 मध्ये बेकायदा बांधकाम व सुरक्षा बाबत नगरपालीकेने मन कंन्स्ट्रक्शन मुंबई यांना तक्रार दिलेली असून, संस्थानचे विश्वस्तांचे विरुध्द् मे. कोर्टात क्रिमीनल केसेस दाखल झालेल्या आहेत. अशा आशयाचे अधिक मुद्दे / आरोप अर्जदाराने प्रस्तुत पी.आय.एल मध्ये संस्थानचे विश्वस्तांचे विरुध्द् केलेले आहेत. संस्थानचे व्यवस्थापन कमिटीने उपरोक्त प्रमाणे केलेल्या बेकायदा कृत्यांची चौकशी करणे बाबत व झालेल्या नुकसानिचे भरपाई करणेबाबत तसेच व्यवस्थापा कमीटीचे विरुध्द् केसेस दाखल करणेबाबत मा.कोर्टाने त्यांना आदेश करावेत अशी विनंती पी.आय.एल.नं. 25/2012 मध्ये अर्जदारातर्फे करणेत आलेली होती.

प्रस्तुतचे केस मध्ये जा.क्र. एसएसएस/वशी विधी/54/2012 दि.03/04/2012 रोजी ॲड. आर.एन. धोर्डे साहेब यांना पत्र देऊन प्रस्तुतचे पी.आय.एल.नं. 25/2012 मध्ये संस्थानचे वतीने कामकाज पहाणेस विनंती केली होती. सदर पत्रास अनुसरुन प्रस्तुत पी.आय.एल.नं. 25/2012 मध्ये ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांचे मार्फत संस्थानचे वतीने ॲफीडेव्हीट ही दाखल करण्यात आले व त्यांनी कामकाजही पाहीलेले आहे. प्रस्तुतची जाहित याचीका मा. उच्च यायालयाने दि. 10/12/2014 रोजी खालील प्रमाणे आदेश करुन निकाली काढली आहे.

1] Heard Shri Sanjay Bhaskar Kale party in person - petitioner; Mrs. M.A. Deshpande, AGP for Respondent No.1; Shri R.N. Dhorde, Senior Advocate i/b

Shri V.R. Dhorde. Advocate for Respondent No.2; Shri Rahul Tambe, Advocate for Respondent No.9; Shri V.D. Hon, Senior Counsel for 2 Respondent Nos.3, 4, 6 to 8, 10, 12, 14, 16 & 19 and Shri A.R. Kale h/f Shri A.R. Joshi, Advocate for Respondent No.17.

2] Perused communication dated 9.12.2014 received by Shri R.N. Dhorde from Principal District Judge, Ahmednagar. It is taken on record and marked as Exhibit- X.

3] We find that the work of conducting inquiry can be handed over to any retired judicial officer in the cadre of District Judge. Shri Sanjay Kale, party in person, submits that he has no objection if such inquiry is conducted in time bound manner by any such judicial officer who may be preferably from Aurangabad.

4] In this situation, we hereby appoint Shri P.S.Paranjape, retired Principal District Judge, to conduct inquiry in the matter. Schedule thereof be drawn by inquiry officer in consultation with the officers of Saibaba Sansthan, Shirdi, Dist.Ahmednagar, as the said judicial officer will be required to visit the office of respondent no.2 for conducting the inquiry. Needless to mention that during inquiry, petitioner and all other concerned persons may be given opportunity by such judicial officer if their assistance or evidence is found necessary.

5] The expenditure and charges of such inquiry shall be borne by respondent no.2.

6] Registry to supply copies of papers of present PIL to Shri P.S. Paranjape within a period of one week. The concerned judicial officer is expected to complete inquiry as far as possible within further period of six months.

7] With these directions, we dispose of present Public Interest Litigation. No order as to costs.

प्रस्तुतची जनहित याचीका निकाली निघाल्याने ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांचे दि. 13/12/2014 रोजीचे पत्राने प्रोफेशाल, ड्राफ्टींग, स्टेनो, क्लरीकल, कॉन्फरन्स, झेरॉक्स, टेलीफोन, फॅक्स, ट्रॅव्हलींग व ई मेल इ. फी रक्कम रु. 2,00,000/- वकील फी पोटी मागीतले आहे. सदरची केस सन 2012 पासून चालू असल्याने व ॲड.श्री आर.एन.धोर्डे हे सिनिअर कौन्सील असल्याने रक्कम रु. 2,00,000/- वकील फी मागणी केलेली आहे. तरी रक्कम रु. 2,00,000/- वकील फी पोटी ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांना अदा करणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५२ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून मा.उच्च न्यायालयातील सरकारी वकिलांना देण्यात येणारी वकील फी विचारात घेऊन, ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांना पी.आय.एल. नं.२५/ २०१२ श्री.संजय काळे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर याबाबतची वकील फी व इतर खर्चाची रक्कम अदा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

विषय नं.२५ **आरक्षण क्र.३९ श्री साईबाबा संस्थानचे विविध उपक्रमासाठी भू-संपादन यामधील जमीन मालकांना अदा करावयाचे मोबदला रक्कम व आस्थापना खर्चाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**अधिनियमाचे कलम १७** (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्ठे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन न.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

(6) **We direct that, without prior permission of this Court, the Committee,-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्तावना-**

शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३९ नुसार मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ पै.१२५ पै. व १२६ पै. क्षेत्र ५.८१ हेक्टर विविध उपक्रमांसाठी संस्थानकरीता आरक्षीत आहे.

स.नं.१२४/१ मधील श्री. झुंबरलाल चुन्नीलाल लोढा यांचे १.९ हेक्टर क्षेत्र संस्थानने विकत घेतलेले आहे. विकत घेतलेल्या १.९ हे. क्षेत्रापैकी ७६ आर क्षेत्र आरक्षण क्र.३९ मध्ये येत असल्याने ते वजा जाता उर्वरीत क्षेत्र ५.०५ हेक्टर करीता संस्थानमार्फत पहिला भूसंपादन प्रस्ताव दि.१५/६/१९९८ रोजी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे पाठविणेत आलेला होता.

त्यानंतर मोजणीमध्ये झालेले बदल, नांदुर्खी रस्ता रुंदीकरण, डी.पी.रोड इत्यादी मुळे भूसंपादनाचे क्षेत्रात बदल झाल्याने मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे सुचनेनुसार वेळोवेळी पुढीलप्रमाणे भूसंपादनाचे सुधारीत प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहे.

| अ.नं | प्रस्ताव पत्र क्रमांक व दिनांक | भूसंपादनाचे क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|
| ०१ | एसएसएस/वशी-२/६००६/१९९८ दि.१५/६/१९९८ | ५.०५ |
| ०२ | एसएसएस/वशी-२/१६१११/२००० दि.४/११/२००० | ४.९३.५० |
| ०३ | क्र.कावि/भूसं२/११८/२००२ दि. २/३/२००२ | ४.७२.१२ |
| ०४ | क्र.कावि/भूसं२/२६/२००३ दि. १७/१/२००३ | ४.७५.८७ |
| ०५ | एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/८८२/२०११ दि. १२/५/२०११ | ४.५५.०४ |
| ०६ | एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/४७६४/२०११ दि. २१/१२/२०११ | ४.५४.१८ |

मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन/ कार्या/ १६क/ १०८५/२०१३ दिनांक २९ आक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशान्वये नवनिर्मीत शिर्डी उपविभागीय कार्यालय यांचेकडे त्यांचे अधिनस्त असलेल्या तालुक्यातील भूसंपादन प्रस्ताव हस्तांतरीत करणेत आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही आता मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेमार्फत सुरु आहे.

शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र. ३९ संस्थानकरीता 'विविध उपक्रमासाठी' आरक्षीत आहे याकामी संस्थानने वेळोवेळी सादर केलेल्या सुधारीत भूसंपादन प्रस्तावानुसार आरक्षण क्र. ३९ मधील क्षेत्र ४ हे. ५४ आर १८ चौ.मीटर भूसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेमार्फत सुरु आहे.

**आरक्षणाची सद्यस्थिती–** मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडून आरक्षण क्र.३९ चा सुधारित प्रारुप निवाडा मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे दि.१/१२/२०१४ रोजी मान्यतेसाठी सादर करणेत आलेला आहे.

**जमा रक्कमेबाबत-** मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.कावि/ एल.ए.क्यु.एस.आर./ १६/२००० दि.१७/१२/२००३ अन्वये कळविले आहे की, आरक्षण ३९ मध्ये संभाव्य मुल्य निर्धारणाची रक्कम रु.६,३९,९५,०९०/- होत असुन त्यावर ३ % आस्थापना खर्च रक्कम रु.१९,१९,८५३/- होत आहे. सदर रकमेची त्यांनी अनामत म्हणून मागणी केलेली आहे. त्यानुसार संस्थानमार्फत आरक्षण क्रमांक ३९ चे आस्थापना खर्चाचे रकमेपोटी रुपये १९,१९,८५३/- (अक्षरी रुपये एकोणवीस लाख एकोणवीस हजार आठशे त्रेपन्न मात्र) मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे दि.३०/०३/२००४ रोजी जमा करण्यात आलेले आहेत.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्रमांक कावि/भू.सं./११/२००५ दिनांक ३१/१/२००५ अन्वये आरक्षण क्र. ३९ मध्ये आस्थापना खर्चाची रक्कम रुपये १,७७,०२१/- अधिक संपादीत होणा-या जमीनीची नुकसान भरपाईची रक्कम रुपये ६,९८,९५,७९४/- अशी एकूण रक्कम रुपये ७,००,७२,८१५/- (सात कोटी बहात्तर हजार आठशे पंधरा मात्र) तात्काळ वर्ग करणेबाबत कळविले होते.

सदरची रक्कम मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे जमा करणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३/०३/२००५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र. १२७ पुढील प्रमाणे झालेला आहे. *सदर रक्कम शासनाचे अंतिम मंजूरीचे वेळी कमी जास्त होऊ शकते अशा कारणास्तव संस्थानच्या कोणत्याही हक्कास बाधा न येता मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे ८० % रक्कम वर्ग करणेस मान्यता देण्यात आली.'*

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार रुपये ५,६०,५८,२५२/- (अक्षरी रुपये पाच कोटी साठ लाख अठ्ठावन्न हजार दोनशे बावन्न मात्र) डी.डी.व्दारे मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे दिनांक ७ मे, २००५ रोजी जमा करणेत आलेले आहे.

आरक्षण क्र.३९ मध्ये आस्थापना खर्चापोटी रु.१९,१९,८५३/- व भूसंपादनाचे रकमेपोटी रु.५,६०,५८,२५२/- अशी एकूण रु.५,७९,७८,१०५/- (अक्षरी रुपये पाच कोटी एकोणऐंशी लाख अठ्ठयात्तर हजार एकशे पाच मात्र) शासनाकडे जमा करणेत आलेली आहे. तसेच सदरची रक्कम लेखाशाखेकडून तपासून घेण्यात आलेली असून ती बरोबर आहे.

**आरक्षण क्र.३४** - तथापी या दरम्यान आरक्षण क्र.३४ ची ही भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असून आरक्षण क्र ३४ साठीही अनामत रक्कम भरावयाची असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०/१/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६ अन्वये "आरक्षण क्रमांक ३४ चे भूसंपादनापोटी भरणा करणेस सांगितलेली रक्कम, यापुर्वी आरक्षण क्रमांक ३९ करीता अनामत (बिनव्याजी) ठेव म्हणून भरणा करणेत आलेल्या रक्कम रुपये ५,६०,५८,२५२/- मात्र मधून समायोजित करणेबाबत तसेच आरक्षण क्रमांक ३९ चे अंतिम निवाड्याचे वेळेस होणारी मोबदल्याची रक्कम त्वरीत भरणा करणेत येईल." या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार इकडील विभागाचे दि.१४/४/२०१० रोजीचे पत्रान्वये मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना 'आरक्षण क्र.३९ चे भूसंपादनापोटी अनामत (बिनव्याजी) ठेव म्हणून रक्कम रुपये ५,६०,५८,२५२/- मात्र आपणाकडे जमा आहेत. सदर रक्कमेतून, तूर्त आरक्षण ३४ चे अंतिम निवाड्याप्रमाणे भूसंपादनापोटी जमीनमालकांना द्यावयाची रक्कम समायोजित करण्यात यावी. तसेच आरक्षण क्रमांक ३९ चे अंतिम निवाड्याचे वेळेस उर्वरित व कमी पडणारी मोबदला रक्कम आपले मार्फत त्यावेळी सादर होणा-या मागणी पत्रानुसार त्वरीत भरणा करणेत येईल' असे कळविणेत आलेले आहे

मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१८/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, आरक्षण क्र.३९ चे भूसंपादनापोटी अनामत (बिनव्याजी) ठेव म्हणून रक्कम रुपये ५,६०,५८,२५२/- मात्र जमा असलेल्या रक्कमेतून, तूर्त आरक्षण क्रमांक ३४ चे अंतिम निवाडयाप्रमाणे भूसंपादनापोटी जमीन मालकांना देण्यात येईल तसेच सद्यस्थितीत आरक्षण क्रमांक ३४ व आरक्षण क्रमांक ३९ या दोन्ही प्रकरणांचे सुधारित प्रारुप निवाडे मा. जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडेस अनुक्रमें दिनांक ३०/८/२०१४ व दि.१/१२/२०१४ रोजी मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहेत.

**प्रस्ताव-** मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी आता दिनांक ३१/१०/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, आरक्षण क्रमांक ३९ मधील भूसंपादन प्रकरणात भूसंपादन कायदा सन २०१३ मधील कलम २६ ते ३० मधील सुत्रानुसार व महाराष्ट्र शासनाचे ऑगस्ट २०१४ मधील नियमावलीप्रमाणे मोबदला रक्कम जमीन मालकांना अदा करावी लागणार आहे. मोबदला रक्कम व ३ % आस्थापना खर्चाची रक्कम यानुसार हिशोबीत होणारी खालील प्रमाणे संभाव्य रक्कम सत्वर इकडील कार्यालयास जमा करावी.

| | |
|---|---|
| मुल्यांकन दिनांक | २४/७/२००२ |
| संपादीत करावयाचे स.नं. | १२४ पै., १२६ पै. |
| संपादित करावयाचे एकूण क्षेत्र | ४५४१८ चौ.मीटर |
| मुल्यांकन दिनांकास शिघ्रसिध्द गणक दरानुसार मुल्यांकन | रुपये ९०० प्रति चौ.मी. |
| गुणक दर | १.१० |
| जमीनीचे मुल्य | ४५४१८ x ९०० x १.१० रु. ४,४९,६३,८२०/- |
| दिलासा रक्कम १०० % | रु. ४,४९,६३,८२०/- |
| दि.२४/७/२००२ ते २३/१२/२०१४, १२ वर्षे व ५ महिने (१४९ %) | रु. ६,६९,९६,०९२/- |
| एकूण | रु.१५,६९,२३,७३२/- |
| एकुण रक्कमेवर ३ % आस्थापना खर्च | रु.४७,०७,७१२/- |
| एकूण रक्कम | रु.१६,१६,३१,४४४/- |
| यापुर्वी जमा केलेली रक्कम रुपये | (डी.डी.नं.७३०७६०दि.३१/३/२००४) रु.१९,१९,८५३/- |
| **जमा करावयाची शिल्लक रक्कम** | **रुपये १५,९७,११,५९१/-** |

**इकडील विभागाचे मत-** शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३९ मधील क्षेत्र ४.५४.१८ चौ.मीटर संस्थानकरीता 'विविध उपक्रमासाठी' भूसंपादीत करणेकामी रक्कम रुपये १५,९७,११,५९१/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी सत्त्यान्नव लाख अकरा हजार पाचशे एक्यान्नव मात्र.) बिनव्याजी ठेव (अनामत) म्हणून शासनाकडे (भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी) जमा करणेस तसेच भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने करावे लागणारे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणे आवश्यक आहे.

मा.त्रिसदस्य समितीची मान्यता मिळालेनंतर सदरहु खर्च Major Financial असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करावे लागेल.

मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.५३ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र.३९ श्री साईबाबा संस्थानचे विविध उपक्रमासाठी भू-संपादन यामधील जमीन मालकांना अदा करावयाचे मोबदला रक्कम व आस्थापना खर्च मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे जमा करणेसाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२६ **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास दिलेल्या जागेत बांधण्यात आलेल्या सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-

**अधिनियमाचे कलम १७** (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**(6) We direct that, without prior permission of this Court, the Committee-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्तावना-** मौजे निमगाव को-हाळे येथील गट नंबर ८७ क्षेत्र १ हेक्टर ४८ आर व गट नंबर ८८ क्षेत्र १ हेक्टर ४२ आर जमीन शेती महामंडळाची होती. सदर जमीन संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेली आहे. त्यापैकी गट नंबर ८७ मधील क्षेत्र ३६ आर व गट नंबर ८८ मधील क्षेत्र २४ आर असे एकूण ६० आर जमीन (जागा) मा.जनरल ऑफिसर, कमांडींग, महाराष्ट्र व गोवा क्षेत्र (सैनिक खाते) यांना सैनिकांसाठी व भुतपूर्व सैनिकांसाठी अतिथीगृह बांधणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३१ मार्च, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २६४ अन्वये ३० वर्ष मुदतीचे कराराने दरमहा रु.५०१/- मात्र भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे. सैनिकी खाते यांनी माहे फेब्रुवारी,२०१५ पर्यंत भाडेपट्टयाची रक्कम भरलेली आहे.

सदर जमीन भाडेपट्टयाने देणेबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील निर्णय क्रमांक सासंवि-(८९)६५०/२००५ कासोळा., दिनांक २१ जुलै,२००७ अन्वये मान्यता मिळालेली आहे .

सदर जागेवर सैनिकी खात्यामार्फत रितसर परवानगी घेऊन अतिथीगृहाचे बांधकाम करण्यात आलेले आहे .

**प्रस्ताव-** श्री. अजय डोभळ, ऑफिसर इन चार्ज, सैनिक आरामगृह, शिर्डी यांनी दि. २/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये सैनिकी आरामगृहातील खोल्यांची संख्या अपुरी पडत असल्याने त्यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**इकडील विभागाचे मत-** भाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार मा.जनरल ऑफिसर, कमांडींग, महाराष्ट्र व गोवा क्षेत्र यांना सैनिकांसाठी आरामगृह बांधकामासाठीच सदरची जागा दि.१०/३/२००८ पासून पुढील ३० वर्षासाठी देण्यात आलेली आहे.

मौजे निमगाव को-हाळे या ग्रामीण भागात बांधकामास परवानगी देणेकामी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी हे सक्षम अधिकारी आहेत. त्यास अनुसरुन भाडेपट्टा करारनाम्यातील अटी शर्तीनुसार, सैनिकी खात्यास नियमाप्रमाणे दि.१०/३/२००८ पासून पुढील ३० वर्षासाठी सैनिक आरामगृह एकमजला बांधकामास परवानगी देणेस हरकत नाही. असे मत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

निर्णय क्र.५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे समितीला दिलेल्या आदेशानुसार मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास दिलेल्या जागेत बांधण्यात आलेल्या सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी देणेचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२७ **मौजे रुई, ता.राहाता येथील सिटी सर्व्हे नं.१९८ क्षेत्र २४१.५० चौ.मिटर जागा बक्षिस पत्राने स्विकारणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**अधिनियमाचे कलम १७** (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

(6) **We direct that, without prior permission of this Court, the Committee,-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्ताव-** श्री. संभाजी पतिंगराव कडू पा.यांनी मौजे रुई, ता.राहाता येथील त्यांचे स्वमालकीची सिटी सर्व्हे नंबर १९८ क्षेत्र २४१.५० चौ.मी. जागा बक्षिस पत्राने स्विकारणेबाबत दि.१/१०/२०१३ रोजीचे प्रतिज्ञापत्राने विनती केलेली आहे.

प्रस्तुत जागेचे स्थळ निरीक्षण बांधकाम विभागामार्फत दि.४/२/२०१४ रोजी बांधकाम विभागाचे प्रतिनिधींनी केलेले आहे. प्रस्तुत जागेचा माहिती अहवाल थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

सदर जागेचे प्रत्यक्षात मोजमाप घेतले असता एकूण क्षेत्र २४६.८९ चौ.मीटर आहे. प्रत्यक्ष पाहणीनुसार या जागेवर पडलेल्या स्थितीतील वाडा असून वाडयाचे पुर्व बाजुकडील भिंत पडलेल्या स्थितीत आहे. दरवाजासह उत्तर दक्षिण १२.७० मीटर लांबीची भिंत असुन उंची २.५० मी. व रुंदी ०२ फुट आहे. दक्षिण बाजुला पुर्व पश्चिम १८.२५ मी. लांबीची ०२ फुट रुंदीची व २.५ मीटर उंचीची भिंत पडलेल्या स्थितीत आहे. उत्तर बाजुकडील भिंत पुर्व पश्चिम १८.२५ मीटर लांबीची आहे व ०१ मीटर उंचीची आहे. पश्चिम बाजुकडील भिंत उत्तर दक्षिण १२.७० लांबीची व १ मीटर उंचीची आहे. वाडयाचे पुर्व बाजूस ५.५० मीटर लांबीचा व २.७५ मीटर रुंदीचा ओटा आहे. त्यांनतर पुर्व बाजूस जी मोकळी जागा आहे.तिची लांबी १२.७० मीटर व रुंदी ८ मीटर आहे सदर मोकळया जागेच्या पुर्वेस दुस-याचे मालकीचे घर आहे. मोकळया जागेचा वापर गावातील लोक येण्या जाण्यासाठी करीत आहेत.

सोबत अवलोकनार्थ इतर कागदपत्रे-

१ श्री. संभाजी पतिंगराव कडू पाटील यांनी केलेले बक्षिसपत्र (प्रतिज्ञापत्र)

२ सिटी सर्व्हे नं.१९८ चा उतारा.

३. १३३ अन्वये दिलेली सनद.

४. जागेचा नकाशा.

५ ग्रामपंचायत रुई यांची करास पात्र असलेल्या इमारती व जमीनी यांची सन २०१२-१३ आकारणी यादी. (असेसमेंट लिस्ट)

**इकडील विभागाचे मत-** देणगीसाठी प्रस्तावित केलेले जमीनीचे क्षेत्र अत्यल्प असुन मौजे रुई गावामध्ये आहे. देणगी म्हणून स्विकारल्यास कोणताही विकास प्रकल्प उभारणेस सदरची जागा योग्य ठरणार नाही.

तरी याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला मौजे रुई, ता.राहाता येथील सिटी सर्व्हे नं.१९८ मधील क्षेत्र २४१.५० चौ.मिटर जागा बक्षिस पत्राने देत असलेले जमीनीचे क्षेत्र अत्यल्प असुन मौजे रुई गावामध्ये आहे. देणगी म्हणून स्विकारल्यास कोणताही विकास प्रकल्प उभारणेस सदरची जागा योग्य ठरणार नाही. त्यामुळे उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२८ **साईनगरकडील साईध्यान ०१ आणि ०२ या स्टाफ क्वाटरचे रिवायरींग करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामधील अधिकारी तसेच कर्मचारी यांचे निवासव्यवस्थे करीता सन १९८७ साली म्हणजेच २७ वर्षापूर्वी साईनगरकडे साईध्यान ०१ आणि ०२ ह्या तळमजल्यासहीत चार मजली इमारत बांधण्यात आलेल्या आहे. ह्या इमारती बांधण्यात आल्या त्यावेळेस सदरील इमारतींमध्ये त्या वेळेच्या पध्दतीनुसार जुन्या पद्धतीची वायरींग करण्यात आलेली आहे. सदरची वायरींग ही २७ वर्षात बरीच जुनी झाल्याने ती वेळोवेळी दुरुस्त करण्यात आलेली आहे. तसेच या वायरींगचे इन्सुलेशन कव्हर खराब होण्यास सुरुवात झालेली असून इन्सुलेशन क्षमता कमी झाल्याने शॉर्टसर्कीट होण्याचा धोका संभवतो. सदरची वायरींगची वेळोवेळी दुरुस्ती केल्यामुळे वायरींगमध्ये ब-याच ठिकाणी जॉईटस आलेले आहेत. यामुळे वायरींगमध्ये शॉर्टसर्कीट होऊन आग लागण्याचा धोका संभवतो. शिवाय जॉईटसमध्ये लिकेज होऊन भिंतीमध्ये करंट उतरु शकतो व प्राणहानी होण्याचा धोका संभवतो.

या कारणास्तव साईनगरकडील साईध्यान ०१ आणि ०२ ह्या इमारतींमधील संपूर्ण रुमचे विद्युतीकरणाचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्युतीकरण कामामध्ये जुनी वायरींग पूर्ण काढून नविन केसिंग केपींग वायरींग तसेच नवीन मॉडयुलर पध्दतीचे स्वीचेस व कनसिल्ड स्वीचबोर्ड बसवुन रिवायरींग करावी लागणार आहे.

त्यानुसार उपरोक्त विद्युत विभागामार्फत करावयाच्या कामाचा खर्च शासनमान्य सी.एस आर. सन २०१३-२०१४ प्रमाणे तयार केलेला असून सदरील काम हे विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागवून करुन घ्यावे लागणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. no. | C.S.R. NO. | DESCRIPTION | QTY | RATE | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Non C.S.R. | Point wiring for Light/ Fan in PVC Casing caping/ pvc pipe with 3 x 1.5 Sq.mm. FR Grade copper wire 3 Plate Celing rose in provided Modular Accessories and concealed/ surface switch board. | 1200. Nos. | 350.00 | 4,20,000.00 |
| 02) | Non C.S.R. | Supplying and erecting Bus bar chamber triple pole with neutral with four Copper bars, 500V 300A complete as per specification no. CP-BB | 02 Mtr. | 10000.00 | 0,20,000.00 |
| 03) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25 mm dia. with PVC accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no. 1.1.1 | 2000 mtr | 79.80 | 1,59,600 00 |
| 04) | 1-2-12 | Supplying and erecting PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32 mm. with accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no. 1.1.2 | 6000 mtr | 45.15 | 2,70,900.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 05) | 1-3-4 | Supplying & erecting mains with 3 x 1.5 sq.mm F.R.L.S stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/ trunking/ inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 1000 mtr | 58.275 | 0,58,275.00 |
| 06) | 1-3-6 | Supplying & erecting mains with 1 x 2.5 sq.mm F.R.L.S stranded/solid copper PVC Insulated wire laid in provided conduit/ trunking/ inside pole/Bus bars or any other places. as per specification No. WG-MA/BW | 3000 mtr | 28.35 | 0,85,050.00 |
| 07) | 1-3-8 | Supplying & erecting mains with 2 x 4.0 sq.mm F.R L.S stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/ trunking/ inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 3000 mtr | 80.85 | 2,42,550.00 |
| 08) | 1-3-8 | Supplying & erecting mains with 1 x 4.0 sq.mm F.R L.S stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/ trunking/ inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 1000 mtr | 40.425 | 0,40,425.00 |
| 09) | 1-3-10 | Supplying & erecting mains with 2 x 6.0 sq.mm F.R.L.S stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 1000 mtr | 115.50 | 1,15,500.00 |
| 10) | 1-3-14 | Supplying & erecting mains with 3 x 2.5 sq.mm F R L.S stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/ trunking/ inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 7000 mtr | 81.90 | 5,73,300.00 |
| 11) | 1-7-7 | Supplying and erecting ISI mark Ceiling rose erected on Filled polypropylene ISI marked (IS:14772-2000) board or polished double wooden block/ ISI mark PVC junction box. | 100 Nos. | 32.55 | 0,03,255.00 |
| 12) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A / 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 1600 Nos | 90.30 | 1,44,480.00 |
| 13) | 1-8-3 | Supplying and erecting modular type bell-push 6A / 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 88 Nos. | 114.45 | 0,10,071.60 |
| 14) | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch 16 / 20 A with indicator, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 264 Nos. | 150.15 | 0,39,639.60 |
| 15) | 1-8-10 | Supplying and erecting modular type 3 pin 6A multi socket safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 440 Nos. | 105.00 | 0,46,200.00 |
| 16) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6/ 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete | 264 Nos. | 164.85 | 0,43,520.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 17) | 1-8-15 | Supplying and erecting modular type telephone socket one gang with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 88 Nos. | 85.05 | 0,07,484.40 |
| 18) | 1-8-23 | Supplying and erecting modular type electronic step regulator for fan two module ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 264 Nos. | 417.90 | 1,10,325.60 |
| 19) | 1-8-25 | Supplying and erecting modular type blanking plate one module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 400 Nos. | 24.15 | 0,09,660.00 |
| 20) | 1-8-27 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 1 module complete duly erected in an approved manner. | 276 Nos. | 131.25 | 0,36,225.00 |
| 21) | 1-8-29 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 3 module complete duly erected in an approved manner. | 176 Nos. | 154.35 | 0,27,165.60 |
| 22) | 1-8-30 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 4 module complete duly erected in an approved manner. | 88 Nos. | 180.60 | 0,15,892.80 |
| 23) | 1-8-31 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 6 module complete duly erected in an approved manner. | 88 Nos. | 245.70 | 0,21,621.60 |
| 24) | 1-8-32 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 8 module complete duly erected in an approved manner. | 264 Nos. | 308.70 | 0,81,496.80 |
| 25) | 1-8-33 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 12 module complete duly erected in an approved manner. | 100 Nos. | 395.85 | 0,39,585.00 |
| 26) | 1-10-2 | Supplying & erecting telephone cable 2 pair with 0.5 mm dia. laid in provided PVC casing/ conduit asper specification No. WG-TW | 3600 Mtr. | 19.95 | 0,71,820.00 |
| 27) | 1-10-15 | Supplying & erecting Jelly filled armoured telephone cable 20 pair with 0.5 mm dia. laid in provided trench as per specification No. WGTW | 500 Mtr. | 170.10 | 0,85,050.00 |
| 28) | 1-11-13 | Supplying, erecting & commissioning Junction box suitable for 20pairs as per specification No. WG-TW | 10 Nos. | 728.70 | 0,07,287.00 |
| 29) | 2-1-10 | Supplying and erecting T8 Fluroscent tube day light 1200mm 36 Watts. | 400 Nos. | 59.85 | 0,23,940.00 |
| 30) | 2-1-20 | Supplying and erecting CFL 5W with ceramic adopter p.f. more than 0.9 | 264 Nos | 148.05 | 0,39,085.20 |
| 31) | 2-1-23 | Supplying and erecting CFL 18 to 20 W with ceramic adopter p f more than 0.9 | 88 Nos. | 215.25 | 0 18,942.00 |
| 32) | 2-1-42 | Supplying and erecting HPSV lamp 3 pin BC/Screwed cap head /pin type 230V, 250 W SON-T-type. | 10 Nos | 717.15 | 0,07,171.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 33) | 2-2-13 | Supplying and erecting Ding Dong/ electronic musical type call bell with heavy duty coil suitable to operate on 230V A.C. supply erected on polished double wooden block/sunmica block of suitable size. | 88 Nos. | 100.80 | 0,08,870 40 |
| 34) | 2-8-15 | Supplying and erecting street light fitting suitable for 250W H.P.S.V. lamp complete with accessories on provided bracket as per specification no. FG-ODF/GSL | 10 Nos | 3657.15 | 0,36,571.50 |
| 35) | 2-9-6 | Supplying and erecting approved type LED street light fitting 90W, having PF > 0.95, class IP 65 or above. Housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium as per specification no FG-ODF/FLS2 | 10 Nos | 25069.80 | 2,50,698.00 |
| 36) | 2-13-3 | Supplying and erecting regular/ standard model Ceiling fan of 1200 mm sweep complete erected in position as per specifcation no. FG | 264 Nos. | 1883.70 | 4,97,296.80 |
| 37) | 2-4-3 | Supplying & erecting approved make 1 x 36/40W white stove enamelled/ powder coated box type fluo fitting with 40 W VPITcopper ballast, fixed at ceiling or on wall as per specification No.FGIDF/ BFF | 400 Nos. | 649.95 | 2,59,980.00 |
| 38) | 5-1-7 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad switch & fuse 415/ 500V 63A on iron frame/board as per specification No. SW-SWR/MTP (Stainley Make) | 10 Nos. | 2911.65 | 0,29,116.50 |
| 39) | 5-1-19 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad HRC fuse switch 415/ 500V 300A with neutral link with ISI marked HRC fuses, on angle iron frame as per specification No. SWSWR/ TPHRC | 02 Nos. | 12209.40 | 0,24,418.80 |
| 40) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, C-series (for motor/power) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 800 Nos. | 181.65 | 1,45,320.00 |
| 41) | 5-4-13 | Supplying, erecting & marking enclosure Single pole & neutral distribution board (SPNDB) one way for SPMCB 1 No on iron frame/wooden board as per specification No. SWSWR/ MCBDB | 88 Nos. | 256 00 | 0,22,528.00 |
| 42) | 5-4-18 | Supplying and erecting single pole and neutral distribution board (SPNDB) with door surface/flush mounted with 2 ways for incoming and 8 ways for outgoing SP MCB's on iron frame/wooden board as per specification No SWSWR/ MCBDB | 88 Nos. | 1351.35 | 1,18,918.80 |
| 43) | 5-4-23 | Supplying & erecting CRCA sheet metal one way enclosures suitable for D.P.M.C.B./ T.P. M.C.B./ F.P.M.C.B complete erected on angle iron frame. | 02. No | 433.65 | 0,00,867.30 |
| 44) | 5-6-1 | Providing, erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 16/25 A. 2 pole complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 88 Nos. | 2221.80 | 1,95,518.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 45) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 sensitivity and having capacity of 63A 4 pole complete as per specification No.SW-RCCB/RCCB | 02. Nos. | 3222.45 | 0,06,444.90 |
| 46) | 6-3-2 | Supplying & erecting Static energy meter 230V, 50 cycles AC supply 5/10/20/40 A Class I accuracy I.S.I. marked with metal/polycarbonate enclosure. Meter with LCD/ LED display complete erected on polished T.W. board duly wired with required size of weather proof PVC wires duly tested for classII accuracy by electric supply company. | 88 Nos. | 2050.65 | 1,80,457.20 |
| 47) | 9-1-5 | Supply Installation, Testing and commissioning of UL Certified/ CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of Electrode of 17.2 mm diameter Low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity as per specification no EA-MOBI | 10 Nos. | 15764 70 | 1,57,647.00 |
| 48) | 9-2-2 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. as per specification No (EA-EP). | 500 Kgs | 908.25 | 4,54,125.00 |
| 49) | 9-3-3 | Supplying & erecting conventional spike type air termination suitable to carry lightning stroke made up of heavy gauge 40 mm dia copper pipe of standard length with 5 Nos. copper spikes fixed on copper ball as air terminals duly threaded in copper pipe erected on provided foundation in an approved manner | 02 Nos. | 4588.50 | 0,09,177.00 |
| | | | | Total Rs. :- | 52,73,474.70 |
| | | | | Round Up Rs. :- | 52,73,475.00 |

उपरोक्तप्रमाणे साईनगरकडील साईध्यान ०१आणि ०२ ह्या इमारतींमधील संपूर्ण रुमचे विद्युतीकरणाचे काम करणेकरीता रक्कम रुपये ५२,७३,४७५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५६ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगरकडील साईध्यान ०१आणि ०२ ह्या इमारतींमधील संपूर्ण रुमचे विद्युतीकरणाचे काम बाहेरील ठेकेदारांकडून करुन घेणेकरीता वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या रु.५२,७३,४७५/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

विषय नं.२९ आय.एस.ओ. चे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग करणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

दि.२९-११-२०१४ रोजीचे ISO 9000:2008 मानांकन संदर्भात मा.ऑडिटर यांनी काही सुचना केल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे. साईआश्रम भक्तनिवास विभागातील ए.सी.रुम मधील ए.सी.यंत्रणेचे बटन रुममध्ये असून प्रत्येक रुमला कि-टॅगची सुविधा आहे.

तथापी काही भक्त कि-टॅगचे बटणाला काडी वगैरेचा अटकावा करुन किंवा कि-टॅग मधील चावी काढून बटनामध्ये कि-टॅग टाकून रुममधील लाईट व ए.सी.चालू ठेवतात. पर्यायाने रुम बंद असताना विनाकारण ए.सी.चालू असल्याने इलेक्ट्रीसिटी खर्च होते. तरी याकामी खोली बंद असताना बाहेरुन आतील उपकरणे बंद करण्यासाठी रुमच्या बाहेरील बाजूस कन्ट्रोल स्विच असावा याकामी योग्य ती कार्यवाही विद्युत विभागामार्फत करावी असे साईआश्रम भक्तनिवास विभागाने कळविले आहे.

साईआश्रम भक्तनिवास येथे निवासस्थानासाठी एकुण १५३६ रुम असून त्यापैकी A, B, C या बिल्डींगमधील सर्व रुम (एकुण रुम ३८४) ए.सी.केलेल्या आहेत. भविष्यात आणखी जादा रुम ए.सी.बनविण्याचा साईआश्रम भक्तनिवास यांचा प्रस्ताव आहे. त्यामुळे ए.सी.रुमची संख्या वाढणार आहे. यासाठी सध्याच्या ए.सी.रुम व वाढीव ए.सी.रुम यांची मागणी विचारात घेऊन तसेच राहिलेल्या साध्या रुम यांनाही दरवाज्यावर बाहेरुन सप्लाय बंद करण्यासाठी मास्टर स्विच बसविणे योग्य होईल. मास्टर स्विच बसविणे काम एकाच वेळेस केल्यास राहिलेल्या रुमचे बाबत वारवार तक्रार येणार नाही.

रुममधील साईभक्त रुममधील कि-टॅगला अटकावा करुन रुममधील ए.सी.व लाईट चालू ठेऊन बाहेर जातात. अशा वेळेस रुमच्या बाहेरुन सप्लाय बंद करण्यासाठी रुमच्या दरवाजावर मास्टर स्विच बसवावा लागणार आहे. त्यासाठी रुमच्या दरवाज्याच्या बाजूला भिंतीवर झरी घेऊन त्यामध्ये वायरींग पाईप फिट करणे, सप्लाय कंट्रोलसाठी आयसोलेटर डि.बी.सह कन्सील्ड करणे, वायरींग करणे इत्यादि कामे झाल्यावर भिंतीवर मारलेली झरी ही घेतलेल्या ठिकाणी बांधकाम विभागामार्फत बंद करणे इत्यादि कामे एकाच वेळेस होणार आहे.

विद्युत विभागाचे वायरींग काम झाल्यावर बांधकाम विभागाने झरी मारल्याचे ठिकाणी फिनिशींग करुन कलर काम करावे लागणार आहे. साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींग काम करणेसाठी मटेरीअल खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate in Rs. | Total in Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25mm. dia with PVC accessories on wall / ceiling / concealed in wall as per specification No' WG-MA/CON, para no.1.1.1 | 3000 Mtr. | 79.80 | 2,39,400.00 |
| 02) | 1-2-12 | Supplying and erecting rigid PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. with accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.2 | 1500 Mtr. | 45.15 | 0,67,725.00 |
| 03) | 1-3-4 | Supplying and erecting mains with 2x1.5 F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit /trunking/ inside pole/ Bus bars or any other places as per specification No.WG-MA/ BW | 2000 Mtr. | 38.85 | 0,77,700.00 |
| 04) | 1-3-14 | Supplying & erecting mains with 3x2.5 sq.mm F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 9000 Mtr | Rs. 81.90 | 7,37,100.00 |
| 05) | 1-8-25 | Supplying and erecting modular type blanking plate one module ISI mark approved make duly erected on provided plate & box | 1536 Nos. | 24.15 | 0,37,094.40 |
| 06) | 1-8-26 | Supplying and erecting modular type blanking plate two module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 3072 Nos. | 33.60 | 1,03,219.20 |
| 07) | 1-8-48 | Supplying and erecting PVC surface modular double mounting plate 1 module complete duly erected in an approved manner. | 1536 Nos. | 55.65 | 0,85,478.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 08) | 5-3-20 | Supplying erecting and marking Double pole isolators only switch version of miniature circuit breaker (Confirming to IS:8828 of 1996) of 40A with required wiring connections and lugs etc. in provided distribution board. | 1536 Nos. | 332.85 | 5,11,257.60 |
| 09) | 5-4-17 | Supplying and erecting concealed type single pole and neutral distribution board (SPNDB) with door surface/flush mounted with 2 ways for incoming and 4 ways for outgoing SP MCB's on iron frame / wooden board / concealed in wall as per specification No. SWSWR/ MCBDB | 1536 Nos. | 1111.95 | 17,07,955.20 |
| | | | | **Total Rs.:-** | **35,66,929.80** |
| | | | | **Round Up Total Rs.:-** | **35,66,930.00** |

उपरोक्तप्रमाणे आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींगचे काम करुन घेणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ३५,६६,९३०/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरुन सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींगचे काम करुन घेणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या रु.३५,६६,९३०/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३० **सन २०१५-१६ करिता कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईबाबत.**

प्रस्ताव- सन २०१५-१६ करिता संस्थानचे सर्व विभागांसाठी आवश्यक रजिस्टर, फॉर्म्स व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईकामी इकडील जा.क्र.एसएसएस/ वशी-खरेदी/२०८२/२०१४ दि.१४.०८.२०१४ अन्वये माहिती मागविणेत आलेली होती.

मुदती अखेर विभागाकडून आलेल्या मागणीबाबतचे परिशिष्ठ सोबत जोडलेले आहे. त्यानुसार विभागवर करावयाचे जनरल व संगणक छपाईकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्या.जनरल छपाई अंदाजे खर्च | प्रि-प्रिंटेड संगणक छपाई अंदाजे खर्च | एकुण खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रशासन शाखा | ५,४१,५००/- | - | ५,४१,५००/- |
| ०२. | फायर अॅण्ड सेफ्टी | ६,५००/- | - | ६,५००/- |
| ०३. | साईबाबा भक्तनिवासस्थान | ११,३७,२५०/- | ३,२४,०००/- | १४,६१,२५०/- |
| ०४. | आरोग्य विभाग | २,८५०/- | - | २,८५०/- |
| ०५. | साईप्रसाद निवासस्थान | १५,०००/- | - | १५,०००/- |
| ०६. | साई धर्मशाळा | १४,७००/- | - | १४,७००/- |
| ०७. | सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल | २,५५०/- | - | २,५५०/- |
| ०८. | व्दारावती भक्तनिवासस्थान | ५२,३००/- | ९०,०००/- | १,४२,३००/- |
| ०९. | जनसंपर्क विभाग | १०,७००/- | - | १०,७००/- |
| १०. | बांधकाम विभाग | ५,८००/- | - | ५,८००/- |
| ११. | बगिचा विभाग | १,३५०/- | - | १,३५०/- |
| १२. | श्री साई प्रसादालय विभाग | ६६,१००/- | २१,२०,०००/- | २१,८६,१००/- |
| १३. | अभिलेख कक्ष | १,०००/- | - | १,०००/- |
| १४. | पाणी पुरवठा विभाग | ६,०००/- | - | ६,०००/- |
| १५. | कॅन्टीन विभाग | २२,९१,३१०/- | २,५०,०००/- | २५,४१,३१०/- |
| १६. | विदयुत विभाग | ६६,६५०/- | - | ६६,६५०/- |
| १७. | प्रकाशने विभाग | ९,५५०/- | ४०,०००/- | ४९,५५०/- |
| १८. | मंदिर विभाग | ५,७००/- | - | ५,७००/- |
| १९. | लेखाशाखा विभाग | १६,९९,८००/- | १५,४०,०००/- | ३२,३९,८००/- |
| २०. | वाहन विभाग | ४१,६५०/- | - | ४१,६५०/- |
| २१. | माहिती तंत्रज्ञान विभाग | ३,८००/- | - | ३,८००/- |
| २२. | संरक्षण विभाग | २,१७,८५०/- | - | २,१७,८५०/- |
| २३. | जनरल छपाई | ३,५६,६००/- | - | ३,५६,६००/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | ६५,५६,५१०/- | ४३,६४,०००/- | १,०९,२०,५१०/- |
| | | | **पुर्णांकित एकुण रक्कम रुपये** | १,०९,२०,५००/- |

तरी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे छपाईकामी पुर्णांकित रक्कम रु.१,०९,२०,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी नऊ लाख वीस हजार पाचशे) मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. यापुर्वी वार्षिक छपाई ही सन २०१३-१४ मध्ये करण्यात आलेली होती. सदर छपाईस मा.व्य.समितीने व मा.उच्च न्यायालयाने रक्कम रु.१,२९,५०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी दिलेली होती.

तरी वरीलप्रमाणे रक्कम रु.१,०९,२०,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी नऊ लाख वीस हजार पाचशे) मात्रचे खर्चास मा.व्य.समितीची मान्यता मिळालेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची उपरोक्त नमुद खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालयात सादर करता येईल. मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून, छपाई करुन घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे सन २०१५-१६ करिता संस्थानचे विविध विभागांना आवश्यक कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१,०९,२०,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी नऊ लाख वीस हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरील विषय व्यवस्थापन मंडाळाचे त्रिसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ करिता संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असलेली कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,०९,२०,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३१ **विनियम न झालेल्या विदेशी चलनाबाबत.**

प्रस्ताव- मंदीर व मंदीर परिसरातील दक्षिणा पेट्यांची मोजणी आठवड्यातून दोन वेळेस होत असते. दक्षिणापेटया उघडून त्यामध्ये रोख रक्कम, सोने-चांदी अलंकार वस्तू, तांबे पितळ वस्तु, कापड व इतर किरकोळ वस्तू प्राप्त होत असतात. त्याचबरोबर विदेशी चलनातील नोटा व नाणीदेखील प्राप्त होत असतात. तसेच देणगीस्वरुपात देश विदेशातून परकीय चलन प्राप्त होत असते.

टपालाव्दारे व दक्षिणापेटी मोजणीमध्ये निघालेले सर्व विदेशी चलनतील नोटा प्रचलीत कार्यपध्दतीअन्वये लेखाशाखेकडे नोंद करुन, बँक ऑफ बडोदा, नासिक ही संस्थानची परकीय चलनातील व्यवहारासंबंधीची नोंदणीकृत बँक असल्याने त्याचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात. विदेशी चलनाची भारतीय चलनात होणारी रक्कम बँक ऑफ बडोदा, नाशिक येथे असलेल्या संस्थानच्या परकीय चलन खाते (Foreign Currency A/c.) जमा केली जाते. मात्र भरणा करण्यात आलेल्या परकीय चलनातील नोटापैकी काही नोटांचे जागतीक पातळीवर मूल्य कमी असल्याने न चालणा-या नोटा तसेच फाटक्या व खराब नोटा बँक स्विकारीत नाहीत.

संस्थानकडे बँकेकडून परत आलेल्या विदेशी चलनातील न चालणा-या तसेच फाटक्या व खराब नोटा पडून राहण्याऐवजी बँक ऑफ बडोदा, नासिक यांचेमार्फत मुंबई येथील अधिकृत परकीय चलन एजन्सी मे.कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लिमिटेड मुंबई (Cox and Kings (I) Pvt. Ltd. Mumbai) यांचेकडे वटविण्याच्या हमीवर (Collection Basis) पाठविण्यात येत असतात. तद्नंतर मे.कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लिमिटेड मुंबई यांचेकडून त्याबदल्यात येणारी भारतीय चलनातील रक्कम बँक ऑफ बडोदा, नाशिक यांचेमार्फत तपासून घेवून ती संस्थानच्या परकीय चलन खाते जमा करण्यात येत असते.

तरी पुढील निर्णय होईपर्यंत, बँकेने परत केलेल्या परकीय चलनातील न चालणा-या तसेच फाटक्या व खराब नोटा पडून राहण्याऐवजी बँक ऑफ बडोदा, नासिक याचेमार्फत मुंबई येथील अधिकृत परकीय चलन एजन्सी मे.कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लिमिटेड यांचेकडे वटविण्याच्या हमीवर (Collection Basis) पाठविण्यास, व त्याबदल्यात येणारी भारतीय चलनातील रक्कम बँक ऑफ बडोदा, नासिक येथील संस्थानच्या परकीय चलन खात्यामध्ये जमा करुन घेण्यास मा.त्रिसदसीय समिती मान्यता असावी.

निर्णय क्र.५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३२ **श्री साईसच्चरित मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद प्रकाशित करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.७०३ मध्ये सदर प्रस्तावास प्राथमिक मान्यता देण्यात आली आहे. डॉ.आर.सितालक्ष्मी, म्हैसुर यांचेकडून सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर सदरहू प्रस्ताव अंतीम मान्यतेसाठी पुन्हा समितीसोर सादर करणेत यावा असे ठरले आहे.

डॉ आर सितालक्ष्मी, म्हैसुर यांना संस्थानचे प्रचलित नियमाप्रमाणे अनुवाद करुन तो मुळ मराठी पुस्तकाप्रमाणे योग्य असून मुळ अर्थात कोणताही बदल नाही असे पुणे किंवा कन्नड भाषा असलेल्या विद्यापीठाकडून त्यांचे लेटरहेडवर प्रमाणपत्र व सीडी सादर करणेबाबत त्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार डॉ आर.सितालक्ष्मी, म्हैसुर यांनी संस्थानचे प्रचलित नियमाप्रमाणे अनुवाद करुन तो मुळ मराठी पुस्तकाप्रमाणे योग्य असून मुळ अर्थात कोणताही बदल नाही असे कन्नड भाषा असलेल्या म्हैसुर विद्यापीठाकडून त्यांचे

लेटरहेडवर प्रमाणपत्र व सीडी सादर केली असल्याने सदर श्री साईसच्चरित- कन्नड भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेस निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित मराठी पोथीचा कन्नड भाषेत अनुवाद प्रकाशित करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.३३ **सन २०१५-१६ साठी मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी ई-निविदा काढणेस व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्तावीक** – संदर्भ क्र.०१ अन्वये या विभागाची स्थापना दि. ०३/०१/२०१४ रोजी करणेत आलेली आहे. सध्या दररोज ठेकेदाराकडून प्रसाद लाडू व प्रसाद बुंदी बनविण्याचे काम चालू आहे. नविन लाडू किचन येथे साईभक्तांना मंदिर दर्शन रांगेत प्रसाद वाटप करणेकामी सुटटी बुंदी बनविली जाते व जुने लाडू किचन येथे मोतीचूर लाडूची निर्मिती केली जाते.

साईभक्तांना मंदिर दर्शन रांगेत श्री पुण्यतिथी उत्सव ( दसरा) २०१४ पासून मोफत प्रसाद बुंदी वाटप करणेत येत आहे. तसेच साईभक्तांना काऊंटरवर विक्रीसाठी मोतीचूर लाडू प्रसादरुपाने कॅन्टीन विभागामार्फत विक्री करण्यात येत आहे.

सन २०१४-१५ ची निविदा प्रक्रियेची कार्यवाही मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे मान्यतेसाठी विधी विभागामार्फत सादर केलेली आहे/ प्रलंबित आहे. त्याची मुदत ३१ मार्च २०१५ रोजी संपणार आहे. सन २०१२ पासुन लाडू व बर्फी बनविणे प्रक्रीयेस ठेकेदारास खालिल तपशिलाप्रमाणे बील अदा केलेले आहे.

| अ.नं. | तपशील | खर्च रक्कम |
|---|---|---|
| ०१ | ०१/०४/२०१२ ते ३१/०३/२०१३ | रु १,३६,७०,४६४/- |
| ०२ | ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ | रु १,३२,९९,६२०/- |
| ०३ | ०१/०४/२०१४ ते ३१/१२/२०१४ सध्या कार्यरत आहे. | रु १,०७,५६,४८२/- |
| ०४ | ०१/०४/२०१५ ते३१/०३/२०१६<br>कुंभमेळा अपेक्षित खर्च २०% वाढीसह | **रु १,२९,०७,७७८/-** |

या करिता सन २०१५-१६ साठी (एप्रिल २०१५ ते मार्च २०१६) अखेर निविदा प्रक्रीयेची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. त्यास अनुसरुन या बाबदची जाहीरात जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात प्रशिध्द करणेस त्याचप्रमाणे आय.टी विभागामार्फत ई टेंडरची पुढील कार्यवाही करावी लागेल.

**विभागाचा अभिप्राय/ मागणी–** सन २०१५-१६ ( माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६) करिता उक्त टेंडर पध्दतीने मोतीचूर लाडू व बर्फी बनवून देणे तसेच सुटटी बुंदी बनवून देणे बाबद मजुरीची ई निविदा काढणेस व जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणे तसेच आय.टी विभागामार्फत ई टेंडरची पुढील कार्यवाही होणेस विनंती.

सन २०१५-१६ चे अपेक्षित खर्च रु १,२९,०७,७७८/- (अ.रु एक कोटी एकोणतीस लाख सात हजार सातशे अठठयाहत्तर मात्र) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मान्यतेसाठी सादर करावा लागेल, त्यास मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समीती सभेपुढे निर्णयार्थ सादर व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६१ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ साठी मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या रु.१,२९,०७,७७८/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- लाडू प्रसाद निर्मिती विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३४ **श्री साईबाबा रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाकरिता अद्ययावत तंत्रज्ञान असलेले Ultra Sound Machine (USG) खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- <u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u> – १७ (२) ण

<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.</u> – नवीन प्रस्ताव

<u>प्रास्ताविक</u> – श्री साईबाबा रुग्णालयात क्ष किरण विभागात सध्या दोन Ultra Sound Machine असून त्यामध्ये एक सोनोग्राफी कक्षात ठेवण्याचे तर दूसरे विविध वार्ड / विभागात नेऊन (पोर्टेबल) सोनोग्राफी करावयाचे आहे. सोनोग्राफी कक्षात असलेले मॉडेल Sonoline G50 हे सिमेंन्स कंपनीचे असून ते सन २००४ साली रक्कम रु.१९,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. तर दूसरे पोर्टेबल मॉडेल Sonoline G20 हे सन २००८ साली रक्कम

रु.८,५०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सदरचे दोनही मशिन सध्या व्यवस्थित काम करत आहे. परतू सदर मशिन पेक्षा उच्च तंत्रज्ञान असलेले मशिन सध्या बाजारात उपलब्ध असून त्यांची Image Quality तसेच अचूक व योग्य निदान करणे सोपे होईल त्यामुळे रुग्णांना त्याचा नक्कीच फायदा होईल. क्ष किरण विभाग व बायोमेडीकल विभागाने सध्या उपलब्ध असलेल्या दोन मशिन पैकी पोर्टेबल मॉडेल Sonoline G20 हे परत (Buyback) करण्याचे तर Sonoline G50 हे मशिन सोनोग्राफी कक्षातून काढून विविध वार्ड / विभागात नेऊन (पोर्टेबल) वापरता येईल, अशी शिफारस केलेली आहे. त्यामुळे पोर्टेबल मॉडेल Sonoline G20 हे परत (Buyback) करावयाचे आहे. सदर Sonoline G20 ची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१,५१,१२८/- इतकी आहे.

क्ष किरण विभागाने शिफारस केलेले उच्च तंत्रज्ञान असलेले मशिन (4D Colour Doppler Machine) सोनोग्राफी मशिन खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | App. Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | 4D Colour Doppler Machine with Letest Technology | 01 | 65,00,000.00 | 65,00,000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 65,00,000.00 |

उपरोक्त प्रमाणे ०१ नग सोनोग्राफी मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.६५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>मागणी</u> – श्री साईबाबा रुग्णालयातील सोनोग्राफी विभागाचे दि.०४/१०/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २७/१०/२०१४)

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान</u>** – अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

2) सदर मशिनची घसारा वजा जाता दिनांक ३१/१२/२०१४ अखेर किंमत रु.१,५१,१२८/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे मशीन Buyback करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत</u>** – श्रीसाईबाबा रुग्णालयातील सोनोग्राफी विभागातील सन २००८ साली पोर्टेबल मॉडेल Sonoline G20 हे परत (Buyback) करुन नविन उच्च तंत्रज्ञान असलेले मशिन (4D Colour Doppler Machine) खरेदी करण्यास हरकत नाही. तसेच सदर खरेदीस रु.10,00,000/- पेक्षा जास्त खर्च येत असल्याने खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी खालील प्रस्तावास मान्यता असावी.

१ सदर ०१ नग नविन उच्च तंत्रज्ञान असलेले मशिन (4D Colour Doppler Machine) विहित पध्दतीने ई - निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ६५,००,०००/- चे खर्चास

२. जुने पोर्टेबल मॉडेल Sonoline G20 परत (Buyback) करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घेण्यास

३. मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस.

निर्णय क्र.६२ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, अद्ययावत तंत्रज्ञान असलेल्या Ultra Sound Machine (USG) ची मागणी केलेले डॉक्टर बदलले गेले आहेत व नवीन डॉक्टरांनी दुस-या मॉडेलच्या मशिनची मागणी केलेली असल्यामुळे सदरहू प्रस्ताव मागे घेण्यात येऊन, नवीन प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.३५ **श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु. विभागाकरिता CNS System with Monitor & All Accessories खरेदीबाबत.**

प्रस्ताव- <u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u> – १७ (२) ण

<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.</u> – नवीन प्रस्ताव

<u>प्रास्ताविक</u> –श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु. विभागात एल अॅण्ड टी कंपनीचे ८ नग Monitor व CNS System आहे. सदर CNS System व मॉनिटर हे वारंवार बंद पडतात, त्यामुळे जी.आय.सी.यु. विभागाने त्यांचे दि.२०/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये 01 नग CNS System with 11 Monitor ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले एल अॅण्ड टी कंपनीचे CNS System व Monitor हे सन २००५ साली रक्कम रु. १०,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले होते. सदर CNS System व Monitor (Buyback) परत करणेबाबत जी.आय.सी.यु. विभागाने व बायोमेडीकल विभागाने मागणीपत्रकात शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर CNS System व Monitor परत (Buyback) करावयाचे असुन त्यांची घसारा वजा जाता येणारी किंमत रु ७५,०८४/- इतकी आहे.

नविन CNS System with Monitor & All Accessories खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | CNS System | 01 | 4,00,000.00 | 4,00,000.00 |
| 02. | 5 Para Monitor with all accessories | 11 | 3,50,000.00 | 38,50,000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 42,50,000.00 |

उपरोक्त CNS System with Monitor & All Accessories खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु. विभागाचे दि.२०/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २०/१०/२०१४)

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) सदर मशिनची घसारा वजा जाता दि. ३०/११/२०१४ अखेर किंमत रु.७५,०८४/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीकामी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील जी.आय.सी.यु. विभागात सन २००५ साली खरेदी केलेले एल अॅण्ड टी कंपनीचे ८ नग Monitor व CNS System वारंवार बंद पडतात, सध्या त्यांचेकडे असलेले एल अॅण्ड टी कंपनीचे CNS System व Monitor हे बायबॅक करुन नवीन मशिन खरेदी करण्यास हरकत नाही. तसेच सदर खरेदीस रु.10,00,000/- पेक्षा जास्त खर्च येत असल्याने खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी खालील प्रस्तावास मान्यता असावी.

१ सदर CNS System with Monitor & All Accessories विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु ४२,५०,०००/- चे खर्चास

२. जुने Monitor व CNS System (Buyback) करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घेण्यास

३. मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस.

निर्णय क्र.६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाच्या जी.आय.सी.यु. विभागाकरीता प्रस्तावित CNS System with Monitor & All Accessories विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.४२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३६ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरिता Imported Operation Table with Assessories खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागात मेंदूच्या व मनक्याच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर विभागात दोन Operation Table असून त्यापैकी एक ऑपरेशन थिएटरमध्ये Maquet (Imported) तर ऑपरेशन थिएटरमध्ये दुसरे Janak (Indian) कंपनीचा आहे. दोनही Operation Table हे सध्या व्यवस्थित कार्यान्वित आहेत. त्यापैकी Indian Operation Table वर जनरल शस्त्रक्रिया करण्यात येतात परंतू मेंदूच्या व मनक्याच्या काही गुंतागुंतीच्या (Complicated) शस्त्रक्रिया असल्यास उपलब्ध एका Imported Operation Table वर शस्त्रक्रिया करण्यात येतात. परंतु, त्यांना Janak (Indian) टेबलच्या ऐवजी अजून एक Imported Table पाहिजे जेणेकरुन दोन्ही सर्जन यांना Imported Table वर मेंदूच्या व मणक्याच्या शस्त्रक्रिया करता येऊ शकेल. त्यामुळे त्यांनी अजून एक नग Imported Operation Table ची न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाने मागणी केलेली आहे ज्यामध्ये रुग्णांची शस्त्रक्रिया करते वेळी Operation Table वर रुग्णांना वेगवेगळया बाजूने (Different Position During Surgery) करता येऊन सुलभ प्रकारे शस्त्रक्रिया करता येऊ शकतील. Janak (Indian) कंपनीचा Operation Table हा सदर Operation Theatre मध्ये Stand by एकच म्हणून वापरता येईल. नविन Operation Table with Accessories सह खरेदीकामी अंदाजे रु.३५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी –** न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाने Imported Operation Table मशिनची दि. १३/०९/२०१४ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १९/१२/२०१४) अन्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागात मेंदूच्या व मनक्याच्या काही गुंतागुंतीच्या (Complicated) शस्त्रक्रिया असल्यास उपलब्ध Operation Table वर शस्त्रक्रिया करण्यास अडचणी येतात. त्यामुळे त्यांनी अजून एक Imported Operation Table ची मागणी केलेली आहे ज्यामध्ये रुग्णांची शस्त्रक्रिया करते वेळी Operation Table वर रुग्णांना वेगवेगळ्या बाजूने (Different Position During Surgery) करता येऊन सुलभ प्रकारे शस्त्रक्रिया करता येऊ शकतील. त्यामुळे सदर एक Imported Operation Table with Accessories खरेदी करण्यास हरकत नाही.

सदर Imported Operation Table with Accessories खरेदीकामी अंदाजे रु. ३५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्यामुळे सदरचे खर्चास मा. उच्च न्यायलयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यास तसेच येणा-या खर्चास व विविध पध्दतीने ई – निविदा मागवून खरेदीस मान्यता असावी.

निर्णय क्र.६४ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरिता Imported Operation Table with Assessories विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.३५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, सदरहू खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३७ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता पोर्टेबल 3D Echo मशिन खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयात अत्यवस्थ रुग्णांचे पोर्टेबल 2D Echo मशिनवर विविध वार्डमध्ये नेऊन तेथे हृदयाची सोनोग्राफीची तपासणी करण्यात येते. सदरचे पोर्टेबल 2D Echo मशिन हे सन २०१० साली रु. १४,५०,०००/- इतक्या रुपयात खरेदी करण्यात आले होते. सदर मशिन खरेदी केल्यापासुन आतापर्यंत जवळपास ४०,००० इतक्या रुग्णांच्या हृदयाच्या सोनोग्राफी तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. सदर मशिन हे सध्या व्यवस्थित काम करत आहे. परंतु बाजारात नवीन 3D Echo मशिन आलेले असुन त्यामध्ये 2D Echo मशिनपेक्षा अधिक उच्च प्रकारच्या तपासणीच्या सुविधा आहे. त्यामुळे अधिक अचुक निदान होते. तेंव्हा Cathlab विभागाने नवीन एक 3D Echo मशिनची ०३ नग 3D Tee Probe सह मागणी केलेली आहे. सदरचे 2D Echo मशिन हे अद्याप वॉरंटी कालावधीत आहे परंतु ते मशिन बायबॅक करावयाचे आहे. सदर मशिनची घसारा वजा जाता दि. ३१/१०/२०१४ अखेर किंमत रु.४,५८,७८९/- इतकी आहे

सदर 3D Echo मशिन ३ Tee Probe सह खरेदीकामी अंदाजे रु.३५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** Cathlab विभागाने 3D Echo मशिनची दि. १३/०९/२०१४ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०६/१०/२०१४) अन्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) सदर मशिनची घसारा वजा जाता दि. ३१/१०/२०१४ अखेर किंमत रु. ४,५८,७८९/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे. तेंव्हा सदर प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन शासनास प्रस्ताव सादर करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डियाक व कार्डियोलॉजी विभागात राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रुग्णांच्या शस्त्रक्रिया होतात. रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञान वापरुन तयार केलेले नवीन मशिन हे रुग्णांच्या अचुक निदानासाठी फायदेशीर होण्यास मदत होईल. त्यामुळे सदर एक 3D Echo मशिन ३ Tee Probe सह खरेदी करण्यास हरकत नाही.

सदर 3D Echo मशिन ३ Tee Probe सह खरेदीकामी अंदाजे रु. ३५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्यामुळे सदरचे खर्चास मा. उच्च न्यायलयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यास तसेच येणा-या खर्चास व खरेदीस तसेच शासनाची मान्यता घेण्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.६५ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरिता पोर्टेबल 3D Echo मशिन ऐवजी 2D Echo मशिन खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.३८ **श्री साईनाथ/ श्री साईबाबा हॉस्पीटलकडील पदव्युत्तर पदविकाधारक यांना तीन व पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांना सहा वेतनवाढी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- डॉ दादासाहेब लुमा कांबळे, त्वचा रोग तज्ञ व इतर 13 वैद्यकीय अधिकारी यांनी दि. 25/07/2012 व दि 05/02/2013 व दि. 25/08/2014 रोजीचे अर्जाने पदविका धारकास तीन व पदव्युत्तर पदवी धारकास सहा अतिरिक्त वेतनवाढीची मागणी केली आहे. अर्जासोत शासन निर्णय क्र.मवैअ-2011/प्र.क्र.776/सेवा-6, मंत्रालय, मुंबई, दि. 14/12/2011 जोडलेला आहे.

महाराष्ट्र शासन अधिसूचना वित्त विभाग, क्र.वेपूर-1209/प्र.क्र.27/सेवा-9 दि. 22/04/2009 व शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-1209/प्रक्र69/सेवा-3 मंत्रालय मुंबई-32 दि. 29/04/2009 अन्वये मा व्यवस्थापन समितीचे दि. 15/07/2009 रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना दि. 01/01/2006 पासून 6 व्या वेतन आयोगातील शिफारसी लागू करण्यात आल्या असून त्यानुसार त्यांना वेतन देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-2011/प्रक्र776/सेवा3 दि. 14/12/2011 अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये येथे पदव्युत्तर पदवी/पदविका शैक्षणिक अर्हता धारण करणारे वैकीय अधिकारी कमी प्रमाणामध्ये उपलब्ध असल्यामुळे रुग्णांना आवश्यक असणाऱ्या सेवा पुरवितांना अडचण येत असे. महाराष्ट्र शासनाने राज्यातील आरोग्य संस्थामध्ये विशेषज्ञांची असलेली कमतरता दूर करण्यासाठी विविध विषयातील पदव्युत्तर पदवी / पदविका धारक उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी पदावर आकर्षित करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहनपर वेतनवाढी सदरच्या निर्णयाने मंजूर केलेल्या आहेत सदरचा निर्णय शासकीय सेवेतील वैद्यकीय अधिकारी याना लागू आहे. आरोग्य सेवा गट अ या संवर्गात दि. 14/12/2001 रोजी कार्यरत असलेल्या व त्यानंतर वरिष्ठ पदावर पदोन्नत झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांना लागू आहे. पदव्युत्तर पदवीका धारकास तीन अतिरीक्त वेतन वाढी व पदव्युत्तर पदवीधारकास सहा अतिरीक्त वेतनवाढी मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

संस्थान कर्मचारी शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे शासन निर्णय जसेच्या तसे लागू होत नाही. शासन निर्णयास संस्थानचे मा व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिले नंतर त्यानुसार ते नियम संस्थान कर्मचाऱ्यांस लागू होतात. संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यावर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण असले म्हणून संस्थान शासकीय संस्था ठरु शकत नाही.

त्याचप्रमाणे शासनाकडे डॉक्टर्स शेअर्स (Incentive) व दरवर्षी सानुग्रह अनुदान (Ex-gratia) देण्यात येत नाही. याउलट संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलकडील तज्ञ वैद्यकीय अधिकारी व कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते, डॉक्टर्स शेअर्स (Incentive) तसेच दोन्ही रुग्णालयांकडील सर्व वैद्यकीय अधिकारी यांना दरवर्षी सानुग्रह अनुदान (Exgratia) देण्यात येते. एकाच वेळी संस्थान कर्मचाऱ्यांचे फायदे व सरकारी कर्मचाऱ्यांचे फायदे असा दुहेरी लाभाची मागणी केली आहे. हा शासन निर्णय संस्थान वैद्यकीय अधिकारी यांना लागू होत नाही. श्री साईबाबा हॉस्पिटल कडील वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता अदा केला जात असलेने त्यांना या विशेष वेतनवाढी देता येणार नाही. श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांना या विशेष वेतनवाढी द्यावयाचे झाल्यास त्यानी सानुग्रह अनुदान किंवा विशेष वेतनवाढ या पैकी एकाची निवड करणे आवश्यक आहे.

तथापि शासन निर्णयाप्रमाणे वेतनवाढी द्यावयाच्या असलेस संस्थानवर किती आर्थिक भार येईल याबाबत पगारबिल विभागाकडून माहिती मागविणेत आली होती. त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांचा आर्थिक भार दरवर्षी रु. 19,80,899/- असेल तसेच मागील चार वर्षाचा फरक द्यावयाचा ठरलेस 19,80,899x4 = 79,23,596/- इतका अंदाजे आर्थिक भार संस्थानवर येईल त्यामुळे याबाबतचा अर्ज मा उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर दाखल करुन मंजुरी घ्यावी लागेल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६६ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-2011/प्रक्र776/सेवा3 दि. 14/12/2011 अन्वये श्री साईनाथ/ श्री साईबाबा हॉस्पीटलकडील पदव्युत्तर पदविकाधारक यांना तीन व पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांना सहा वेतनवाढी देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३९ **रुग्णालयातील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करणे व दरम्यानचे काळात Ad Hoc basis वर कंत्राटदारामार्फत नेमणूका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्र. सासंवि-2009/433/(37/09) का. सोळा मंत्रालय, मुंबई दि.07/08/2009 नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामधील श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणे रिक्त पदे आहेत. रिक्त पदांची संख्या जास्त असल्यामुळे रुग्णाच्या सेवेत अडचणी व अडथळे निर्माण होतात. अपेक्षेप्रमाणे रुग्णांना चांगली सेवा देणे काही वेळेस शक्य होत नाही

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यानी पीआयएल नं. 18/2011 मध्ये दि. 16/10/2012 रोजी असा आदेश दिलेला आहे की, संस्थानच्या व्यवस्थापन मंडळाने संस्थानमध्ये नोकरभरती करण्यापूर्वी मा. न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे. रिक्त पदांसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं. 9499/2013 मध्ये मा. न्यायालयाने दि. 13/08/2013 रोजी असा आदेश दिलेला आहे की, रिक्त पदांवर भरती करणेसाठी विहित पध्दतीचा अवलंब करावा. उमेदवारांच्या मुलाखती घेणेसाठी मा. न्यायालयाने मा. संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य, मा

संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य आणि व्यवस्थापनाचा त्या क्षेत्रातील तज्ञ प्रतिनीधी अशा तीन सदस्यांची समिती गठीत करुन त्यांचेसमोर उमेदवारांच्या मुलाखती घेणेत याव्यात.

मा. न्यायालयाचे आदेशानुसार रिक्त पदांच्या भरतीसाठी दि. 30/07/2014 रोजी दैनिक वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरच्या जाहिरातीमध्ये परिशिष्ट अ मधील अ.नं. 1,2,3,5,11,15, 16,19,20, 21,22,23, 24,25,27,29,30,36,37,38,42,46,50,54,62,67,71,75 व 87 या पदांचा समावेश असून सदरचे पदांसाठी उमेदवारांचे अर्ज आलेले आहेत व त्यानुसार मुलाखतीबाबची पुढील कार्यवाही चालू आहे.

सिव्हील ऍप्लीकेशन नं. 287/2015 मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. 12/01/2015 रोजी आदेशाने A) न्यूरो सर्जन-02, B) सोनोलॉजीस्ट-01, C) आर एम ओ-15, D) बी.टी.ओ.-01 या पदांसाठी AD hoc basis वर भरती करणेस तसेच मा. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई आणि मा. संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचे प्रतिनिधींमार्फत मुलाखती घेणेस मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त पदाप्रमाणे सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणे रुग्णालयातील उर्वरित रिक्त पदांवरही कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करणे आवश्यक आहे. जेणेकरुन रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या विविध आजाराचे रुग्णांवर तातडीने उपचार करता येतील.

अशा रिक्त पदांवर व भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर मा. न्यायालयाचे आदेशानुसार Ad hoc basis वर कंत्राटदारामार्फत कर्मचारी घेणेस परवानगी मिळावी तसेच उर्वरीत रिक्त पदांवर भरती करणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेस परवानगी मिळावी यासाठी संस्थान हायकोर्ट वकील यांचेमार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर सिव्हील ऍप्लीकेशन दाखल करावे लागेल. त्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.६७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालयातील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करणे व दरम्यानचे काळात Ad Hoc basis वर कंत्राटदारामार्फत नेमणूका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.४० **संस्थानचे रुग्णालयांत ऑब्झरवरशिप करणेस परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. या ठिकाणी संपुर्ण महाराष्ट्रातुन तसेचबाहेरच्या राज्यातूनही रुग्णांचा ओघ सुरु असतो. सध्या श्री साईबाबातसेच श्री साईनाथ रुग्णालयात अत्यल्प चार्जेसमध्ये रुग्णांचे उपचार होत आहेत.

संस्थानच्या रुग्णालयात काही डॉक्टर्स पुढील उच्च शिक्षण, वैयक्तिक, स्टडी करण्यासाठी इत्यादी कारणास्तव राजीनामा देऊन जात असतातनविन डॉक्टर्स भरण्यासाठी नियमानुसार काहीसा कालावधी लागत असतो. त्यामुळे रुग्णालयात रुग्णसेवेत अडचणी येतात.

संस्थान रुग्णालयात एमबीबीएस, पीजी डीप्लोमा, एमडी, एमएस झालेले डॉक्टर्स याचे मदतीसाठी विनामोबदला ऑब्झरवर म्हणून काम करण्यासाठी अर्ज येत असतात त्यांना परवानगी दिल्यास रुग्णसेवेत मदत होईल व अडचणी काही अंशी कमी होतील.

तसेच ज्या डॉक्टरांना विनामोबदला ऑब्झरवर म्हणून काम करण्याची इच्छा असेल त्या डॉक्टराची येथील आवश्यकता व त्यांची सर्व कागदपत्रे तपासून पात्रताधारकांना वैद्यकीय संचालक यांचे परवानगीचे ऑब्झरवर म्हणून काम करण्यास परवानगी देता येईल असे मत आहे.

तरी संस्थान रुग्णालयात विनामोबदला ऑब्झरवर म्हणून काम करण्यास तयार असणाऱ्या डॉक्टरांना इकडील आवश्यकता पाहून व कागदपत्रे तपासून वैद्यकीय संचालक यांचे परवानगीने सहा महिन्यापर्यंत ऑब्झरवर म्हणून काम करणेस परवानगी मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयात ऑब्झरवर म्हणून नेमणूक करणेसाठी त्यांच्या कामाची पध्दत, स्कोप, जबाबदारी तसेच कामाची कार्यपध्दती यांचा समावेश करणेत येऊन, फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४१ **श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टचे पदाची संख्या वाढविणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलचे शासन मंजूर आकृतीबंधात इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टची दोन पदे मंजूर आहेत. सदरचे पदांवर दोन कायम कार्डीओलॉजीस्ट कार्यरत आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु असल्याने ह्दयविकाराचे जास्त रुग्ण येतात. महाराष्ट्रातील विविध भागातून लांबून रुग्ण उपचारासाठी येत असल्याने सध्या कार्यरत असलेल्या दोन कार्डिओलॉजीस्ट यांचेवर कामाचा जादा भार पडतो. रुग्णांवर वेळेत उपचार करता येत नाही. रुग्णांना ऑपरेशनसाठी 2 ते 3 महिने प्रतिक्षा करावी लागते.

सन 2011-2012 ते माहे एप्रिल 2014 ते डिसेंबर,2014 या कालावधीतील ह्दयविकार विभागात उपचार घेतलेल्या रुग्णांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| Period | April-2011 to April-2012 | April-2012 to April-2013 | April-2013 to April-2014 | April-2014 to Dec. 2014 | total | Monthly Average (45 Months) |
|---|---|---|---|---|---|---|
| OPD | 27857 | 35757 | 41866 | 29315 | 134795 | 2995.00 |
| 2 D ECO | 11960 | 14113 | 16591 | 12014 | 54678 | 1215.00 |
| TMT | 1540 | 2420 | 2845 | 1815 | 8620 | 191.55 |
| Angiography | 4186 | 5079 | 5342 | 2836 | 17443 | 387.62 |
| Angioplasty | 2139 | 3031 | 3452 | 1445 | 10067 | 223.71 |
| BMV/BAV/BPV | 599 | 674 | 530 | 284 | 2087 | 46.37 |
| PDA/ASD/VSD with Device/ Other | 408 | 470 | 481 | 325 | 1984 | 44 |

मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील ऍप्लीकेशन नं. 2797/2014 मधील मा. न्यायालयाचे दि. 19/03/2014 रोजीचे आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर 06 महिने कालावधीसाठी व्हिजीटींग पध्दतीने व कंत्राटी पध्दतीने तात्परती नेमणूक करणेकरीता मान्यता देण्यात आलेली असल्याने मुलाखतीव्दारे 06 उमेदवारांच्या व्हिजीटींग व कंत्राटी पध्दतीने कार्डीओलॉजीस्ट पदावर तात्पुरते 06 महिन्यांसाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदरचे कार्डीओलॉजीस्ट यांच्या नेमणूका माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, 2014 मध्ये संपुष्टात आलेल्या आहेत.

सध्या स्थायी पदावर कार्यरत असलेले कार्डीओलॉजीस्ट डॉ. हरीष हुकुमचद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांना काही कारणास्तव दि. 07/11/2014 पासून खातेनिहाय चौकशी करणेकामी संस्थान सेवेतून तात्पुरते निलंबीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये स्थायी पदावर कार्डीओलॉजीस्ट कार्यरत नाहीत. कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या दोन कार्डीओलॉजीस्टला पुढील नेमणूक देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ऍप्लीकेशन दाखल करणेकामी संस्थानचे हायकोर्ट ऍड. चौकीदार यांचेकडे सिव्हील ऍप्लीकेशन देण्यात आलेले आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 874 नुसार हृदय विकाराचे रुग्णांना तातडीने उपचार देणेसाठी दोन इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट व तीन क्लिनिकल असिस्टंटचे वाढीव पदांचा श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात समावेश करणेकामी महाराष्ट्र शासनाकडे जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर / 3311/ 2014 दि. 23/12/2014 नुसार प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

तथापि, सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलचे आस्थापनेवरील दोन कायम कार्डीओलॉजीस्ट यांना तात्पुरते सेवा निलंबीत केलेले असल्यामुळे व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत हृदय विकाराने पिडीत रुग्णांची उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त असल्याने श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात कार्डीओलॉजीस्टची एकूण सहा पदे निर्माण करावीत, अशी वैद्यकिय संचालक यांनी मागणी केली आहे

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात इंटव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टची दोन पदे मंजूर आहेत आणखी दोन पदांचा आकृतीबंधात समावेश करणेकामी शासनाकडे यापूर्वी प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे.

तरी वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीप्रमाणे इंटरव्हेंशल कार्डीओलॉजीस्टचे आणखी वाढीव दोन पदांचा आकृतीबंधात समावेश करणेबाबत व तसा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६९ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीप्रमाणे इंटरव्हेंशल कार्डीओलॉजीस्टचे वाढीव दोन पदांचा आकृतीबंधात समावेश करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तसेच, तसा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४२ **व्हिजीटींग पध्दतीने ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्र. सासंवि-2009/433/(37/09) का. सोळा मंत्रालय मंुबई दि.07/08/2009 नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधात ई.एन.टी सर्जनचे 01 पद व श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात 02 पदे अशी एकूण 03 पदे मंजूर आहेत. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ई.एन.टी. विभाग कार्यान्वीत नाही. श्री साईनाथ रुग्णालयाकडे सदरचा विभाग कार्यान्वीत असून तेथील मंजूर एका पदावर डॉ. रविंद्र बाळकृष्ण कुलकर्णी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तथापि त्यांनी दि.05/01/2015 रोजीचे पत्रान्वये एक महिना पूर्व राजीनामा सादर केला आहे.

प्र.वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. 14/01/2015 रोजीचे पत्रान्वये अशी मागणी केली आहे की, डॉ. आर.बी. कुलकर्णी (नाक. कान, घसा तज्ञ ) यांचा राजीनामा मंजूर झाल्यास श्री साई श्री साईनाथ

रुग्णालयात उपचार घेणेसाठी येणाऱ्या नाक, कान, घसा रुग्णांची मोठी गैरसोय होणार आहे. सबब त्याच्या जागी नवीन ई.एन.टी. सर्जन तातडीने नेमणूक करण्यात यावी.

डॉ. कुलकर्णी याचा राजीनामा दि. 04/02/2015 अखेर पासून मंजूर करणे आवश्यक आहे. त्यांचा राजीनामा मंजूर झालेनंतर श्री साईनाथ रुग्णालयात कान, नाक, घसा या आजाराचे रुग्णावर उपचार करणेकामी नवीन ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करावी लागणार आहे. अन्यथा सदरचे विभागाचे कामकाज बंद पडेल.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. 3- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि. 16/10/2012 रोजीचे आदेशातील अ.नं. 6 मधील D- मध्ये असे नमुद केले आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करु नये.

त्यानुसार दोन्ही रुग्णालयांतील सध्या रिक्त पदांवर व भविष्यात रिक्त होणाऱ्या आवश्यक पदांवर नेमणूका करणेबाबत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेच्या मान्यतेस्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. तथापि या प्रक्रियेस बराचसा कालावधी लागणार असल्याने कामाची तात्पुरती व्यवस्था होणेकामी व्हिजीटींग पध्दतीने तीन ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करुन त्यांना प्रति व्हिजीट सर्व समावेशक रु. 5,000/- मानधन देता येईल. तीन महिन्यानंतर आढावा घेऊन सुधारीत प्रस्ताव सादर करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७० **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांतील रिक्त पदे भरतीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कामाची तात्पुरती व्यवस्था म्हणून व्हिजीटींग पध्दतीने तीन ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करणेत येऊन, त्यांना प्रति व्हिजीट सर्व समावेशक रु.5,000/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४३ **आर जी एन एम (स्टाफ नर्स) चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात प्रॅक्टीस करणेस परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- मा. प्राचार्य, साई इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग बाभळेश्वर ता. राहाता यांनी दि. 05/12/2014 रोजीचे पत्रान्वये त्यांचे इंस्टीट्युटमध्ये आर जी एन एम चे प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयांत अनुभवासाठी प्रॅक्टीस करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 26/03/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 256 नुसार शिवा ट्रस्ट, औरंगाबाद येथील आर जी एन एम चे प्रशिक्षणार्थ्यांना संस्थानचे रुग्णालयांत प्रॅक्टीस करणेस परवानगी देण्यात आलेली होती. त्यानुसार 20 विद्यार्थ्यांनी माहे डिसेंबर 2014 या महिन्यात संस्थान रुग्णालयांत प्रशिक्षण (प्रॅक्टीस) घेतलेले आहे. तसेच बी.एससी.नर्सिंगचे 17 प्रशिक्षणार्थी सध्या जानेवारी 2015 मध्ये अनुभवासाठी प्रॅक्टीस करत आहे.

त्याचप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे दि 08/10/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 819 नुसार सेंट लुक हॉस्पीटल, श्रीरामपुर यांचेकडील पीसीबीएस्सी चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रॅक्टीस करणेस परवानगी देण्यात आलेली होती. त्यानुसार 10 विद्यार्थ्यांनी अनुभवासाठी सन-2014 मध्ये एक महिना प्रॅक्टीस केलेली आहे.

रुग्णालयांमध्ये परिचारीकांची संख्या अपूरी असल्याने रुग्णसेवेत अडथळे येतात. अनुभवासाठी प्रॅक्टीस करणेकरीता येणाऱ्या विद्यार्थ्यांची रुग्ण सेवेत मदत होऊन रुग्णांना चांगल्या प्रकारची सेवा पुरविता येते. साई इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग बाभळेश्वर ता. राहाता येथे आर जी एन एम चे प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयांत प्रॅक्टीस करणेस परवानगी दिल्यास संस्थान रुग्णालयांत येणाऱ्या रुग्णांना सेवा पुरविणेस मदत होईल अशी प्र. वैद्यकिय संचालक यांनी मागणी केली आहे.

तरी, साई इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग बाभळेश्वर ता. राहाता येथे आर जी एन एम चे प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयांत अनुभवासाठी प्रॅक्टीस करणेस मान्यता देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७१ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साई इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग बाभळेश्वर ता.राहाता येथे आर.जी. एन.एम. चे प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयांत प्रॅक्टीस करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

आयत्या वेळेचा विषय नं.०१ **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

निर्णय क्र.७२ **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त करावयाच्या विकास कामांबाबत साईभक्तांकडून अभिप्राय मागविणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, एक महिना कालावधीपर्यंत अभिप्राय घ्यावेत व ते अभिप्राय एकत्रित करुन त्यावर कार्यवाही करणेसाठी स्वतंत्र एजन्सीची नेमणूक करणेत यावी.

(कार्यवाही- कुंभमेळा व शताब्दी महोत्सव कक्षप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.२९ ते ७२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०३.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी